CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १८ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ४२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com








## महत्त्वाचे

### निर्देशांक हजार अंकांनी कोसळला

**मुंबई :** अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या बुधवारी होणाऱ्या व्याजदर बैठकीपूर्वी गुंतवणूकदारांनी धडाक्यात केलेल्या विक्रीमुळे मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक मंगळवारी १०६४ अंकांनी घसरून ८०,६८४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३३२ अंकांनी घसरून २४,३३६ या पातळीवर स्थिरावला. ही सलग दुसऱ्या दिवशी झालेली घसरण आहे. मुंबई शेअर बाजारातील सर्व ब्ल्यू चिप कंपन्यांमध्ये आज घसरण झाली. भारती एअरटेल, इंड्सइंड बँक, जेएसडब्ल्यू स्टील, टीसीएस, एशियन पेंट्स, एल अँण्ड टी, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि एचडीएफसी बँकेची सर्वाधिक घसरण झाली. आजच्या सत्रात आशियातील सेऊल, टोकियो, शांघाय आणि हाँगकाँग शेअर बाजारांतही घसरण झाली. युरोपातील बहुतांश बाजारांनी घसरण अनुभवली. मात्र, वॉल स्ट्रीटवर तेजी होती.



**भांडवली मूल्यात मोठी घसरण**

शेअर बाजारांत निर्माण झालेल्या विक्रीच्या दबावामुळे बुधवारी शेअर बाजारातील कंपन्यांचे भांडवली मूल्य ४,९२,६४४.०६ कोटी रुपयांनी घटून ४,५५,१३,९१३.२४ कोटी रुपयांवर (५.३६ ट्रिलियन डॉलर्स) आले आहे. ■

### एमपीएससी स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहीर झाले आहे. आयोगाच्या संकेतस्थळावर हे वेळापत्रक पाहता येणार आहे. यात दिवाळी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षा, अराजपत्रित गट ब व गट क संयुक्त पूर्व परीक्षा, सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा, राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा, अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा, कृषी सेवा मुख्य परीक्षा, स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा आदींचा समावेश आहे.

### व्यापारतुटीचा उच्चांक; निर्यातीत घसरण, आयातीत वाढ

**नवी दिल्ली :** ऑक्टोबरमध्ये दुहेरी अंकी वाढ नोंदविल्यानंतर नोव्हेंबरमध्ये देशातून होणारी निर्यात वार्षिक ४.८५ टक्क्यांनी घसरून ३२.११ अब्ज डॉलरवर आली आहे. भाजीपाला, तेल, खते आणि चांदीची आवक मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे नोव्हेंबरमध्ये आयात २७ टक्क्यांनी वाढून विक्रमी ६९.९५ अब्ज डॉलर झाली आहे. यामुळे व्यापारी तूट ३७.८४ अब्ज डॉलरच्या उच्चांकावर पोहोचली आहे. ■

# एक देश एक निवडणूक विधेयक लोकसभेत सादर

## संयुक्त संसदीय समितीकडे पाठवणार | विधेयकाच्या बाजूने २६९, विरोधात १९८ मते

◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले ऐतिहासिक असे एक देश एक निवडणूक (वन नेशन वन पोल) विधेयक आज लोकसभेत सादर करण्यात आले. हे विधेयक व्यापक चर्चेसाठी तसेच सहमतीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवणार असल्याची घोषणा सरकारने केली.

विधि आणि न्याय मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी यासंदर्भातील दोन घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर केली. संविधान (१२९ वी दुरुस्ती) विधेयक २०२४ तसेच त्यांच्याशी संबधित संघ राज्य क्षेत्र विधी (दुरुस्ती) विधेयक मेघवाल यांनी विरोधकांच्या गदारोळात लोकसभेत सादर केले. एक देश एक निवडणूक विधेयकावर संयुक्त संसदीय समितीत व्यापक चर्चा केली जाईल, या समितीत सर्व पक्षांना स्थान दिले जाईल, असे मेघवाल म्हणाले.

काँग्रेस, द्रमूक, आम आदमी पक्ष, डावे पक्ष, राजद, सपा, तृणमूल काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी या विधेयकाला जोरदार विरोध केला.

आवाजी मतदानाने दोन्ही घटनादुरुस्ती विधेयक दाखल झाल्यांनतर विरोधकांनी मतविभागणीची मागणी केली. विधेयकांच्या बाजूने २६९ तर विरोधात १९८ मते पडली. विशेष म्हणजे, या विधेयकासाठी संसदेत पहिल्यांदा ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान घेण्यात आले. या मतदानात विधेयकाच्या बाजूने २२० तर विरोधात १४९ मते पडली होती. ईलेक्ट्रॉनिक मतदानावर विरोधी सदस्यांनी आक्षेप घेतल्यानंतर कागद देऊन मतदान करा, अशी सूचना गृहमंत्री अमित शाह यांनी केली.

विधेयकाच्या बाजूने ३२ तर विरोधात १५ राजकीय पक्ष होते. रालोआतील जदयू तसेच तेलुगू देसम या पक्षांनी विधेयकाला पाठिंबा दिला. ◂(तभा वृत्तसेवा)



उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन, त्यांचे अभिनंदन केले. ही सदिच्छा भेट असल्याचे सांगण्यात आले. यावेळी आदित्य ठाकरे, अंबादास दानवे, अनिल परब, भास्कर जाधव, सचिन अहिर, संजय पोतनीस, वरुण सरदेसाई उपस्थित होते

# उद्धव ठाकरे थेट फडणवीसांच्या भेटीला

## राजकीय चर्चांना उधाण

◆ **मुंबई, १७ डिसेंबर**

एक तर तुम्ही राहाल किंवा मी, असे थेट आव्हान देणारे ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. भाजपा आणि ठाकरे यांच्यामधील संबंध एवढे टोकाला गेल्यानंतर ही भेट झाल्याने सर्वत्र चर्चा सुरू आहे. फडणवीस यांना शुभेच्छा देण्यासाठी ही भेट असल्याचे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी काही काळासाठी विधान परिषदेत हजेरी लावली. नंतर ते सभागृहातून बाहेर पडले. त्यांनी विधिमंडळ आवारात प्रसार माध्यमांशी संवाद साधला, मग पत्रपरिषदही घेतली. नंतर सोबत मोजके आमदार घेत ते थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी पोहोचले. यावेळी उद्धव ठाकरे यांच्यासोबत आमदार आदित्य ठाकरे, वरुण सरदेसाई, अनिल परब, सचिन अहिर, भास्कर जाधव होते.

मागील काळातील राजकीय घडामोडी बघता, उद्धव ठाकरे आणि भाजपाचे संबंध एवढे टोकाचे ताणले गेल्यानंतर, या दोन्ही नेत्यांमधील भेट निश्चितच तर्कवितर्कांना उधाण देणारी ठरली आहे. विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही या दोघांची भेट झाली होती. लिफ्टजवळ एकत्र भेटल्यानंतर या दोघांनी एकत्रच प्रवास केला होता.

विशेष बाब म्हणजे, शपथविधीसाठी देवेंद्र फडणवीसांनी स्वतः ठाकरेंना फोन केला होता. तरीदेखील ठाकरे शपथविधीला आले नव्हते. मात्र, यावेळी ठाकरे पुष्पगुच्छ घेऊन मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करायला त्यांच्या दालनात गेले. त्यानंतर ठाकरेंनी विधानसभाध्यक्षांची देखील भेट घेतली. त्यामुळे ही सदिच्छा भेट असल्याचे बोलले जात असले तरी, यात काँग्रेसला बाजूला सारून विरोधी पक्षनेतापद पदरी पाडून घेण्याचा छुपा अजेंडा तर नाही ना किंवा अन्य कुठल्या पडद्यामागच्या राजकीय घडामोडीची शक्यता आहेत का, अशा विविध चर्चांना उधाण आले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# डॉ. आंबेडकरांचा काँग्रेसने केला नेहमीच अपमान

## राज्यसभेत अमित शाह यांचा जोरदार हल्ला



◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ३७० कलमाबाबतचे म्हणणे काँग्रेसने ऐकले नाही. डॉ. आंबेडकर यांचा या कलमाला विरोध होता. काँग्रेसने नेहमीच त्यांचा अपमान केला, त्यामुळे त्यांना मंत्रिमंडळातून राजीनामा द्यावा लागला. एवढेच नाही तर, मृत्यूनंतरही काँग्रेसने देशात त्यांची स्मारके होऊ दिली नाही, असा घणाघाती हल्ला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज चढवला.

संविधानाच्या मुद्यावर राज्यसभेत दोन दिवस झालेल्या चर्चेला उत्तर देताना शाह यांनी काँग्रेस आणि गांधी घराण्यावर जोरदार हल्ला चढवला. आपल्या जवळपास दीड तासांच्या भाषणात शाह यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या कवितेच्या ओळी मराठीतून उधृत केल्या.

गीतेतील संदेश आमच्या संविधानातून देण्यात आला. संविधानात रामायण आणि महाभारतातील अनेक प्रेरक चित्रांचा समावेश आहे. त्यामुळे आमच्या संविधानाचा आम्हाला अभिमान आहे. आमचे संविधान जगातील अनेक देशांच्या संविधानाची नकल नाही, तर जगातील अनेक देशांच्या संविधानातील चांगल्या गोष्टी आम्ही त्यात सामावून घेतल्या आहेत. आपले संविधान लोकशाही प्रक्रियेतून अतिशय मेहनतीने तसेच सखोल अभ्यासपूर्ण चर्चेअंती तयार करण्यात आले, अनेक मान्यवरांनी आपले संविधान समृद्ध केले. त्यामुळे आम्ही संविधानासमोर नतमस्तक होतो, असे ते म्हणाले.

**काँग्रेसने संविधानालाही जहागीर मानले**

काँग्रेसने आतापर्यंत सत्तेसोबत संविधानही एका घराण्याची जहागीर समजली. काँग्रेसने संविधानाची जी चेष्टा केली, त्याची शिक्षा देशातील लोकांनी निवडणुकीत दारुण पराभवातून त्यांना दिली. भाजपालाही काहीवेळा घटनादुरुस्ती करावी लागली. १६ वर्षांत भाजपाने २२ वेळा घटनादुरुस्ती केली. पण, आम्ही जनतेच्या व्यापक कल्याणासाठी घटनेत सुधारणा केल्या, असे अमित शाह म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

### आयटीसी लिमिटेडपासून वेगळे होणार हॉटेल्स

**मुंबई :** दैनंदिन वापरातील उत्पादने बनवणाऱ्या एफएमसीजी कंपनी आयटीसी लिमिटेडसोबतच्या हॉटेल व्यवसायाचे विलगीकरण अंतिम टप्प्यात आले आहे. हे विलगीकरण १ जानेवारी २०२५ पासून लागू होईल. कंपनीने मंगळवारी आपल्या एक्सचेंज फाईलिंगमध्ये ही माहिती दिली आहे. ■

# ३५६ कलमाचा सर्वाधिक दुरुपयोग काँग्रेसच्याच काळात

## नड्डा यांचा घणाघात



◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

काँग्रेसच्या आतापर्यंतच्या सरकारांनी ३५६ कलमाचा वारंवार दुरुपयोग केल्यामुळेच आम्हाला एक देश एक निवडणूक विधेयक आणावे लागत आहे, अशा शब्दांत राज्यसभेचे नेते जे. पी. नड्डा यांनी आज राज्यसभेत काँग्रेसवर हल्ला चढवला.

संविधानाचा ७५ वर्षांचा गौरवशाली प्रवास या विषयावर राज्यसभेत दुसऱ्या दिवशीही सुरू असलेल्या चर्चेत सहभागी होताना नड्डा म्हणाले की, काँग्रेसने संविधानाची भावना बदलण्याचा तसेच ते पुन्हा लिहिण्याचा प्रयत्न केला होता. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात काळा अध्याय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणिबाणीला यावर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहे, त्यामुळे यानिमित्त २५ जूनला आयोजित कार्यक्रमात सहभागी होत काँग्रेसने त्याचे प्रायश्चित घ्यावे. देशाला असा कोणता धोका त्यावेळी होता की, देशात आणिबाणी लागू करावी लागली, याचे उत्तर काँग्रेसने दिले पाहिजे, असे नड्डा म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

### 'किस्सा कुर्सी का'

» देशाला कधीच धोका नव्हता, तो त्यांच्या खुर्चीला होता. किस्सा कुर्सी का था, त्यामुळे यांनी देशाला अंधकारात ढकलले, असा आरोप करत नड्डा म्हणाले की, आणिबाणी लावणे ही चूक होती, हे काँग्रेसच्या नेतृत्वाने मान्य केले. आणिबाणीच्या काळात लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न करण्यात आला. तुमच्या मनात याबद्दल कोणतीही पश्चातापाची भावना असेल, तर यावर्षी २५ जूनला आयोजित आणिबाणी विरोधी दिवसाच्या कार्यक्रमात तुम्ही सहभागी झाले पाहिजे. तुम्हाला आताच मी निमंत्रण देत आहे. ■

# अजितदादा आजपासून कामकाजात सहभागी होणार

◆ **मुंबई, १७ डिसेंबर**

मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर अचानक अदृश्य झालेले अजित पवार नेमके कुठे आहेत, याबाबत कुणालाही थांगपत्ता नव्हता. हिवाळी अधिवेशन सुरू असताना, अधिवेशनाच्या दोन्ही दिवशी अनुपस्थित असलेल्या अजितदादांना घशाचा संसर्ग झाला असल्याचे त्यांच्या पक्षाचे नेते सुनील तटकरे यांनी सांगितले. बुधवारपासून ते कामाकाजात सहभागी होणार आहेत.



उपमुख्यमंत्री अजित पवार हे सरकारच्या पहिल्याच अधिवेशनाला अनुपस्थित होते. दोन दिवस ते कुणाच्याही संपर्कात नव्हते. त्यांच्या या संपर्काबाहेर असल्यामुळे अनेक तर्कवितर्कांना उधाण आले होते. कुणी अजित पवार अर्थ खाते मिळत नसल्याने नाराज असल्याचे, तर कुणी छगन भुजबळांच्या भूमिकेमुळे पवार 'नॉट रिचेबल' असल्याचे सांगत होते. मंत्रिमंडळात स्थान नसल्याने छगन भुजबळ यांच्यासह काही नेते नाराज असताना अजित पवार गायब असल्याचे आधीच्या वृत्तात नमूद होते. छगन भुजबळ यांचा रोख अजित पवार यांच्याकडे असल्याने सध्या वाद नको म्हणून ते दूर असल्याची चर्चा सुरू असताना आज सुनील तटकरे यांनी याबाबत खुलासा केला. अजित पवार यांना घशाचा संसर्ग झाला असून, ते नागपुरातील शासकीय निवासस्थानी विश्रांती घेत होते. अजित पवार दिल्लीला गेले असल्याच्या बातम्यांचेही त्यांनी खंडन केले.

**२०१९ मध्येही 'नॉट रिचेबल'**

यापूर्वी २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीसांसोबत शपथ घेतल्यानंतर अजित पवार अचानक नॉट रिचेबल झाले होते. तब्येत बरी नसल्याच्या कारणाने ते नॉट रिचेबल झाले होते. आता पुन्हा एकदा प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते मागील दोन दिवसांपासून कामकाजात सहभागी होऊ शकले नाहीत. ◂(तभा वृत्तसेवा)

### प्रेमाच्या शोधात व्हेल माश्याने केले तीन महासागर पार

**नवी दिल्ली :** प्रत्येक जीव जीवनसाथी शोधत असतो आणि त्यासाठी तो अडचणीही सहन करतो, प्रियकराला भेटण्याकरिता लांबचा प्रवास देखील करतो. अशीच एक आश्चर्यकारक नर व्हेल माश्याची कथा सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. नर व्हेलने प्रेमाच्या शोधात प्रशांत महासागरातून हिंदी महासागरापर्यंत ८,१०६ मैल पर्यंतचा प्रवास केला. शास्त्रज्ञांच्या मते, या व्हेलने सर्वांत लांब महावर्तुळ अंतर कापले आहे. पोट-वर्तुळ अंतर हा पृथ्वीच्या गोलाकार पृष्ठभागावरील दोन बिंदूमधील सर्वांत लहान मार्ग आहे. या सहलीचा उद्देश केवळ स्वत:साठी योग्य मादी शोधणे हा आहे. तो प्रथम कोलंबियापासून पूर्वेकडे आणि नंतर दक्षिण महासागराकडे गेला.

# विधानसभा अधिवेशनात आ. देवेंद्र कोठेंनी मांडला सोलापूरचा पाणी प्रश्न

## महापालिका प्रशासन कुठेतरी कमी पडत असल्याकडे वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर-**

महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजाच्या पहिल्याच दिवशी मंगळवारी शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आ. देवेंद्र कोठे यांनी सोलापूरकरांचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न औचित्याच्या मुद्द्याद्वारे मांडला. महापालिका प्रशासन कुठेतरी कमी पडत असल्याचे सांगत शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी शासनाने आदेश देण्याची मागणी केली.

आ. कोठे यांनी पाण्याचा प्रश्न विधानसभेत मांडल्यामुळे सोलापूरकरांनी समाधान व्यक्त केले. आ. देवेंद्र कोठे म्हणाले, उजनी धरण सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी असूनही सोलापूरला आठवड्यातून केवळ एकदा पाणीपुरवठा करण्यात येत आहे. महापालिका प्रशासन पाणीपुरवठा करण्यात कमी पडत आहे. सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी टाकण्यात येत असलेल्या दुहेरी जलवाहिनीच्या ११० किमी च्या कामापैकी १०६ किलोमीटर जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. केवळ ४ किमीचे काम राहिले आहे. जलशुद्धीकरण केंद्रासाठी जागा ताब्यात घेतली नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दुहेरी जलवाहिनी कार्यान्वयित झाल्यानंतर सोलापूर शहराला रोज किंवा किमान एक दिवसाआड पाणी मिळेल, असे महापालिकेकडून सांगण्यात येत आहे. परंतु महापालिकेने अद्याप जलशुद्धीकरण केंद्राची जागाच ताब्यात घेतलेली नाही. राष्ट्रीय महामार्ग तसेच अन्य कारणांमुळे हे काम थांबल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. शासनाकडून सोलापूर महानगरपालिकेला हे काम पूर्ण करून घेण्याबरोबरच नियमित पाणीपुरवठा करण्यासंदर्भात सूचना द्याव्यात आणि सोलापूरकरांचा पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी आ. देवेंद्र कोठे यांनी विधानसभेत केली



दरम्यान, आ. कोठे यांनी सोलापूरकरांच्या पाण्याचा प्रश्न विधानसभेत मांडल्याचा व्हिडिओ मंगळवारी शहरात तुफान व्हायरल झाला. अनेक वर्षांपासूनची असलेली सोलापूरकरांची पिण्याच्या पाण्याची समस्या विधानसभेत मांडल्याबद्दल नेटकऱ्यांनी आमदार देवेंद्र कोठे यांचे समाज माध्यमांतून कौतुक केले.

### पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्याला प्राधान्य

सोलापुरात पिण्याच्या पाण्याची समस्या गेल्या अनेक वर्षांपासून आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळे सोलापूरला उजनी ते सोलापूर दुहेरी जलवाहिनी मिळाली आहे. या दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण करून घेण्याबरोबरच सोलापूरकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्याला प्राधान्य राहील, असे आ. कोठे यांनी स्पष्ट केले आहे.

# नीट परीक्षा पद्धतीवर लवकरच निर्णय : धर्मेंद्र प्रधान

◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

नीट-यूजी परीक्षा ऑनलाईन अथवा पेन व पेपर पद्धतीने घ्यायची, या मुद्यावर शिक्षण आणि आरोग्य मंत्रालयाची चर्चा सुरू आहे. याबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल, अशी अपेक्षा असल्याचे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मंगळवारी सांगितले.

या मुद्यावर शिक्षण मंत्रालयाने केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वातील आरोग्य मंत्रालयासोबत चर्चेच्या दोन फेऱ्या घेतल्या आहेत. सद्यःस्थितीत नीट-यूजी ऑफलाईन म्हणजे पेन व पेपर पद्धतीने घेतली जाते. जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वातील आरोग्य मंत्रालयासोबत आमच्या चर्चेच्या दोन फेऱ्या झाल्या आहेत. परीक्षा आयोजित करण्यासाठी कोणता सर्वोत्तम पर्याय मानला जाईल, त्याचा वापर करण्यास आम्ही तयार आहोत, असे प्रधान यांनी पत्रकारांना सांगितले.

**एनसीईआरटीच्या पुस्तकांचे दर होणार कमी**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद अर्थात् एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकांची किंमत पुढील वर्षीपासून कमी होईल, असे धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितले. परिषद सध्या दरवर्षी पाच कोटी पुस्तके छापते. पुढील वर्षापासून ही क्षमता १५ कोटी करण्यासाठी काम केले जात आहे, अशी माहिती त्यांनी दिली. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### मनोज जरांगे २५ पासून बेमुदत उपोषणावर

**जालना** : मराठा समाजाच्या ओबीसी प्रवर्गातील नोकऱ्या आणि शिक्षणात आरक्षण यासह इतर मागण्यांसाठी २५ जानेवारीपासून बेमुदत उपोषण सुरू करणार असल्याची घोषणा कार्यकर्ते मनोज जरांगे यांनी केली. जालन्यातील अंतरवली सराटी गावात प्रसारमाध्यमांना संबोधित करताना जरांगे यांनी मराठा समाजाच्या सदस्यांना आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने एकत्र येण्याचे आवाहन केले. कृषीप्रधान कुणबी समाजाला आधीच ओबीसी प्रवर्गात कोट्याचा लाभ मिळतो. सरकारने आमची फसवणूक केली आहे. चालू हिवाळी अधिवेशनात आमच्या मागण्या पूर्ण न केल्यास आम्ही त्यांना सोडणार नाही. असे जरांगे म्हणाले. आंदोलनात जो कोणी सहभागी होण्यास इच्छुक असेल, त्यांचे स्वागत आहे. कोणावरही कोणतीही सक्ती किंवा दबाव असणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### मणिपाल अकादमी, ॲक्सिस बँकेतर्फे कोहोर्टची सुरुवात

**मंबई** : भारतातील बीएफएसआय क्षेत्रासाठी आघाडीची अध्ययन सुविधा पुरवणारी संस्था मणिपाल अकादमी ऑफ बीएफएसआयने ॲक्सिस बँकसोबत भागीदारी करीत ॲक्सिस बँक यंग बँकर्स प्रोग्रामच्या खास महिलांसाठी कोहोर्ट म्हणजेच संघटन सुरू करीत असल्याचे जाहीर केले. विविधतेला प्रोत्साहन देणाऱ्या या कोहोर्टचे उद्घाटन बंगळुरू येथील कॅम्पसमध्ये ॲक्सिस बँकेच्या अध्यक्ष राजकमल वेंपती यांच्या हस्ते करण्यात आले. ॲक्सिस बँक आणि मणिपाल अकादमी यांच्या सहकार्याच्या यंग बँकर्स प्रोग्रामने गेल्या १२ वर्षांत १६ हजारांवर पदवीधरांना यशस्वीपणे प्रशिक्षण दिले आहे. महिलांसाठीचे हे नवे, विशेष संघटन सुरू झाल्यामुळे महिलांचा सहभाग वाढला आहे. गेल्या वर्षीच्या कोहोर्टच्या तुलनेत २४-२५ साठी महिलांची संख्या ७०० पर्यंत वाढली असून, लिंग गुणोत्तर ३१ टक्क्यांवरून ३८ टक्क्यांपर्यंत सुधारले आहे. मणिपाल अकादमी ऑफ बीएफएसआयच्या व्यवसाय विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष आताश शाह म्हणाले, बँकिंग क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी तरुण महिलांना आवश्यक कौशल्यांनी सक्षम करण्यासाठी ॲक्सिस बँकेसोबतची आमची भागीदारी सुरू ठेवताना आनंद होत आहे.

### बहरीनला जाणारे विमान बिघाडामुळे कोचीला परतले

**कोची** : मंगळवारी कोचीन आंतराष्ट्रीय विमानतळावरून बहरीनसाठी उड्डाण केलेल्या एका प्रवासी विमानाला त्याच्या टायरमध्ये संशयास्पद समस्या असल्याचे दिसल्यानंतर लगेच परत बोलवण्यात आले असे विमानतळाच्या सूत्रांनी सांगितले. टेकऑफ केल्यानंतर लगेच ही समस्या आढळून आली. खबरदारीचा उपाय म्हणून प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी वाहकाला कोचीन विमानतळावर परत येण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### आसाम पोलिसांनी परत पाठवले बांगलादेशी घुसखोरांना

**गुवाहाटी** : आसाम पोलिसांनी भारत आणि बांगलादेशमधील आंतरराष्ट्रीय सीमा बेकायदेशीरपणे ओलांडल्याबद्दल एका बांगलादेशीला अटक केली आणि त्याला परत पाठविण्यात आले, असे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी सांगितले. सीमेवर सतर्कता राखत बांगलादेशी नागरिकाला आसाम पोलिसांनी मंगळवारी आंतरराष्ट्रीय सीमेजवळ पकडले, असे त्यांनी एक्सवर म्हटले आहे. आसमा अख्तर असे घुसखोराचे नाव आहे. आसाममधून १६० पेक्षा अधिक घुसखोरांना परत पाठविले आहे. शेजारील देशात अशांतता निर्माण झाल्यापासून ईशान्येकडील १८८५ किमी लांबीच्या भारत-बांगलादेश सीमेवर सतर्कता वाढविण्यात आली आहे.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८०,६८४.४५ (-१,०६४.१२) |
| निफ्टी | २४,३३६.०० (-३३२.२५) |

### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७८,००० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९२,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.३ | १२.९ |
| अमरावती | ३१.६ | ११.४ |
| भंडारा | २७.६ | १०.० |
| बुलडाणा | ३२.३ | ११.६ |
| चंद्रपूर | २८.० | -.- |
| गडचिरोली | २८.२ | ८.४ |
| गोंदिया | २८.६ | ८.२ |
| नागपूर | ३०.० | ८.२ |
| वर्धा | ३०.२ | ९.५ |
| वाशीम | ३१.४ | १३.६ |
| यवतमाळ | ३०.० | -.- |

# बीड, परभणी घटनांवरून विरोधकांचा सभात्याग

## काँग्रेसचा दिवसभरासाठी बहिष्कार

**नागपूर, १७ डिसेंबर**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही विरोधकांनी बीड आणि परभणी घटनांवर सभागृहात चर्चा व्हावी, अशी जोरदार मागणी केली. परंतु, विधानसभा अध्यक्षांनी १८ डिसेंबर रोजी चर्चा होणार असल्याचे सांगितले. त्यामुळे विरोधक चांगलेच आक्रमक झाले. हा विषय अत्यंत गंभीर असून, आजच या विषयावर चर्चा व्हावी, असा आग्रह विरोधकांनी धरला. अध्यक्षांनी हा स्थगन प्रस्ताव फेटाळल्याने विरोधकांनी सभात्याग केला. काँग्रेसने दिवसभरासाठी कामकाजावर बहिष्कार टाकला.

विधानसभेत शोक प्रस्ताव मांडल्यानंतर काँग्रेसचे नितीन राऊत यांनी स्थगन प्रस्तावाची सूचना मांडली. बीड आणि परभणीतील घटना अत्यंत गंभीर असून, सभागृहात या मुद्यावर आजच चर्चा व्हावी, अशी मागणी केली. काँग्रेसचे नाना पटोले यांनी हा विषय सभागृहात उचलून धरला. परंतु, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी आज या विषयावर चर्चा होणार नाही, असे स्पष्ट केले. त्यामुळे विरोधक चांगलेच संतप्त झाले.




बीड घटनेच्या निषेधार्थ हातात फलक घेऊन आंदोलन करताना विरोधी पक्षांचे सदस्य

परभणीची घटना सुनियोजित कट होता आणि पोलिस कस्टडीमध्ये ज्या सोमनाथ सूर्यवंशी नावाच्या तरुणाचा मृत्यू झाला, ती हत्याच होती. पोलिस त्यास जबाबदार असल्याचा आरोप नितीन राऊत यांनी केला. परभणी, बीड मुद्यांवर आक्रमक होत विरोधकांनी सभात्याग केला. उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार गटाच्या सदस्यांनी काँग्रेस आमदारांसह सभागृहातून सभात्याग केला. नंतर उबाठाचे आमदार सभागृहात परतले.

**परभणी हिंसाचार प्रकरण**

समाजवादी पक्षाचे आमदार अबु आजमी यांच्यासह इतर विरोधी सदस्य सभागृहाबाहेर पडले नाहीत. मध्य महाराष्ट्रातील परभणी शहरात १० डिसेंबर रोजी संध्याकाळी हिंसाचार उसळला, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळील काचेच्या साच्यात ठेवलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीचे नुकसान झाले. हिंसाचारासंदर्भात ५० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे.

**सरपंच हत्या प्रकरण**

बीडमधील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली. हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सभागृहाचे कामकाज सुरू होताच अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी या विषयावर चर्चा होणार असल्याचे सांगत काँग्रेस सदस्य नितीन राऊत यांची तहकूब सूचना फेटाळून लावली. (तभा वृत्तसेवा)

# २०२६ पर्यंत नक्षलवाद संपुष्टात आणण्यासाठी समन्वय ठेवा

## अमित शाह यांचा सुरक्षा दलांना सल्ला

**रायपूर, १७ डिसेंबर**

मार्च २०२६ पर्यंत डाव्या विचारसरणीचा पूर्णपणे नायनाट करण्यासाठी सर्व सुरक्षा दल आणि यंत्रणांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे.

या प्रयत्नात राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) खूप महत्त्वाची भूमिका बजावेल, असे शाह यांनी छत्तीसगडमधील डाव्या विचारसरणीच्या परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी आयोजित आढावा बैठकीला संबोधित करताना सांगितले.

मुख्यमंत्री विष्णुदेव साय, उपमुख्यमंत्री विजय शर्मा, केंद्रीय गृहसचिव गोविंद महाजन, छत्तीसगडचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक, केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाचे महासंचालक या बैठकीसाठी उपस्थित होते.

डाव्या कट्टरवादी विचारसरणीचा मार्च २०२६ पर्यंत नायनाट करण्याचे लक्ष्य साध्य करण्यासाठी सुरक्षा दल आणि यंत्रणांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे. नक्षलवादाच्या विरोधात छत्तीसगड पोलिस आणि इतर सुरक्षा दलांनी समन्वयित पद्धतीने लढा दिला. त्यात मोठ्या प्रमाणात यश मिळाले, असे अमित शाह यांनी म्हटल्याचे निवेदनात म्हटले आहे. मार्च २०२६ पूर्वी नक्षलवाद्यांना संपुष्टात आणण्यासाठी आपल्याला बरेच काही करावे लागणार आहे. या प्रयत्नांत एनआयए महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडेल, असे शाह यांनी सांगितले. मार्च २०२६ पूर्वी नक्षलवादाचा नायनाट केला जाईल, असा विश्वास व्यक्त करून अमित शाह म्हणाले की, सीआरपीएफ, आयटीबीपी, बीएसएफ, छत्तीसगड पोलिस आणि जिल्हा राखीव रक्षक यांनी मिळून एका वर्षात खूप मोठे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल केली आहे. (वृत्तसंस्था)

# इंदूरमध्ये भिकाऱ्यांना पैसे दिल्यास दाखल होणार गुन्हा

**इंदूर, १७ डिसेंबर**

मध्यप्रदेशातील इंदूरला भिकारीमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घेतला आहे. प्रशासनाने दिलेल्या आदेशानुसार, शहरात भिकाऱ्यांना पैसे देणाऱ्यावर १ जानेवारीपासून गुन्हे दाखल होणार आहेत. जिल्हाधिकारी अशिषसिंह यांनी आधीच इंदूरमध्ये भीक मागण्यावर बंदी घालण्याचा आदेश जारी केला असल्याचे सांगितले आहे.

पत्रकारांना या मोहिमेविषयी माहिती देताना जिल्हाधिकारी अशिष सिंह म्हणाले, भीक मागण्याविरुद्धची आमची जनजागृती मोहीम या महिन्याच्या अखेरपर्यंत शहरात सुरू राहणार आहे. १ जानेवारीपासून कोणीही भीक देताना आढळला, तर त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला जाणार आहे. मी इंदूरमधील सर्व रहिवाशांना आवाहन करतो की, भीक देऊन पापाचे भागीदार होऊ नका.

**अनेक टोळ्यांचा पर्दाफाश** : दरम्यान, गेल्या काही महिन्यांमध्ये प्रशासनाने भीक मागायला लावणाऱ्या अनेक टोळ्यांचा पर्दाफाश केला आहे. त्याचबरोबर अनेक भिकाऱ्यांचे पुनर्वसनही केल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने देशातील १० शहरे भिकारीमुक्त करण्यासाठी प्रकल्प सुरू केला आहे, त्यात इंदूरचाही समावेश आहे.

**भिकाऱ्याने दिले व्याजाने पैसे** : भीक मागण्याविरोधी मोहिमेदरम्यान इंदूर प्रशासनाने काही धक्कादायक खुलासे केले आहेत. प्रकल्प अधिकारी दिनेश मिश्रा म्हणाले, आम्ही अहवाल तयार केल्यावर आढळले की, काही भिकाऱ्यांकडे पक्की घरे आहेत, तर काहींची मुले बँकेत काम करतात. (वृत्तसंस्था)

# माओवाद संपवून गडचिरोली जिल्ह्याचा विकास करू : रश्मी शुक्ला

## अतिदुर्गम पेनगुंडा व लाहेरीला दिली भेट ● पोलिस अधिकारी व जवानांशी साधला संवाद

**गडचिरोली, १७ डिसेंबर**

नवीन पोलिस मदत केंद्राच्या माध्यमातून गडचिरोली पोलिस दलातर्फे नागरिकांच्या सर्व समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. गडचिरोली पोलिस दल राबवित असलेल्या विविध योजनांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा. पेनगुंडा हा अतिदुर्गम भाग असला, तरी काही दिवसांमध्ये येथे रस्ते, आरोग्य सेवा इत्यादी सोयी-सुविधा दिल्या जातील. सर्व अधिकारी व जवानांनी येथील नागरिकांसोबत एकजुटीने राहून कर्तव्य पार पाडावे. येत्या काळात आम्ही माओवाद संपवून गडचिरोली जिल्ह्याचा विकास करू, असे प्रतिपादन राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी केले.

आज, मंगळवारी त्यांनी गडचिरोली पोलिस दलास भेट दिली तसेच ११ डिसेंबरला भामरागड उपविभागांतर्गत नव्याने स्थापन झालेले अतिसंवेदनशील पेनगुंडा पोलिस मदत केंद्र व लाहेरी येथे भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. पोलिस अधिकारी व जवानांचे मनोबल वाढवत त्यांनी त्यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी अपर पोलिस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) संजय सक्सेना, मुंबई येथील राज्य गुप्तवार्ता विभागाचे आयुक्त शिरीष जैन, नक्षलविरोधी अभियान नागपूरचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, गडचिरोली परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक अंकित गोयल उपस्थित होते.



अतिदुर्गम भागातील पेनगुंडा येथे भेट देऊन आढावा घेताना पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला

यावेळी पोलिस महासंचालकांनी पेनगुंडा परिसरातील माओवादविरोधी अभियानाचा आढावा घेत सर्व जवानांच्या राहण्याच्या व्यवस्थेची पाहणी केली. सोबतच पोलिस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून आयोजित महाजन जागरण मेळाव्यात उपस्थित नागरिकांना स्प्रे पंप, स्वयंपाकासाठी लागणारी मोठी भांडी, वाजंत्री साहित्य, शिलाई मशीन, ब्लँकेट तसेच शालेय विद्यार्थ्यांना साहित्यांचे वाटप केले.

भामरागडचे उपविभागीय पोलिस अधिकारी अमर मोहिते व प्राणहिता सी-६० चे पोलिस अंमलदार श्रीराम सोरी यांचा वाढदिवस पोलिस महासंचालकांनी केक कापून साजरा केला तसेच उपस्थित अधिकारी, अंमलदारांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. नंतर त्यांनी लाहेरी उपपोलिस स्टेशन परिसरातील माओवादविरोधी अभियानाचा आढावा घेतला.

यावेळी पोलिस अधीक्षक नीलोत्पल, ११३ बटालियनचे कमांडंट जसवीर सिंग, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) एम. रमेश, अहेरीचे अपर पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, भामरागडचे उपविभागीय पोलिस अधिकारी अमर मोहिते, अहेरीचे उपविभागीय पोलिस अधिकारी अजय कोकाटे उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

# अपमान जिव्हारी लागल्याने तरुणीचा खून

## गुन्हे शाखेने केला गुन्हा उघड

**यवतमाळ, १७ डिसेंबर**

आठ महिन्यांपूर्वी केलेल्या अपमानाचा राग मनात धरून तरुणीचा खून केल्याची घटना यवतमाळात घडली. या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने ४८ तासांत छडा लावून आरोपीला ताब्यात घेतल्याची माहिती पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी मंगळवार, १७ डिसेंबरला पत्रपरिषदेत दिली.

लोहाऱ्याच्या शुभम कॉलनीतील तक्रारदार भोला पेटकर यांनी १५ डिसेंबरला तक्रार दिली की, त्यांची मुलगी धनश्री ५ डिसेंबरला दुपारी परीक्षेसाठी महाविद्यालयात गेली. मात्र, घरी परतली नाही. यानुसार पोलिसांनी शोधमोहीम राबविली. याचवेळी मादनी घाट ते बोरगाव धरण परिसरात मृतदेहाच्या डोक्यात दगड टाकून ठार मारल्याची माहिती मिळाली. हा मृतदेह धनश्रीचा असल्याचे समोर आले. यातील आरोपीचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखेच्या पथकाने परिसरात माहिती घेतली असता धनश्रीला प्रमोद कोदाने याच्या गाडीने आठ महिन्यांपूर्वी ठोस लागली होती. त्यावेळी लोकांनी प्रमोदला बेदम मारहाण केली.



ताब्यातील आरोपीसह पोलिस पथक

यानंतर प्रमोदने धनश्रीशी जवळीक साधून मैत्री केली. घटनेच्या दिवशी त्याने धनश्रीला महाविद्यालयात सोडून दिले. पेपर किती वाजता संपतो, तुला घ्यायला येतो? असे सांगून गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या अनुषंगाने शोध घेताना प्रमोद हा वाघापूर नाका येथे पानठेल्यावर उभा असल्याची माहिती मिळाली. त्याला पोलिसांनी ताब्यात घेऊन विचारपूस केली असता घटनाक्रमच सांगितला.

५ डिसेंबरला धनश्रीला सायंकाळी ५ वाजता धामणगाव रस्त्यावरील वाधवाणी कॉलेजमध्ये घ्यायला गेलो. तिला 'शेतातील मजुराला पैसे द्यायचे आहे' असे सांगितले असता 'चल मी पण सोबत येते' असे म्हटले. तिला बोरगाव घाटात नेऊन गाडी थांबवली आणि भांडण केले. 'तुझ्यामुळे मला लोकांनी मारले' असे म्हणत धकाबुक्की केली. ती खाली पडली व मोठा दगड उचलून डोक्यात घाकला. तिचा जीव घेतला व घरी निघून आलो, अशी कबुली प्रमोदने दिली.

या गुन्ह्यात कोणताही तांत्रिक व प्रत्यक्षदर्शी पुरावा नसूनसुद्धा अत्यंत कौशल्याने स्थानिक गुन्हे शाखेने हा गुन्हा उघडकीस आणला. (तभा वृत्तसेवा)

# मागील तीन वर्षांत जीडीपी सरासरी ८.३ टक्के : सीतारामन्

## लोकसभेत आर्थिक कामगिरीचा आढावा सादर

**नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

मागील तीन वर्षांत भारताचा सरासरी जीडीपी ८.३ टक्के होता, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी मंगळवारी लोकसभेत दिली.

यावेळी त्यांनी देशातील नियंत्रित महागाई, शाश्वत जीडीपी वाढ आणि उत्पादन क्षेत्रातील लवचिकता या मुद्यांवर भर दिला. सीतारामन् म्हणाल्या, गेल्या तीन वर्षांत भारताचा जीडीपी हा सरासरी ८.३ टक्के होता, तो स्थिर आणि शाश्वत वाढ दर्शवत आहे. दुसऱ्या तिमाहीत जीडीपी ५.४ टक्के अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे त्यांनी मान्य केले. ते तात्पुरते अपयश असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पुढे त्यांनी येत्या तिमाहीत अर्थव्यवस्थेत निरोगी वाढ दिसून येईल, असे आश्वासन दिले.

विरोधी पक्ष करीत असलेल्या सामान्य मंदीच्या दाव्याचे खंडन करताना, सीतारामन् म्हणाल्या की, अर्ध्या उत्पादन क्षेत्रांमध्ये मजबूत वाढ दिसून येत आहे. काही क्षेत्रांमध्ये झालेली घसरण औद्योगिक क्रियांमध्ये व्यापक मंदीचे संकेत देत नाही, परिस्थिती सुधारत असताना या क्षेत्राची पुन्हा उभारी घेण्याची क्षमता पुन्हा दर्शवत आहे.

**सीतारामन् यांनी मांडलेले मुद्दे**

- देशात अंदाजे ३३ कोटी कुटुंबे आहेत आणि ३२.६५ कोटी कुटुंबांना एलपीजी जोडणी मिळाली आहे. यापैकी (३२.६५ कोटी) १०.३३ कोटी उज्ज्वला लाभार्थी आहेत. काँग्रेसच्या काळात एलपीजी गॅस एक विशेषाधिकार होता; परंतु रालोआच्या काळात प्रत्येक कुटुंबात पोहोचला.
- १९९९-२००४ मध्ये महागाई ३.९ टक्के होती, २००४-२००९ मध्ये ती ६.९ टक्क्यांपर्यंत वाढली आणि पुन्हा २००९-२०१४ दरम्यान ती सुमारे १० टक्क्यांपर्यंत गेली. नंतर रालोआ सरकारच्या काळात ती पुन्हा ५टक्क्यांवर आणली. (वृत्तसंस्था)



## मत्स्यव्यवसाय योजनांच्या लाभांसाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन

**सोलापूर दि. १७ डिसेंबर-**

मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत येणाऱ्या योजनांच्या लाभासाठी जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायाशी संबधित व्यक्ती व संस्था यांनी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय डीजिटल प्लॅटफॉर्म (एन.एफ.डी.पी) पोर्टलवर नोंदणी करावी असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यसाय रत्नाकर राजम यांनी केले आहे. जिल्ह्यातील सर्व वैयक्तिक मच्छिमार, मत्स्यसवंर्धक/ झचचडध लाभार्थी तसेच सर्व मच्छिमार सहकारी संस्था, मत्स्यव्यवसाय विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणेसाठी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय डीजिटल प्लॅटफॉर्म (एन.एफ.डी.पी) पोर्टलवर नोंदणी असणे आवश्यक आहे. सदरची नोंदणी https://NFDP.dof.gov.in या लिंकवर स्वतः किंवा नजीकच्या सीएससी केंद्रात आधारकार्ड, बँक पासबुक यासह जाऊन विनामुल्य करता येईल. तसेच ई-श्रम कार्डसाठीची नोंदणी https://eshram.gov.in या लिंकवर करावी. अपघात गट विमा नोंदणीबाबतची ३१ कॉलम ची माहिती तसेच के.सी.सी बाबतची माहिती या कार्यालयात सादर करावी असेही सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय श्री.राजम यांनी कळविले आहे.

# फार्मा, वेलनेस क्षेत्रात बजाज फिनसर्व्ह आशावादी

**मुंबई, १७ डिसेंबर**

गेल्या काही महिन्यांत आर्थिक बाजारपेठांनी मोठ्या प्रमाणात अस्थिरता अनुभवली आहे, ज्यामुळे गुंतवणूकदार चिंतेत आहेत. तीन हजार पॉईंट्सची मोठी घसरण झाल्यानंतर काहीशी सुधारणा झाली, ज्यामुळे अनिश्चिततेची भावना निर्माण झाली. मात्र, या गोंधळाच्या काळात बजाज फिनसर्व्ह एएमसीचे वरिष्ठ फंड व्यवस्थापक सोरभ गुप्ता काही विशिष्ट क्षेत्रांबाबत विशेषतः फार्मा आणि वेलनेस क्षेत्रांबाबत आशावादी आहेत.

इक्विटी बाजारपेठा प्रामुख्याने वास्तव आणि अपेक्षा या दोन घटकांचे मिश्रण असतात. वास्तवाबद्दल गुप्ता सांगतात की, ते काहीसे बदलत आहे; कारण जीडीपी वाढीचे निराशाजनक आकडे आणि जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांकडून मिळणाऱ्या संमिश्र संकेतांमुळे अशी स्थिती निर्माण झाली आहे. या बदलत्या वास्तवामुळे आणि दीड वर्षातील उंचावलेल्या परताव्याच्या अपेक्षेमुळे बाजारातील अंदाज अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. मात्र, अल्पकालीन चढ-उतार असूनही, जीडीपी आकडेवारीतील सध्याचा खडतर टप्पा तात्पुरता असून, कालांतराने परिस्थिती सुधारेल, असा विश्वास आहे.

वेलनेस क्षेत्रातही आशावाद दिसून येतो, जो भारताच्या आयुर्वेद आणि योगाच्या समृद्ध परंपरेवर आधारित आहे. या क्षेत्रात आयुर्वेद, ओटीसी उत्पादने, वेलनेस रिसॉर्ट्स, ध्यानसेवा आणि सेंद्रिय अन्न व पोषणावर लक्ष केंद्रित करणाऱ्या ब्रँड्समध्ये संधी आहेत, यावर त्यांचा विश्वास आहे. सोरभ फार्मास्युटिकल उद्योगालाही महत्त्वाचे वाढीचे क्षेत्र मानतात, ज्यात सीडीएमओ, यूएस जनरिक्स आणि देशांतर्गत फार्मास्युटिकल्स यात मोठ्या संधी आहेत. आरोग्यसेवा आणि वेलनेस उत्पादनांच्या मागणीत वाढ होत असल्याने या क्षेत्रांना विस्तारासाठी अनुकूल परिस्थिती आहे. यामुळे फार्मास्युटिकल उद्योग आकर्षक ठरत आहे आणि बजाज फिनसर्व्ह एएमसीने या क्षेत्रात जास्त गुंतवणूक टिकवून ठेवली आहे, असे ते सांगतात. (वृत्तसंस्था)

# साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून या


## शरद पवारांचे पंतप्रधान मोदींना पत्र


**नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन येत्या २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान दिल्लीतील तालकटोरा स्टेडियम येथे होणार आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या संमेलनाला उद्घाटक म्हणून यावे, यासाठी शरद पवारांनी त्यांना पत्र लिहिले आहे तसेच शरद पवारांनी याबाबत पंतप्रधान कार्यालयाशी चर्चा केली आहे.

नरेंद्र मोदी साहित्य संमेलनाला येतील, असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला. संमेलनाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मंगळवारी संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी संमेलनस्थळाची पाहणी केली, यावेळी त्यांनी ही माहिती दिली.

शरद पवारांनी मंगळवारी तालकटोरा स्टेडियमला भेट देत तिथे उपलब्ध असलेल्या आसन क्षमता, संमेलनाला येणाऱ्यांची निवास आणि जेवणाची व्यवस्था, पुस्तक प्रदर्शन स्थळ आदी गोष्टींची पाहणी केली. संमेलन भव्यदिव्य होण्यासाठी नियोजन





व्यवस्थित व्हावे, सुरक्षे बाबत काटेकोर उपाययोजना कराव्या, अशा सूचना शरद पवारांनी केल्या. स्थळ पाहणीसाठी शरद पवारांसह आयोजक संस्था सरहदचे अध्यक्ष संजय नहा प्रामुख्याने उपस्थित होते. महाराष्ट्र ही सलोख्याची आणि समन्वयाची भूमी आहे. ही ओळख निर्माण होण्यात मराठी वाङ्मयाचा मोठा वाटा आहे. भारताचे वैचारिक प्रतिनिधित्व करण्यात महाराष्ट्राचा आणि मराठी साहित्याचा मोठा वाटा राहिला आहे. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या माणसांनी साहित्यात आणि देशाच्या जडणघडणीतही महत्त्वाचे योगदान दिले आहे. देशाच्या राजधानीत संमेलन होत असताना महाराष्ट्राच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण करून मराठी साहित्याला जागतिक व्यासपीठावर कसे नेता येईल, यादृष्टीने प्रयत्न या संमेलनाच्या अनुषंगाने करणार असल्याचे यावेळी शरद पवार यांनी सांगितले. यावेळी बोलताना संजय नहार म्हणाले की, हे संमेलन स्मरणीय कसे होईल, या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. हे संमेलन मराठी साहित्याचा अनोखा सोहळा ठरणार असून, त्यातून मराठी साहित्य आणि सांस्कृतिक बंध विस्तारेल. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# वाराणसीतही सापडले पुरातन शिव मंदिर

## पूजेच्या परवानगीसाठी पोलिसांना पत्र

**◆ वाराणसी, १७ डिसेंबर**

वाराणसीच्या मुस्लिमबहुल परिसरात संभलप्रमाणेच मंदिर सापडल्याचा दावा करण्यात आला. सनातन रक्षक दलाने हे मंदिर उघडून पूजा-अर्चना करण्याची परवानगी पोलिसांना पत्रद्वारे मागितली आहे.

मंदिराच्या शेजारील घराच्या मुस्लिम मालकाने दावा केला की, ही माझी मालमत्ता असून, माझ्या वडिलांनी १९३१ मध्ये खरेदी केली होती. कोणताही गोंधळ न घालता कुणाला इथे येऊन पूजा करायची असल्यास त्याचे स्वागत असेल. वाराणसीच्या दशाश्वमेध पोलिस ठाण्याच्या अंतर्गत मदनपुरा परिसरात गोल चबुतऱ्याजवळ मुस्लिमांच्या घराजवळ एक मंदिर आहे. हे सिद्धेश्वर महादेव मंदिर असून, जवळपास अडीचशे वर्षे जुने आहे. मात्र, ते कित्येक दशकांपासून बंद आहे.

याबाबत सनातन रक्षक दलाने पोलिस ठाण्याला प्रार्थनापत्र पाठवले असून, त्यानंतर मंदिराच्या बाहेर सुरक्षा वाढवण्यात आली. मंदिर आणि आजूबाजूच्या जमिनीवर मुस्लिम कुटुंबाने कब्जा केला असल्याचा आरोप या पत्रात करण्यात आला. मंदिरात पूजा-अर्चना होऊ नये म्हणून



त्याला कुलूप लावून ठेवले आहे. माझ्या वडिलांनी १९३१ मध्ये ही मालमत्ता विकत घेतली होती. त्यात या मंदिराचाही समावेश होता. इतकेच नव्हे, तर या मंदिराची दुरुस्ती, स्वच्छता ठेवणे आणि रंग देण्याचे कामही आम्हीच करतो, असे मालकाने म्हटले आहे. माझे वडील आणि काकांसह एकूण चार कुटुंबांतील २५ जण येथे राहतात. दस्तावेजांबाबत विचारल्यास काका बाहेर राहतात. तेच घर आणि मंदिराचे दस्तावेज कुठे असल्याचे सांगू शकतील, असे मुस्लिम कुटुंबाने सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

## दुसऱ्या मुस्लिमबहुल भागातही सापडले मंदिर

### पोलिसांनी उघडले कुलूप

**◆ संभल, १७ डिसेंबर**

उत्तरप्रदेशातील संभलच्या मुस्लिमबहुल भागात ४६ वर्षांपासून बंद असलेले मंदिर सापडल्यानंतर उडालेली खळबळ शांत होत नाही, तोच दुसऱ्या मुस्लिमबहुल परिसरात अतिक्रमणविरोधी मोहिमेत मंदिर सापडले आहे. हे मंदिर हयातनगर पोलिस ठाणे हद्दीतील सरायतरीन परिसरात सापडले. पहिले मंदिर संभलच्या खग्गू सराय परिसरात सापडले होते.

सरायतरीन भाग मुस्लिमबहुल आहे. मात्र, येथे कोणतेही अतिक्रमण आढळले नाही. मंदिराचा दरवाजा उघडला असता, आत हनुमान आणि राधा-कृष्णाच्या सुंदर मूर्ती सापडल्या. हिंसाचारानंतर संभलमध्ये समाजकंटकांच्या विरोधात शोधमोहीम राबवली जात आहे. या कारवाईत येथे होत असलेली वीजचोरी पाहून पोलिस अधीक्षक कृष्णकुमार बिश्नोई भडकले होते. त्यानंतर पोलिस आणि प्रशासनाने अवैध अतिक्रमण आणि वीजचोरीच्या विरोधात मोठी कारवाई सुरू केली. ◀(वृत्तसंस्था)

# रशियात स्फोट घडवून अणुसंरक्षण प्रमुखाची हत्या

## युक्रेन सिक्युरिटी सर्व्हिसने स्वीकारली जबाबदारी

**◆ मॉस्को, १७ डिसेंबर**

मॉस्कोत घडवण्यात आलेल्या स्फोटात रशियाच्या अणुकार्यक्रमाचे प्रमुख इगोर किरिलोव्ह यांचा मृत्यू झाला. राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचे ते निकटवर्तीय होते. हा स्फोट राष्ट्रपती भवनापासून केवळ सात किमी अंतरावर झाला. किरिलोव्ह यांची हत्या आम्हीच घडवली, असा दावा युक्रेनच्या सिक्युरिटी सर्व्हिसने केला.

इगोर किरिलोव्ह अपार्टमेंटच्या बाहेर पडत असताना जवळच पार्क करून ठेवलेल्या एका स्कूटरचा भीषण स्फोट घडवण्यात आला. या स्फोटात इगोर किरिलोव्हसोबत त्यांच्या सहायकाचाही मृत्यू झाला. स्फोटासाठी ३०० ग्रॅम टीएनटी वापरण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला.

या वर्षी ऑक्टोबर महिन्यात ब्रिटनमध्ये इगोर यांच्यावर प्रतिबंध लादण्यात आले तसेच युक्रेनवर रासायनिक शस्त्रे वापरल्याचा आरोपही करण्यात आला. त्यांच्या हत्येसाठी घडवलेल्या स्फोटाची चित्रफीत समाज माध्यमावर व्हायरल झाली आहे. यात इमारतीचा मलबा पडलेला तसेच रक्तबंबाळ अवस्थेत दोन मृतदेह पडून असल्याचे दिसत आहे.

स्फोटाच्या तीव्रतेमुळे इमारतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुनियोजितपणे कट रचून हत्या करण्यात आली, असे रशियन संसदेच्या उपसभापतींनी सांगितले. इगोर यांच्या हत्येचा सूड घेतला जाईल, असेही ते म्हणाले.

किरिलोव्ह युद्ध गुन्हेगार होते आणि ते युक्रेनच्या लक्ष्यावर होते. बंदी असलेल्या रसायनांचा वापर युक्रेनच्या सैन्यावर करण्याचा आदेश त्यांना दिला होता. युक्रेनी नागरिकांची हत्या करणाऱ्यांचा हा अंत आहे, अशी माहिती सूत्राने सीएनएनला दिली. इगोर किलिरोव्ह यांना एप्रिल २०१७ मध्ये अणुदलाचे प्रमुख करण्यात आले होते. ◀(वृत्तसंस्था)



राजस्थानमधील भाजपा सरकारला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त जयपूर येथे मंगळवारी आयोजित 'एक वर्ष परिणाम उत्कर्ष' कार्यक्रमाच्या रॅलीत सहभागी झालेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा

# खासदार भरती परीक्षेत १०० पैकी १०१.६६ गुण

**◆ इंदूर, १७ डिसेंबर**

मध्यप्रदेश सरकारी भरती परीक्षेत सामान्यकरण प्रक्रियेचा अवलंब केल्यामुळे एकूण १०० पैकी १०१.६६ गुण मिळालेल्या उमेदवारावर प्रश्न उपस्थित करीत नोकरीसाठी इच्छूक उमेदवारांनी आंदोलन केले. आंदोलकांनी भरती परीक्षेत फसवणूक झाल्याचा आरोप करीत निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

सामान्यकरण ही एक प्रक्रिया आहे. याद्वारे विद्यार्थ्यांनी जे पेपर सोडविले, त्यात त्यांना कोणत्याही प्रकारचा फायदा किंवा तोटा होणार नाही, याची खात्री असते. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या गुणांची दुसऱ्याच्या गुणांशी तुलना करता येईल, अशा प्रकारे सुधारणा करणे समाविष्ट आहे. जेव्हा एकाच विषयाची परीक्षा अनेक सत्रांमध्ये घेतली जाते, प्रत्येकाचा पेपर वेगळा असतो, तेव्हा हे आवश्यक आहे. काही आंदोलक बेरोजगार तरुणांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकत्र येऊन मुख्यमंत्री मोहन यादव यांना उद्देशून निवेदन दिले, असे त्यांनी सांगितले. वन आणि तुरुंग विभागाच्या संयुक्त भरती परीक्षेत एका उमेदवाराने १०० पैकी १०१.६६ गुण मिळवले आणि निवड यादीत अव्वल स्थान मिळवले.

नियमानुसार भरती परीक्षेत सामान्यकरणाची प्रक्रिया स्वीकारली आहे. यामुळे उमेदवार पूर्ण गुण म्हणजे १०० पेक्षा जास्त आणि शून्यापेक्षा कमी गुण मिळवू शकतात, असे निकाल जाहीर झाल्यानंतर बोर्डाने स्पष्ट केले. ◀(वृत्तसंस्था)

# अखेर ३ कोटी ७३ लाख २४ हजारांच्या निविदांना हिरवा कंदील

### जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी | प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिनकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत पावणे चार कोटीच्या विविध विकास कामांच्या निविदांना मंजुरी देण्यात आली. जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा प्रशासक तथा जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकास यंत्रणेच्या सभागृहात झाली.

सभेच्या विषय पटलावर सात विषय होते. प्रारंभी १८ सप्टेंबर रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यात आले. त्यानंतर बांधकाम विभाग क्रमांक एक कडील ही रस्ते केगाव रस्ता सुधारणा करणे या १ कोटी १३ लाख २० हजार रुपये किमतीच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. त्याचबरोबर बार्शी तालुक्यातील नारी ते भातंबरे रस्ता, मालवडी ते कापसेवाडी, कुसळंब ते वानेवाडी, पिंपळगाव धस ते चिपडे वस्ती, आगळगाव ते थिटे वस्ती जोड रस्ता सुधारणा करण्याच्या ७७ लाख ८५ हजार किमतीच्या निवेदला मंजुरी देण्यात आली. त्याचबरोबर अक्कलकोट तालुक्यातील शिरवळ ते बनजगोळ- हत्तीकणबस रस्ता



सुधारणा करण्याच्या ८५ लाख १ हजार ७२४ रुपये किमतीच्या निवेदला मंजुरी देण्यात आली.

हल्लूर येथे बहुउद्देशीय सभागृह बांधण्याच्या ९० लाख ५६ हजार ६०१ रुपयाच्या निवेदला मंजुरी देण्यात आली. त्याचबरोबर बार्शी तालुक्यातील तडवळ, दहिटणे, राळेरास धामणगाव, दहीटणे, सासुरे या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या ९७ लाखाच्या निवेदला मंजुरी देण्यात आली. अशाप्रकारे या सभेत ३ कोटी ७३ लाख २४ हजार १६७ खर्चाच्या विविध विकास कामांच्या निवेदला मंजुरी देण्यात आल्या. त्याचबरोबर अध्यक्षाच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयावर यावेळी चर्चा करण्यात आली. सभेचे सचिव तथा प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी विषयांचे वाचन केले. या सभेला सर्व विभाग व खातेप्रमुख उपस्थित होते.

## अमेरिकेतील १८ हजार भारतीय अडचणीत

**◆ नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

२० जानेवारी रोजी डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष म्हणून व्हाईट हाऊसचा ताबा घेतील. आपण राष्ट्राध्यक्ष झालो तर, अमेरिकेचे स्थलांतरित धोरण म्हणजे दुसऱ्या देशांतून अमेरिकेत येणाऱ्यांसाठी नियम कठोर करू, असे ट्रम्प यांनी प्रचारादरम्यान वारंवार बोलून दाखवले होते. यामुळेस तब्बल १८ हजार भारतीयांवर अमेरिकेतून परत पाठवले जाण्याची टांगती तलवार आहे.

दुसऱ्या देशांमधून विविध कारणांच्या आधारे अमेरिकेत स्थायिक होणाऱ्यांचा मुद्दा अमेरिकेच्या यावेळच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत गाजला. याबद्दल आपण कठोर भूमिका घेऊ, आजवरची सर्वांत मोठी मास डिपोर्टेशन म्हणजे लोकांना अमेरिकेतून त्यांच्या देशात परत पाठविण्याची मोहीम आपण राबवू, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी यापूर्वीच जाहीर केले. यासाठी अगदी सैन्याचा वापर करायची, प्रचंड खर्च करायचीही तयारी असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे.

अमेरिकेच्या इमिग्रेशन अॅण्ड कस्टम एन्फोर्समेंटने (आयसीई) अशा साडे चौदा लाख लोकांची यादी जाहीर केली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# संसदेत प्रथमच झाले इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान

## एक देश एक निवडणूक विधेयकाचा मुद्दा

**◆ नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

नवीन संसदभवनात आज प्रथमच एक देश एक निवडणूक विधेयकावर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान घेण्यात आले. याबाबतची माहिती लोकसभेच्या महासचिवांनी सभागृहाला दिली. सदस्यांनी मतदान नेमके कसे करावे, ते त्यांनी सांगितले.

आपले मतदान योग्य प्रकारे झाले नाही, आपण जे मत दिले ते योग्य प्रकारे पोहोचले नाही, असे ज्या सदस्यांना वाटत असेल, त्यांना कागदाच्या माध्यमातूनही मतदान करता येईल, असे सभापती ओम बिर्ला यांनी स्पष्ट केले. सुरुवातीला या विधेयकावर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान घेण्यात आले. नंतर विरोधी पक्षांच्या काही सदस्यांनी मागणी केल्यामुळे कागदाच्या माध्यमातूनही मतदानाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

### म्हणाल तेवढे दिवस चर्चा करू : ओम बिर्ला

विरोधी सदस्य या विधेयकाला विरोध करण्यासाठी नियमांचे पुस्तक घेऊन आक्षेप घेत होते. यावर तुम्ही नियमांचे पुस्तक घेऊन बसले असाल, ती मी सुद्धा नियमांच्या पुस्तकांच्या आधारेच सभागृहाचे कामकाज चालवत आहे, असे ओम बिर्ला यांनी म्हटले. या विधेयकावर आधी संयुक्त संसदीय समितीत व्यापक चर्चा होणार आहे, याकडे लक्ष वेधत बिर्ला म्हणाले की, नंतर सभागृहातही या विधेयकावर सखोल चर्चा केली जाईल. विरोधी सदस्य म्हणतील तेवढे दिवस या विधेयकावर आपण सभागृहात चर्चा करू. सर्व सदस्यांना या चर्चेत सहभागी होण्याची संधी दिली जाईल. ◀(तभा वृत्तसेवा)

### विधेयकामुळे देशाचा वेगवान विकास : भाजपा

एक देश एक निवडणूक विधेयकामुळे देशाचा वेगवान विकास होईल. वारंवार निवडणुका घ्याव्या लागत असल्यामुळे विकासाच्या प्रक्रियेत अडथळा येतो, असे विधेयकाचे समर्थन करताना भाजपाने म्हटले.

### संविधानाच्या मूळ भावनेच्या विरोधात : विरोधक

हे विधेयक संविधानाच्या मूळ गाभ्याच्या विरोधात असल्यामुळे ते सरकारने वापस घ्यावे, अशी मागणी काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी केली. हे विधेयक संसदीय लोकशाही तसेच संघराज्य भूमिकेच्या विरोधात असल्याचे काँग्रेसचे मनीष तिवारी म्हणाले. या विधेयकातून राष्ट्रपतींना तसेच निवडणूक आयोगालाही निवडून आलेले राज्य सरकार बरखास्तीचा अधिकार मिळणार असल्याचा दावा काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी केला. हे विधेयक सत्ताधारी पक्षाच्या हुकुमशाही मानसिकतेचे द्योतक असल्याचा आरोप सपाचे धर्मेंद्र यादव यांनी केला. तिथेच, हे विधेयक राज्यांची स्वायत्तता संपवणारे असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांनी केला.

# गुगलवर जाहिरातीशिवाय व्हिडीओ पाहणे महागणार!

## कोट्यवधी वापरकर्त्यांना झटका

**◆ नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

गुगल आपल्या लाखो यूट्युब वापरकर्त्यांना नवीन वर्षात मोठा धक्का देणार आहे. जाहिरातींशिवाय यूट्युबवर व्हिडीओ पाहणे अधिक महाग होणार आहे.

कंपनी जानेवारीपासून यूट्युब प्रीमियम सब्सक्रिप्शन प्लॅन महाग करणार आहे. कंपनीने अलिकडेच जागतिक स्तरावर यूट्युबचे सबस्क्रिप्शन प्लॅन वाढवले होते. यूट्युबची नवीन सदस्यता योजना १३ जानेवारीपासून प्रभावी होईल. त्यामुळे युजर्स १२ जानेवारीपर्यंत जुन्या दराने सबस्क्रिप्शन प्लॅन खरेदी करू शकतात. १३ जानेवारीपासून यूट्युब प्रीमियम सबस्क्रिप्शन प्लॅन महाग होईल. कंपनी पूर्वीपेक्षा १० डॉलर्स जास्त शुल्क आकारणार आहे.

सध्या यूट्युब प्रीमियमच्या बेसिक प्लॅनसाठी ७२.९९ खर्च करावे लागतील. प्लॅन दर सुधारित केल्यानंतर वापरकर्त्यांना ८२.९९ डॉलर्स खर्च येईल. अशा प्रकारे युजर्सला यूट्युब प्रीमियमसाठी १० डॉलर्स जास्त खर्च करावे लागतील.

सध्या भारतात यूट्युब प्रीमियमच्या किमतीत कोणतीही वाढ जाहीर करण्यात आलेली नाही. कंपनीचे म्हणणे आहे की, प्लॅटफॉर्मची सेवा सुधारण्यासाठी प्लॅनचे दर वाढवले जातील. ◀(वृत्तसंस्था)

# अखेर विधानपरिषद सभापती पदाची उद्या निवडणूक

## राम शिंदे यांचे नाव जवळपास निश्चित

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १७ डिसेंबर-**

गेल्या काही वर्षापासून प्रलंबित असलेल्या विधान परिषदेच्या सभापतीपदाच्या निवडीला आता मुहूर्त मिळाला आहे. हिवाळी अधिवेशनात गुरुवारी त्यासाठी मतदान होणार आहे. या पदासाठी भाजपाकडून राम शिंदे यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे उद्या ते उमेदवारी अर्ज भरणार असल्याचे सूत्राकडून सांगण्यात आले.

रामराजे निंबाळकर हे यांचा कार्यकाळ संपल्यापासून विधान परिषदेचे सभापती पद रिक्त आहे उपसभापती नीलम गोऱ्हे या पीठासनाधिकारी म्हणून काम पाहत आहेत. या पदाची निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी विरोधकाकडून वारंवार करण्यात येत होती. त्यानुसार राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या आदेशानुसार विधानपरिषदेच्या सभापती पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज जाहीर केला. या पदासाठी १८ डिसेंबरला दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यानंतर अर्जांची छानणी होणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. भाजपकडून राम शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे. उद्या सकाळी राम शिंदे अर्ज दाखल करण्याची शक्यता शिंदे यांचे पुनर्वसन करण्यात येत आहे.

दरम्यान,राष्ट्रवादीकडून मुख्य प्रतोद व प्रतोद पदाच्या निवडी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुख्य प्रतोदपदी चेतन तुपे यांची निवड होण्याची शक्यता आहे. तर प्रतोदपदी चिपळूणचे आमदार शेखर निकम यांची घोषणा केली जाऊ शकते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून विधानसभा अध्यक्ष यांच्याकडे या दोन्ही आमदारांची नावे पाठविण्यात आल्याची माहिती आहे.

## जमिनीच्या खाली आहे हायड्रोजनचा खजिना

**नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

पृथ्वीच्या पोटात हायड्रोजनचा पर्वत आहे. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की, यातील थोडेसे वापरले तर, २०० वर्षे जीवाश्म इंधनाची गरज भारणार नाही. पृथ्वीच्या पोटात सुमारे ६.३ ट्रिलियन टन हायड्रोजन आहे. हे हायड्रोजन दगड आणि भूमिगत जलाशयात आहे.

हे हायड्रोजन पृथ्वीवर असलेल्या तेलापेक्षा २६ पट जास्त आहे. पण, समस्या अशी आहे की, शास्त्रज्ञांना या हायड्रोजनचे नेमके स्थान माहीत नाही. जो सापडला आहे, तो एकतर समुद्रात आहे किंवा किनाऱ्यापासून खूप दूर खोल आहे. त्याचे प्रमाण जास्त नाही, त्यामुळे तिथून हायड्रोजन काढणे फायदेशीर नाही. हायड्रोजन मोठ्या प्रमाणात आहे. हा एक स्वच्छ ऊर्जेचा सर्वांत मोठा स्रोत आहे. याचा फायदा वाहन चालवण्यासाठी होऊ शकतो. यातून वीज निर्माण होऊ शकते. एवढ्या मोठ्या हायड्रोजन साठ्यापैकी फक्त २ टक्के म्हणजे १२४ कोटी टन संपूर्ण जगाला निव्वळ शून्य उत्सर्जनापर्यंत नेऊ शकतो. ही वीज २०० वर्षे पृथ्वीला पुरते. प्रदूषणातून पृथ्वीची सुटका होण्यास मदत होऊ शकते.हायड्रोजनची समान मात्रा जीवाश्म इंधनाच्या दुप्पट ऊर्जा निर्माण करते. सारा आणि जेफ्री यांचा अभ्यास नुकताच सायन्स अॅडव्हान्सेस जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे.

# अजित पवार पुन्हा नॉट रिचेबल! अर्थसाठी अधिवेशनाला दांडी?

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**नागपूर, दि.१७ डिसेंबर-**

महायुती सरकारमध्ये मंत्रिमंडळ मिळाल्याने घटक पक्षातील अनेक आमदार नाराज असतानाच आता सरकारमधील एक उपमुख्यमंत्री असलेले अजित पवार हे देखील नाराज असल्याची चर्चा सुरू आहे.

दोन दिवसापासून ते अधिवेशनात सहभागी झाले नसून फोनवरही उपलब्ध नाहीत. त्यांच्या नोटरीचेबल होण्यामागे अर्थ खाते मिळत नसल्याची असल्याने दबाव तंत्रासाठी ते अंडरग्राउंड झाले असल्याचे चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला शनिवारी नागपुरातील राजभवनावर मंत्रिमंडळाचा विस्तार झाला त्यामध्ये ३३ कॅबिनेट व सहा राज्य मंत्र्यांना शपथ देण्यात आली त्यापूर्वी पाच डिसेंबरला मुंबईत आझाद मैदानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शपथ घेतली होती मात्र त्याला बारा दिवस उलटूनही अद्याप खातेवाटप झालेले नाही त्यामुळे भाजपाचे मित्र पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट यामध्ये अस्वस्थता आहे अजित पवार यांना अर्थात खाते हवे असून शिंदे गृह विभागासाठी आग्रही आहेत मात्र भाजपाने ते देण्यास नकार दिल्याने त्यांचा अर्थकापेत मिळावे यासाठी आग्रह सुरू असल्याचे समजते यातूनच महायुतीतील नेत्यांमध्ये नाराजी नाट्य सुरू आहेत. अजित पवार हे शनिवारी मंत्रिमंडळ विस्तार शपथविधी व त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या चहापान सोहळ्याला उपस्थित होते. मात्र ते सोमवारी व आज दुसऱ्या दिवशी अधिवेशनाकडे फिरकले नाहीत. ते कोणाचाही फोन उचलत नसेल त्यांच्या दौऱ्यावर




माहिती त्यांच्या कार्यालयाकडून व पक्षाकडून देण्यात आलेले नाही त्यामुळे ते कोठे गेले आहेत असा प्रश्न उपस्थित झाला आहे सूत्रांच्या माहितीनुसार अजित पवार यांनी सोमवारी सकाळी दिल्लीला गेले असून आपल्याला आवश्यक असलेले खाते मिळवण्यासाठी अमितच्या यांची मानधने करत असल्याचे सांगण्यात येते मात्र त्यांच्या पक्षाच्या नेत्यांनी ठेवलं अजित दादा हे नागपुरातच आहेत, योग्य वेळी प्रसारमाध्यमासमोर येथील असे सांगितले. अजित पवार यांच्या अनुसूचित अनुपस्थितीची चर्चा विधिमंडळ परिसरात रंगली होती. त्याबाबत ठाकरे गटाचे सभागृह नेते भास्कर जाधव म्हणाले की, मंत्रिमंडळ दिल्याने छगन भुजबळ नाराज आहेत त्यांच्या समोर गेल्यास त्यांचा संतापाचा स्फोट होईल, त्यांचा टाळण्यासाठी ते अधिवेशनाला गैरहजर उपस्थित नसल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान,समाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी त्या अनुषंगाने एक्सवर उपरोधक पोस्ट केली आहे.

### एकनाथ शिंदेचीची सभागृहाला दांडी

उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोन दिवसापासून अधिवेशनाकडे फिरकले नसल्याने महायुतीमध्ये सर्वकाही अलबेला नसल्याचे चर्चा सुरू असताना आज दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ही सभागृहातील कामकाजात सहभागी नव्हते ते विधानभवनात येऊन काही कार आपल्या कार्यालयात थांबून होते. त्यामुळे खाते वाटपासाठी त्यांच्याकडून दबाव टाकला जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळातून होत आहे.

## लवकरच ओटीटीवर 'पुष्पा २'चे आगमन




**मुंबई** : 'पुष्पा २ : द रूल' या चित्रपटाने जवळपास सर्वच भारतीय चित्रपटांना मागे टाकले आहे. अल्लू अर्जुन आणि रश्मिकाच्या या चित्रपटाने नुसती धम्माल उडवून दिली आहे. आतापर्यंत ११०० कोटींहून अधिक कमाई केलेल्या या चित्रपटाचे लवकरच ओटीटीवरही पदार्पण होणार आहे. प्राप्त माहितीनुसार, येत्या ९ जानेवारीपासून 'पुष्पा २' नेटफ्लिक्सवर अनेक भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. मात्र, निर्मात्यांकडून याविषयी अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. एरवी चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यानंतर ओटीटीवर चित्रपट येण्यासाठी ४० ते ५० दिवसांचा कालावधी लागतो.

## अग्रलेख...

# अडलेले घोडे आणि घोडदौड

अधिकृतरीत्या आणि नियमानुसार विरोधी पक्ष नेतेपद मिळविण्याइतपत संख्याबळ मिळवू न शकलेल्या महाराष्ट्रातील विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीचे घोडे ईव्हीएमवर अडकलेले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने घोडदौड सुरू केली आहे. १६ डिसेंबर २०२४ पासून नागपूर येथे महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १५ तारखेला रिवाजाप्रमाणे चहापान ठरले होते. त्यावर महाविकास आघाडीने रिवाजाप्रमाणेच बहिष्कार टाकला. ईव्हीएमच्या नावाने बोंबा ठोकणे हासुद्धा आता विरोधकांचा रिवाजच झालेला आहे. त्यानुसार अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ईव्हीएम हटावचे नारे देत विरोधकांनी कंठशोष केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने जोरात आपटी खाल्ली. त्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने चांगले यश मिळविले. तेव्हाही ईव्हीएमवरच निवडणूक झाली होती. पण, लोकसभा निवडणुकीतील यशाला सर्वांनी घट्ट मिठी मारली आणि स्वतःची पाठ थोपटून घेतली. आता विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा मतदारांनी पार 'निकाल' लावला तेव्हा मात्र त्यांनी ईव्हीएमच्या नावाने बोंबा मारणे सुरू केले आहे. या निरर्थक वितंडवादाकडे ना लोक गांभीर्याने पाहताहेत ना सरकार. महायुतीच्या सरकारने आपले काम सुरू केले आहे. राज्य विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महायुती सरकारने ३५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या आणि आपल्या कामाच्या दिशेची चुणूक दाखवून दिली. माझी लाडकी बहीण योजनेसाठी १४०० कोटी, बळीराजा वीज सवलत योजनेसाठी ३१५० कोटी, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी ७००० कोटी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांसाठी ४११२ कोटी, इतर मागास बहुजन कल्याण विभागासाठी २६०० कोटी, जलसंपदा खात्यासाठी २१६५ कोटी, कृषी आणि पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य व्यवसायाकरिता २१४७ कोटी, ग्रामविकास विभागासाठी २००७ कोटी, आदिवासी विकासासाठी ८३० कोटी तसेच सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग १३७७ कोटी अशा पुरवणी मागण्या मांडून त्या तरतुदी महायुती सरकारने करून घेतल्या. विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने ९४ हजार कोटी रुपयांच्या मागण्या सादर केल्या होत्या. आता यावेळी महायुती सरकारने घोषित योजनांसाठी पुरवणी मागण्या मांडून आपण शब्द पाळणाऱ्यांचे सरकार आहोत, हे सिद्ध करून दिले. या पुरवणी मागण्या अधिवेशनाच्या अखेरीस चर्चेअंति मंजूर होतील आणि ज्या घटकांना लाभ द्यायचे आहेत, त्यांना ते मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सादर करण्यात आलेल्या एकूण ३५ हजार ७८८ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांपैकी २१ हजार कोटींच्या मागण्या कार्यक्रमांसाठी करावयाच्या खर्चाच्या आहेत आणि सुमारे ९००० कोटींच्या मागण्या या अनिवार्य खर्चाच्या आहेत. केंद्र पुरस्कृत योजनांसाठी अर्थसाहाय्य प्राप्त व्हावे यासाठी भरीव तरतूद केली गेली आहे. मुंबईतील मेट्रोपासून शेतकरी, शेती, सिंचन ते लाडक्या बहिणी अशी महायुती सरकारच्या कल्याणकारी विचारांची रेंज आहे. नेतृत्वामुळे आणि इच्छाशक्तीमुळे हा असा फरक शासन-प्रशासनात दिसून येतो. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती एका नव्या पर्वासाठी सिद्ध झाली आहे. फडणवीस हे कर्तबगार लोकनेते आहेत, हे यापूर्वीच सिद्ध झालेले आहे. मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्याच कारकीर्दीत त्यांनी औद्योगिक विकास, परकीय गुंतवणूक, पायाभूत सुविधांचा विकास, सामाजिक कल्याण आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या क्षेत्रात उत्तम काम केले. आता महायुती सरकारने शेतकरी आणि महिलांपासून तरुण आणि शहरी व्यावसायिकांपर्यंत विविध घटकांच्या जीवनाला स्पर्श करून समाजातील विविध घटकांच्या जीवनात बदल आणण्याचे ठरविलेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व मजबूत, स्थिर आणि निर्णायक आहे. युतीच्या राजकारणात आव्हाने अधिक असतात. त्यांचा यशस्वी सामना करून फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यांना एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या दोन अनुभवी नेत्यांची उपमुख्यमंत्री म्हणून समर्थ साथ मिळते आहे. फडणवीस यांची राजकीय कुशाग्रता, आश्वासने पूर्ण करण्यासाठी त्यांची बांधिलकी हे सारे वादातीत आहे. त्यामुळेच एरवी युती-आघाडीच्या सरकारांमध्ये दिसणारी अस्थिरता महायुतीच्या सरकारमध्ये कुठेही नाही आणि त्यामुळेच आर्थिक विकास हा अजेंड्याचा मुख्य विषय घेऊन या सरकारने काम सुरू केले आहे. यापूर्वीचा काळ पाहिला तर जागतिक पातळीवर गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी मॅग्नेटिक महाराष्ट्रसारख्या उपक्रमांना मिळालेले यश दिसते. मुंबईतील अटल सेतू, कोस्टल रोड, मेट्रो आणि मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग ही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात साकारलेल्या प्रकल्पांची उदाहरणे. 'मेक इन महाराष्ट्र' आणि 'कौशल्य विकास' यांवर सरकारने लक्ष केंद्रित केल्यामुळे औद्योगिक विकासात; विशेषतः माहिती तंत्रज्ञान, उत्पादन आणि कृषी यासारख्या क्षेत्रांमध्ये राज्य अग्रेसर ठरते आहे. कोविडचा काळ आणि महाविकास आघाडीचा बिघाडीचा कारभार ही अडीच वर्षे वगळली तर गेल्या दशकभरातील साडेसात वर्षे महाराष्ट्राने केवळ विकासच अनुभवला. त्याची प्रचीती येणारे क्षेत्र म्हणजे शेती. दुष्काळ, अतिवृष्टी यासारखी आव्हाने असतानाही शेती स्थिरावते आहे. देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यावर भर दिला आहे. 'जलयुक्त शिवार अभियान' ही अत्यंत यशस्वी योजना. उन्हाळ्यातही हिरवीगार शिवारे महाराष्ट्रात पाहायला मिळत आहेत. याशिवाय, महायुती सरकारने महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, त्यांना आरोग्यसेवा, शिक्षण आणि आर्थिक संधींमध्ये अधिकाधिक प्रवेश प्रदान करण्याच्या उद्देशाने अनेक कार्यक्रम सुरू केले आहेत. उद्योजकता आणि आर्थिक स्वावलंबन यांना प्रोत्साहन देण्यासाठी महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. लैंगिक छळ, कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या गुन्ह्यांवर कडक कायदे करून फडणवीस प्रशासनाने महिलांच्या सुरक्षेवरही लक्ष केंद्रित केले आहे. उपेक्षित समुदायांसाठी सरकारने कौशल्य विकास, शिक्षण आणि नोकऱ्या अशा तीन पातळ्यांवर काम केले. ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे नागरिकांना थेट सरकारी सेवांशी जोडणाऱ्या 'आपले सरकार' योजनेमुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता सुनिश्चित केली आहे. महायुती सरकारनेही शिक्षण आणि आरोग्य सुधारणांवर भर दिला आहे. महानगरे, शहरे, निमशहरी भाग, ग्रामीण भाग, आदिवासीबहुल विभाग अशा सर्व क्षेत्रांकडे महायुती सरकारचे लक्ष असल्याचा पुरावा म्हणून सरकारच्या कामांची यादीच सांगायची झाली तर ती फार मोठी होईल. यांत सर्वांत महत्त्वाचे आहे ती दिशा आणि लक्ष्य. कोणत्या मार्गाने जायचे आणि कुठे जायचे, याबद्दल स्पष्टता आहे. त्यामुळेच पुरवणी मागण्या मांडताना त्यातील दिशा आणि लक्ष्य स्पष्ट दिसते. लाडक्या बहिणींना लवकरात लवकर त्यांच्या हक्काचा निधी द्यायचा आहे, याचे भान सरकारला आहे. शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा आहे, ही भावना आहे. सिंचन, सहकार, शिक्षण, उद्योग या क्षेत्रांत भरारी घेण्यासाठी पायाभरणी करायची आहे, यासाठीची दृश्य धडपड आहे. निर्णायक नेतृत्व असले की हा फरक दिसतो. महाविकास आघाडीचे सरकार उणेपुरे अडीच वर्षे होते. त्या काळात महाराष्ट्राची सर्वार्थाने पीछेहाट झाली. अडीच वर्षे वाया गेली. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार आले. त्यामुळे महाराष्ट्राचे गाडे रुळावर आले. आता पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून ते अधिक वेगाने पुढे सरकेल. आगामी काळात महायुती सरकारला भरपूर काम करावे लागणार आहे, हेही खरे. जागतिक अर्थकारणातील अस्थिरतेचा उद्योग क्षेत्रावर झालेला परिणाम, युद्धाच्या स्थितीमुळे निर्माण झालेले प्रश्न, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न यांचीही हाताळणी महायुती सरकारला करावी लागेल. ती करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्यासह एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांचे सामूहिक नेतृत्व सक्षम आहे. महाविकास आघाडीने ईव्हीएम आणि अन्य कोणत्याही मुद्यांवर कितीही बोंबा ठोकल्या, तरी महायुतीच्या पर्वात महाराष्ट्राच्या विकासाची घोडदौड नव्याने सुरू होईल, यात शंका नाही.

## प्रासंगिक

# घटक पक्षांचाही काँग्रेसवर अविश्वास!

**राहुल गोखले**

सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले तेव्हा सत्ता न मिळूनही इंडिया आघाडीच्या आणि विशेषतः काँग्रेसच्या गोटात जल्लोषाचे वातावरण होते. त्याचे एक कारण म्हणजे मावळत्या लोकसभेच्या तुलनेत काँग्रेसचे बलाबल जवळपास दुप्पट झाले आणि त्या पक्षाचे ९९ खासदार निवडून आले. जल्लोषाचे खरे कारण हे भाजपाला स्वबळावर बहुमत मिळू शकले नाही हे होते. आता भाजपाची घसरण सुरू झाली आहे, अशा तोऱ्यात काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील घटक पक्ष वागू लागले होते. लोकसभेतील विरोधी पक्ष नेतेपद गेल्या दोन लोकसभांच्या कार्यकाळात रिक्त होते. कारण आवश्यक खासदार संख्या कोणत्याही विरोधी पक्षाकडे नव्हती. यावेळी मात्र ते पद राहुल गांधी यांना अधिकृतपणे मिळाले. साहजिकच इंडिया आघाडीचे नेतृत्व काँग्रेस आणि पर्यायाने राहुल गांधी करणार हे अगदी उघड होते. राहुल गांधी देखील लोकसभेच्या सभागृहात आणि बाहेर अशा थाटात विधाने आणि वक्तव्ये करू लागले होते की, ते पुढील पंतप्रधान होणे म्हणजे केवळ औपचारिकता आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या कामगिरीमुळे इंडिया आघाडीतील घटक पक्षांना काँग्रेसचे नेतृत्व मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हते. मात्र, सहा महिन्यांतच ते चित्र पालटले आणि इंडिया आघाडीचे नेतृत्व ममता बॅनर्जी यांना देण्याचे सूर उमटू लागले आहेत. आघाडीतील घटक पक्षांना अचानक काँग्रेसचे नेतृत्व नकोसे का झाले आणि ममतांच्या बाजूने इतके सूर का उमटू लागले, हा औत्सुक्याचा विषय असला, तरी काँग्रेससाठी तो आत्मपरीक्षणाचा विषय आहे.

याचे बीज बहुधा लोकसभा निवडणुकांनंतर झालेल्या काही राज्यांतील विधानसभा निवडणुका आणि वेगवेगळ्या मतदारसंघांसाठी झालेल्या पोटनिवडणुकांच्या निकालांत असावे. लोकसभा निवडणुकांत मिळालेले यश म्हणजे पुढील सर्व निवडणुकांतील विजयांची नांदी, असा काँग्रेसचा होरा असावा आणि इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी तो नाकारावा, अशी स्थिती नव्हती. तथापि, त्यानंतर हरयाणापासून महाराष्ट्रापर्यंत विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी काँग्रेसच्या शिडातील हवा काढून घेतली. हरयाणामध्ये काँग्रेस सहज जिंकेल असे अंदाज व्यक्त होत होते; तेथे काँग्रेसचा दारुण पराभव झाला. जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीला बहुमत मिळाले खरे; पण त्यात काँग्रेसचा वाटा अगदीच नगण्य होता. झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वाखालील आघाडीला बहुमत मिळाले. तेथील विजयाचे श्रेय हे काँग्रेसपेक्षा झारखंड



मुक्ती मोर्चाचे नेते आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे. महाराष्ट्राने काँग्रेसच्या दारुण स्थितीवर शिक्कामोर्तब केले. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा भावी मुख्यमंत्री म्हणून उल्लेख होत होता; तेच पटोले आता आपल्याला प्रदेशाध्यक्षपद नको म्हणून पक्षश्रेष्ठींना विनंती करीत आहेत. लोकसभा निवडणुकांनंतर कोणत्याच राज्यात काँग्रेसला भरीव कामगिरी करता आलेली नाही.

संसदेत आणि बाहेर सतत राज्यघटना, अदानी, जातिनिहाय जनगणना हे विषय रेटून काँग्रेसला यशाला गवसणी घालता आलेली नाही; किंबहुना अदानी हा विषय काँग्रेसने आता फार रेटू नये, असा विरोधकांचा सूर आहे. पण राहुल गांधी त्याच विषयाला बिलगून बसले आहेत. त्यामुळे इंडिया आघाडीतील अन्य पक्षांना कदाचित काँग्रेसचे ओझे वाटू लागले असावे. याचे एक कारण म्हणजे ज्या राज्यांत विरोधकांना यश मिळाले तेथे ते त्या त्या राज्यातील प्रादेशिक पक्षामुळे; काँग्रेसमुळे नव्हे. असे असेल तर काँग्रेसच्या देशव्यापी स्वरूपाचा फायदा काय असा प्रश्न आघाडीतील नेत्यांना पडला असल्यास नवल नाही. त्याचेच पडसाद लालूप्रसाद यादव यांच्यापासून शरद पवारांपर्यंत अनेकांनी ममता बॅनर्जी यांच्यात इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची क्षमता आहे, असे सुतोवाच करण्यात उमटले असावे. इंडिया आघाडी स्थापन झाली तेव्हा नेतृत्व करण्याची नितीशकुमार व ममता बॅनर्जी यांची मनीषा आणि महत्त्वाकांक्षा होती. नंतर नितीशकुमार यांनी भाजपाबरोबर जाण्याचा निर्णय घेतल्याने तो प्रश्न निकालात निघाला आणि ममता यांनीही पश्चिम बंगालमध्ये स्वबळावर लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय जाहीर केल्याने आघाडीच्या नेतृत्वाची माळ अखेरीस काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्या गळ्यात पडली. आता मात्र भाजपाची पुन्हा घोडदौड सुरू झाल्याने विरोधकांच्या गोटात निराशा पसरली आहे आणि काँग्रेसचे नेतृत्व कुचकामी असल्याची भावना प्रबळ होत आहे. आम आदमी पक्षाने आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'एकला चलो रे'ची भूमिका घेतल्याने काँग्रेसबरोबरची संभाव्य आघाडी बारगळली आहे. पण आघाडीचे नेतृत्व ममता बॅनर्जी यांना द्यावे, असे सूर का उठत आहेत, हेही पाहणे गरजेचे आहे. खरे तर लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावरील बहुमतापासून दूर ठेवण्यात ज्या पक्षांनी कामगिरी बजावली, त्यांत समाजवादी पक्ष प्रमुख. उत्तरप्रदेशात भाजपाची पीछेहाट झाल्याने निकालांत मोठा फरक पडला. तेव्हा अखिलेश यादव यांचेही नाव आघाडीच्या नेतेपदाच्या चर्चेत असायला हरकत नव्हती. मात्र, उत्तरप्रदेशात नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या नऊ जागांवरील पोटनिवडणुकांत भाजपाने सात जागांवर बाजी मारल्याने समाजवादी पक्षाला धक्का बसला. पश्चिम बंगालमध्ये मात्र तृणमूल काँग्रेसची लोकसभा आणि नुकत्याच झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीत सरशी झाली. ज्या सहा जागांवर पोटनिवडणूक झाली, त्यापैकी पाच जागांवर तृणमूलने आपला दबदबा कायम राखलाच; पण सहावी जागा जी भाजपाने २०१६ आणि २०२१ सालच्या विधानसभा निवडणुकीत जिंकली होती; तीही तृणमूलने काबीज केली. वास्तविक गेल्या काही काळात पश्चिम बंगालमधील घडामोडींमुळे तृणमूल काँग्रेस आणि ममता बॅनर्जी यांची कोंडी झाली होती. तरीही त्यांनी पोटनिवडणुकीत त्या पक्षाने सर्व जागा जिंकल्या. बहुधा त्यामुळेच ममता यांच्यात इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची क्षमता असल्याची भावना घटक पक्षांत निर्माण झाली असावी.

अर्थात् लालूप्रसाद यादव यांच्यापासून शरद पवारांपर्यंत अनेकांना ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वावर अचानक विश्वास कसा निर्माण झाला, हा प्रश्न उरतोच. तसा तो होता तर लोकसभा निवडणुकीपूर्वीच इंडिया आघाडीचे नेतृत्व याच नेत्यांनी ममता यांना का दिले नाही, हाही प्रश्न उपस्थित होतो. काँग्रेसची साथ आणि नेतृत्व घटक पक्षांना आता जाचू लागले आहे की, काँग्रेस घटक पक्षांना विश्वासात घेत नसल्याने काँग्रेसला इशारा देण्यापुरती ही मोर्चेबांधणी आहे? या सर्वांची उत्तरे लवकरच मिळतील. एक मात्र खरे; लोकसभा निवडणुकांनंतर सत्तेपासून योजने दूर असूनही काँग्रेसचा उधळलेला वारू आता जमिनीवर आला आहे. एका मागून एक निवडणुकीत काँग्रेस सपाटून मार खात आहे. परिणामतः इंडिया आघाडीचे नेतृत्व काँग्रेस आणि राहुल गांधी किंवा मल्लिकार्जुन खडगे कोणत्या अधिकारात करणार, हाही सवाल आहे. ममता बॅनर्जी यांना जनतेचा देशव्यापी भरवसा जिंकता येईल का हा नंतरचा प्रश्न. पण जनता काँग्रेसला नाकारत असताना इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी तरी काँग्रेसला 'दया' का दाखवावी, हा मुद्दा आहेच. काँग्रेसला दया दाखविण्याऐवजी ममता यांना आघाडीचे नेतृत्व देणे श्रेयस्कर हा घटक पक्षांचा पवित्रा म्हणजे त्या पक्षांनी काँग्रेसवर दाखविलेला अविश्वासच आहे.

९८२२८२८८१९

## वेध

# एसटीचे उत्पन्न वाढले; दर्जा केव्हा सुधारणार?

**गिरीश शेरेकर**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अस्तित्वात आहे. या महामंडळामार्फतच एसटी बसचे संचलन होते. सार्वजनिक वाहतुकीची कोणतीही अन्य साधने उपलब्ध नसताना एसटी बस सर्वांचा आधार राहिली आहे. ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून एसटी बसला ओळख मिळाली. 'गाव तेथे एसटी', 'रस्ता तेथे एसटी' या ब्रीदवाक्यांपासून सुरू झालेला एसटीचा प्रवास 'प्रवाशांच्या सेवेसाठी' या ब्रीदवाक्यापर्यंत पोहोचला आहे. विद्यमान स्थितीत वाहतुकीचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. पण, एसटी बसचे महत्त्व जेथे पर्याय नाही, तेथे अद्याप कायम आहे. विशेषत्वाने ग्रामीण महाराष्ट्रातल्या ज्या भागात रेल्वे नाही आणि खाजगी वाहतूक मर्यादित आहे, तेथे एसटी बसशिवाय दुसरा समर्थ पर्याय आजही नाही. राज्यातली निम्म्यापेक्षा जास्त जनता राज्यांतर्गत प्रवासासाठी एसटी बसचाच वापर करते, हे अनेक वेळा आकडेवारीवरून सिद्ध झाले आहे. याचा अर्थ एसटीच्या सुविधा फारच चांगल्या आहेत, असा होत नाही. जनतेसमोर प्रवास करण्याचे मर्यादित पर्याय असणे आणि सवलतीच्या दरात प्रवास करण्याची सोय या दोन कारणांमुळे प्रवाशांची संख्या बसकडे नाईलाजाने का होईना वळली आहे. परिणामस्वरूप एसटीचे उत्पन्न वाढले, पण दर्जा अद्याप पाहिजे त्या प्रमाणात सुधारलेला नाही, हे वास्तव आहे.

एसटी महामंडळाने अनेक चढ-उतार पाहिले आहेत. मध्यंतरी एसटीची खूप वाईट स्थिती होती. २०१४ साली महायुतीचे सरकार आल्यानंतर थोडे चांगले बदल व्हायला लागले. शिवशाही, शिवनेरी, शयनयान अशा वेगवेगळ्या बसेस सुरू झाल्याने प्रवाशांची संख्या व उत्पन्न वाढले. बदल होत असतानाच कोरोनाची लाट आली. या काळात एसटी ठप्प होती. त्यातून सावरत नाही तर कर्मचाऱ्यांच्या संपाने एसटी महामंडळ हतबल झाले. एसटीचे व्हायचे तेवढे नुकसान झालेच. पण, कर्मचाऱ्यांची पगाराची मागणी निकाली निघाली. जून २०२२ मध्ये पुन्हा महायुतीचे सरकार स्थापन झाले. या सरकारने एसटी बसला पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. प्रवासी संख्या वाढविण्यासाठी ७५ पेक्षा जास्त वय असणाऱ्या ज्येष्ठांना मोफत आणि सर्व प्रकारच्या महिलांना ५० टक्के सवलतीने प्रवास या दोन योजना सरकारने सुरू केल्या. महिलांनी तर योजना उचलूनच धरली. प्रवासी संख्येसोबतच उत्पन्नात वाढ नोंदविण्यात आली. यंदाच्या वर्षातील सर्वाधिक उत्पन्न नोव्हेंबर महिन्यात एसटीला मिळाले आहे. ते ९४१ कोटी आहे. या महिन्यात एसटीने दररोज ६० लाख प्रवाशांची वाहतूक करून ३१.३६ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविले. गेल्या वर्षाच्या याच काळातील उत्पन्नापेक्षा हे उत्पन्न सुमारे २६ कोटी रुपयांनी जास्त आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षी दिवाळीच्या काळात १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यात आली होती. यंदा ही भाडेवाढ नसताना उत्पन्न वाढले आहे. एसटीचे प्रवासी उत्पन्न वाढले असले, तरी त्या प्रमाणात एसटीचा खर्चदेखील वाढलेला आहे. इंधनाचे वाढते दर, कर्मचाऱ्यांची वेतनवाढ, टायर व सुट्या भागांच्या दरात झालेली वाढ हे त्याचे कारण आहे. त्यामुळे संचित तोटा ११ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. नोव्हेंबर महिन्यात नियमित खर्चासोबतच कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट दिल्यामुळे सुमारे ५२ कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा एसटीच्या तिजोरीवर पडला आहे. कर्मचाऱ्यांच्या वाढीव वेतनाची हजारो कोटींची थकबाकी प्रलंबित आहे. या सर्वांचा विचार करून नाईलाजास्तव उत्पन्न आणि खर्चातील ताळमेळ राखण्यासाठी एसटीने तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. तसा प्रस्ताव शासनाला पाठविल्याचे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सांगितले आहे. डॉ. कुसेकर यांनी सांगितलेल्या अडचणी मान्य केल्या तरी सध्या ज्या दराने एसटीचा प्रवास होतो, त्या दराइतक्या तरी सुविधा प्रवाशांना दिल्या जातात का? याचे उत्तर महामंडळाने द्यायला हवे. अनेक आगारांची स्थिती वाईट आहे. प्रत्येक ठिकाणी सुविधांचा अभाव आहे. बसची स्थिती तर सांगताच येत नाही, इतक्या त्या खराब आहे. देखभाल नसल्याने दिवसागणिक भंगार बसची संख्या वाढत आहे. बस कुठे बंद पडेल याचा भरवसाच नाही. ज्येष्ठांना व महिलांना सवलत असल्याने ते नाईलाजाने एसटीतून प्रवास करत आहेत. त्यांच्यामुळेच उत्पन्न वाढले आहे. हे सत्य समजून न घेता महामंडळ आपलेच रडगाणे सांगत आहे. सुविधांवर काही बोलत नाही. त्यासाठी काही योजना महामंडळाकडे नाही. अलिकडे तर बसस्थानकावर नव्या बस दिसतच नाही. महामंडळाने जनतेच्या मजबुरीचा फायदा न घेता एसटी बसचा दर्जा सुधारावा. नव्या सरकारने त्याकडे लक्ष द्यावे, अशी माफक अपेक्षा आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# भक्तिशास्त्रातील शरणागती

**प्रा. दिलीप जोशी**

भक्तिशास्त्रामध्ये शरणागती सांगितली आहे. शरणागती म्हणजे परमेश्वराला अनन्यभावाने समर्पित होणे. तो पाहिजे ते करण्यास समर्थ आहे, हा विश्वास ठेवून त्याला मदत मागणे. 'शरण जाणे' हा प्रकार तसे पाहिले तर युद्धातील प्रकार. एखादा शत्रू आपल्यापेक्षा बलाढ्य आहे, त्याच्यासमोर आपला टिकाव लागत नसेल तर शस्त्र खाली टाकायचे आणि नतमस्तक होऊन आपले नुकसान टाळायचे किंवा जीव वाचवायचा. दुसरे म्हणजे एखादा मोठा बलाढ्य शत्रू आपल्यापुढे आहे. आपल्याला त्याच्याशी दोन हात करणे शक्य नाही. अशावेळी एका प्रचंड शक्तिशाली मित्राला मदत मागणे, त्याला आलेले संकट हरण करण्याची विनंती करणे होय.

भक्तिशास्त्रात आपल्याला जन्मदुःखे, जरादुःखे किंवा नित्यदुःखे असतात. आपल्या सुखी संसारातील हीच दुःखे म्हणजे आपले शत्रू. ही दुःखे दूर करण्यासाठी आपण प्रयत्न करीतच असतो, पण काही दुःख मानवी हस्तक्षेपाच्या बाहेरची असतात तेव्हा मनुष्याला देव आठवतो आणि मग आपण धावा करतो तो ईश्वराचा. हा धावा म्हणजे शरणागती होय. बलाढ्य शत्रू आपल्या आटोक्यात नाही तेव्हा त्याहून बलाढ्य शक्तीला अनन्यभावाने दीनार्त होऊन मदत मागणे म्हणजे शरणागती होय किंवा आपल्या वर्तमान सुखी संसारात आपल्यावर भविष्यात कोणतेच अरिष्ट म्हणजे भोगरूपी शत्रू येऊ नये म्हणून आर्तभावाने परमेश्वराला समर्पित होणे, नतमस्तक होणे म्हणजे शरणागत होय. भक्तिशास्त्रात शरणागतीसाठी कोणता भाव असावा, याबाबत मार्गदर्शन केले आहे.

अनुकूल्यस्य संकल्पः प्रतिकूल्यस्य वर्जनम् ।
रक्षिष्यतीति विश्वासो गोप्तृत्वे वराणां तथा ।
आत्मनिक्षेप-कार्पण्ये शषद्-विधा शरणागतिः ॥

१) **अनुकूलस्य संकल्प** : आपल्या आराध्याजवळ जे आपण मागणार ते त्या भगवंताला अनुकूल असावे. म्हणजे आध्यात्मिक क्षेत्रात दोन प्रांगण आहेत. एक आपले संसारिक सुखाचे प्रांगण जिथे जीव पारतंत्र्यात आहे आणि शिव स्वतंत्र आहे. इथे स्व अर्थाचे प्राबल्य असल्यामुळे ईश्वर स्वतंत्र आहे. सर्वस्व त्याच्याच हातात असते. दुसरे म्हणजे भक्तीचे प्रांगण जिथे जीव स्वतंत्र आणि ईश्वर पारतंत्र्यात असतो. इथे ईश्वराची नाही तर जीवाची सत्ता चालते. भक्ताचा अधिकार अधिक असतो. 'धरीला पंढरीचा चोर, गळा बांधुनिया दोर...' ही उत्कट प्रेमाची अवस्था. हा भक्त ईश्वराला जे आवडते, जे ईश्वराला अनुकूल तोच संकल्प करतो. ईश्वरानुकूल अशीच साधना करतो.

२) **प्रतिकूलस्य वर्जनम्** : ईश्वराला अनुकूल संकल्प म्हणजे त्याच्या इच्छेच्या प्रतिकूल संकल्प किंवा साधन प्रपंच नसावा. असा प्रतिकूल संकल्प पाहिजे. 'रक्षिषः इति विश्वासः' त्याला शरण गेलो तर तो परब्रह्म परमात्मा माझे रक्षण करतोच, हा दृढविश्वास असला पाहिजे. तो पाहिजे ते करण्यास समर्थ आहे.

'जैसा समर्थु दाता कोणाशी, नास्ती न म्हणे ।'

३) **आत्मनिक्षेप** : त्या ईश्वराला शरणागत होताना कायावाचामनोभावे समर्पित होणे. म्हणजे आपल्यावर आलेले दुःखही त्याचेच आणि आता मी त्याच्यावर अनन्यभाव ठेवला आहे; त्याचे जे फळ मिळणार तेही त्यालाच. याला भार समर्पण आणि फळ समर्पण म्हणतात.

४) **गोप्तृत्व वरण** : तो ईश्वरच माझे रक्षण करणार आहे, या भावाने त्याचे वरण करणे म्हणजे तोच माझा एकमात्र स्वामी आहे, हा भाव ठेवणे.

५) **कार्पण्य भाव** : म्हणजे दीन भावाने शरण जाणे. तो दाता आहे. तो विन्मुख पाठवीत नाही. त्याच्या चरणावर लोटांगण घालताना दीन भाव असावा. कारण तो 'शरणागत दिनार्त' आहे.

याशिवाय शरणागती पत्करताना पुढील गोष्टी आवश्यक आहेत.

१) **मानमर्षण** : म्हणजे त्याच्यासमोर जाताना मानपानाचा विलय व्हावा. अहंकाराचा वाराही नको की उन्मत्तपणाचा अग्नी नको. वृक्षाला फळे लागल्यावर वृक्ष जसा विनम्रपणे झुकतो तद्वतच अध्यात्मात विनय महत्त्वाचा आहे. सुखे मी मिळवली आणि दुःखे परमात्म्याने दिली, हा भाव नको.

२) **भयदर्शन** : शरणागती पत्करली म्हणजे कुठली तरी भीती आहे हे व्यावहारिक आहे. त्याची जाणीव ठेवणे म्हणजे भयदर्शन होय. यात कर्मफळाचा आस्वाद नको आणि कर्तृत्वाचा अहंकारही नको.

मी कर्ता म्हणशी तेणे तू कष्टी होशी ।
आणि रामकर्ता म्हणशी पावशी यश कीर्ती प्रताप ॥
कर्तृत्व आणि भोक्तृत्व त्याचेच.

३) **भर्त्सना** : मी पणा त्यागून सतत स्वतःवर टीका करीत राहणे. स्वतःमध्ये असलेल्या चुकांवर चिंतन करणे त्यानुसार मार्ग ठरविणे. शरणागती पत्करताना स्वतःची भर्त्सना महत्त्वाचीच आहे.

४) **आत्मविचारणा** : स्वतःच स्वतःला विचारणा करणे की माझ्यात किती शुद्धभाव आहे. तुम्ही अंधारात कसे वागता, यालाच चारित्र्य म्हणतात. (Charector is 'what you are in dark') अंधारात मी कसा वागतो? हे स्वतःला विचारणे म्हणजे यालाच 'आत्मविचारणा' म्हणतात. शरणागत होताना कर्तुम् तंत्र म्हणजे मी शरण गेलो, आता तो फळ देईल. म्हणजे तो वेगळा आणि मी वेगळा, असा द्वैतभाव बहुतेक असतो. पण हळूहळू आपल्याला वस्तू तंत्र म्हणजे त्या वस्तुस्वरूप होणे. 'शिवम् भुत्वा, शिवम् यजेत । शिवाची पूजा करताना शिवस्वरूप होणे हीच अद्वैत भावना शरणागतीची अंततोगत्वा आहे.

थोडक्यात आपण सर्वसामान्य माणसे त्या विश्वाच्या नियंत्याला शरण जातो, ते भौतिक अडचणी दूर होऊन ऐहिक सुखे प्राप्त व्हावीत म्हणून. ते जरूर मागा, पण भौतिकतेचा परोत्कर्ष साधताना 'आत्मनो मोक्षार्थम्' लक्षात ठेवले पाहिजे. ऐहिक सुखासोबत अध्यात्मही कायम लक्षात ठेवले पाहिजे. शरणागतीत ईश्वराच्या या अपेक्षा आहेत. परीक्षेत उत्तीर्ण व्हायचे असेल तर ही गुरुकिल्ली लक्षात ठेवली पाहिजे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### विरोधी पक्षांनी देशभक्तीचा परिचय द्यावा

आपण खरोखरंच देशाचे नागरिक आहोत असे जर विरोधी पक्षाचे नेते, कार्यकर्ते व प्रतिष्ठित वृद्ध नेत्यांना वाटत असेल तर एकदा तरी त्यांनी देशभक्तीचा परिचय स्वतःहून करून द्यावा. देशावर खरोखरंच प्रेम असेल तर व आपला देश एकसंध, बलशाली व्हावा असे मनापासून वाटत असेल, देशाचे विभाजन ही वाईट घटना झाली असे वाटत असेल, अखंड भारत झाला पाहिजे, समर्थ भारत झाला पाहिजे, भारत हिंदुराष्ट्र झाला पाहिजे असे वाटत असेल तर तसे कबूल करा व जगाला ओरडून सांगा की हा भारत महान देश आहे म्हणून. तसेच बांगलादेशात हिंदू बांधवांवर, महिलांवर, तेथील देवस्थानांवर जे हल्ले झाले, अत्याचार झाला त्याचाही निषेध करावा व विरोधी पक्ष व सत्तापक्ष एक आहे हे जगाला सांगून द्यावे. बांगलादेश आता वठणीवर येतो बघा, पण त्यासाठी एवढे धाडस विरोधी पक्षांना दाखवावे लागेल.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### अपने अपने राम

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून गेल्या काही वर्षांपासून नागपुरात संगीत, नाटक, नृत्य, साहित्य, आध्यात्मिक कार्यक्रम यावर आधारित खासदार सास्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. ही नागपूरकरांसाठी पर्वणी ठरली आहे. हा महोत्सव स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कलाकारांच्या सहभागाने अनोख्या कार्यक्रमांनी सजलेला आहे. याचा उद्देश केवळ मनोरंजन नसून अनेकानेक लोकांचा सांस्कृतिक क्षेत्रातील सहभाग वाढावा, विकास व्हावा तसेच सांस्कृतिक मूल्ये लोकांपर्यंत पोहोचावीत हा उद्देश आहे. या उत्सवात धार्मिक, आध्यात्मिक कार्यक्रम तसेच लोकप्रबोधन आणि मनोरंजन यांचा संगम दिसून येतो.

यात एक उत्कृष्ट कार्यक्रम म्हणजे डॉ. कुमार विश्वास यांचे 'अपने अपने राम' या विषयावरील त्रिदिवसीय प्रवचन. डॉ. कुमार विश्वास यांनी सोप्या आणि रसाळ पद्धतीने राम उलगडून दाखवला. रामकथा केवळ अध्यात्मापुरती अथवा कथेपुरती मर्यादित न ठेवता आजच्या काळात त्याचे अनुकरण कसे करावे हे समजावून सांगितले. समाजकारण, राजकारण, धर्मकारण, मित्रत्व, आदर्श पुत्र, राजा, पती, पिता कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रभू श्रीराम. धनुर्धर राम विशद करून सांगितला. तसेच रामायणातील प्रत्येक व्यक्तिरेखेचे महत्व पटवून दिले. ते आजच्या काळातही अनेक गोष्टीत लागू होते. आपल्या दैनंदिन वैयक्तिक जीवनात रामाचा आदर्श कसा ठेवावा हे वेगवेगळ्या पद्धतीने आजच्या काळाशी सांगड घालून आपल्या रसाळ वाणीने आणि खुमासदार पद्धतीने पटवून दिले आणि प्रेक्षकांना खिळवून ठेवले. राम आणि श्याम एकच आहेत हे सांगितले आणि आजच्या काळात दोघांची कशी आवश्यकता आहे हे पटवून दिले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे 'अपने अपने श्याम' हा कार्यक्रम ते करतात. हा देखील कार्यक्रम पुढच्या वर्षी आयोजित करावा ही नम्र विनंती. असे चांगले कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे अभिनंदन.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### नायलॉन मांजावर बंदी आणा

पुढील महिन्यात मकर संक्रांत आहे. त्या दृष्टीने पतंग उडविण्याची व पतंग कापण्याची स्पर्धा याच महिन्यात मोठ्या प्रमाणात सुरू झालेली आहे. आकाशात पतंगाचा पेच झाल्यावर समोरच्याचा पतंग कापण्यासाठी नायलॉनचा मांजा वापरण्यात येत आहे. तो बाहेरच्या देशातून आलेला मांजा आहे. हा मांजा अतिशय धारदार असतो. हा मांजा नायलॉनचा असल्याने व त्याला काचेचा बारीक चुरा लावलेला असल्याने पतंग कटल्यानंतर जो मांजा खाली येतो तो मोटारसायकल किंवा सायकल चालविणाऱ्याच्या गळ्यात अडकतो. मोटारसायकल व सायकल गतीने चालवत असल्याने नायलॉन मांजाने अनेक दुचाकीस्वारांचे गळे चिरले जातात, डोळ्यांना इजा होते. अनेकांच्या मानेला खोलवर चिरल्याने काहींचे मृत्यू देखील होतात. आकाशातील पक्षी जखमी होतात. त्यामुळे या मांजाचा वापर करणाऱ्यांवर व विकणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करून पूर्णतः बंदी आणावी.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### पक्षपात-शह-श्वास

बुद्धिबळाच्या खेळात असो अन्य खेळांमध्ये शह दिल्याशिवाय विजयप्राप्ती होत नाही, या मंत्राचा जप सध्या उपराष्ट्रपती व राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड यांच्याविषयी करताना दिसतात. उपराष्ट्रपतिपदावरून हटविण्यासाठी १४ दिवस आधी अविश्वास प्रस्ताव नोटीस गरजेची असताना व हा प्रस्ताव लोकसभेतही बहुमताने मंजूर करावा लागतो हे सुद्धा सुज्ञ विरोधकांना का कळू नये? भारतीय लोकशाहीतील शेतकरी पुत्राविरोधातील हा कट म्हणजे लालबहादूर शास्त्रींच्या 'जय जवान जय किसान' या ब्रीदाचा अपमानच म्हणावा लागेल. पक्षपाताविरोधात लढण्याचा विरोधकांचा अखेरचा श्वास म्हणावा का? पण ही कुऱ्हाड विरोधक स्वतःच्याच पायावर मारून घेत आहेत असे वाटते. संसदेतील सभागृहातील गोंधळ म्हणजे शह नाही.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर -**

लग्नानंतर केवळ दोनच महिन्यात किरकोळ कारणावरून विवाहितेचा छळ करून तिचा शारीरीक व मानसिक छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रगती ओंकार चव्हाण (वय २६, रा. तेलंगी पाच्छा पेठ, बालाजी मंदीरजवळ, सोलापूर सध्या रा. पश्चिम मंगळवार पेठ, फलटण गल्ली, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती ओंकार जयदेव चव्हाण, सासू शुभदा जयदेव चव्हाण, सासरे जयदेव रामा चव्हाण नणंद प्रज्वलीता जयदेव चव्हाण (सर्व रा. तेलंगी पाच्छा पेठ, बालाजी मंदीरजवळ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ डिसेंबर २०२३ ते २१ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत प्रगती ही सासरी नांदण्यास होती. सासरी नांदत असताना पती ओंकार व त्याच्या घरातील लोकांनी मिळून घरातील किरकोळ कारणावरून प्रगती हिच्याशी वादविवाद, भांडणतंटे करून शारीरीक व मानसिक त्रास दिला. तसेच चारित्र्याचा संशय घेऊन लाथाबुक्क्यांनी मारहाण करून अपमानास्पद वागणूक दिली. सासरी नांदविण्यासाठी व शेअर मार्केटच्या व्यवसायासाठी माहेरून ५ लाख रुपये, सोने, पिठाची चिक्की घेऊन ये, त्याशिवाय तुला नांदवून घेणार नाही अशी धमकी देऊन प्रगती हिस नांदविण्यास नकार दिला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार भोगशेट्टी पुढील तपास करीत आहेत.



### वालचंद कॉलेज मुलांच्या वसतीगृहात विद्यार्थ्याची आत्महत्या

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर -**

शहरातील वालचंद कॉलेजमधील मुलांच्या वसतीगृहातील खोलीत विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. आदित्य लक्ष्मण जवळे (वय १९, रा. आरळी बु., ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांचे नाव आहे. १६ डिसेंबर रोजी रात्री साडेदहाच्या पूर्वी वालचंद कॉलेज येथील मुलांच्या वसतीगृहातील बिल्डींग नं. ३ मधील खोली नं. १२३ मध्ये आदित्य जवळे याने अज्ञात कारणावरून छताच्या पंख्याला नॉयलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब जेलरोड पोलिसांना समजल्यानंतर पोलिस हवालदार एस एल सय्यद यांनी घटनास्थळी येऊन आदित्य यास खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतिक माने यांनी आदित्य यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## निधन वृत्त...

### विठ्ठलसा पवार



**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

विठ्ठलसा नागूसा पवार (वय ९०) यांचे मंगळवार (दि. १७) दुपारी १ वाजता निधन झाले. सायंकाळी सहस्त्रार्जुन स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा,सून, मुलगी, जावई नातू असा परिवार आहे


### परवेझ शेख



**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

न्यू इंडिया गॅरेजचे मालक व मुस्लीम पाच्छा पेठ येथील परवेझ अ. रजाक शेख-बाळूवाले (वय ६८) यांचे १५ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रोडवरील जडेसाब कब्रस्थात येथे दफन विधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पाच मुले, सूना व नातवंडे असा परिवार आहे.

### हाजी म. इसाक जालनेवाले



**बार्शी, दि. १७ डिसेंबर-**

येथील रजा फूड इंडस्ट्रीजचे मालक हाजी महंमद इसाक शेख (जालनेवाले) यांचे अल्पशा आजाराने बालाजी नगर येथील राहत्या घरात निधन झाले. मृत्यू समयी ते ८७ वर्षांचे होते त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. टिपू सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष इलियाज शेख यांचे ते आजोबा होत.


## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २५०/२०२४**

**१) तानाजी खंडू कांबळे,**
रा. निंबळक, ता. बार्शी, जि. सोलापूर
असल्यास, तर्फे वकील राजेश भा. काशीद) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, निंबळक, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार रा. निंबळक ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे निंबळक, ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १० जून १९८१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वः अर्जदार यांचा दिनांक १० जून १९८१ रोजी मौजे निंबळक, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर


# सोलापूर विभागातील २० रेल्वे गाड्यांना मिळाले नवे क्रमांक, नवीन ओळख



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर -**

भारतीय रेल्वे विभागाने अनेक गाड्यांचे चालू असणारे क्रमांक हे पुन:क्रमांकित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सोलापूर विभागातील २० रेल्वे गाड्यांना नवे क्रमांक मिळून नविन ओळख मिळाली आहे. १ जानेवारी २०२५ पासून हे नवे क्रमांक गाडीला मिळणार आहेत.

नवीन वर्षांपासून भारतीय रेल्वे विभागाने अनेक गाड्यांचे चालू असणारे क्रमांक हे पुन:क्रमांकित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सोलापूर विभागातील २० रेल्वे गाड्यांना नवे क्रमांक मिळून नविन ओळख मिळाली आहे. सोलापूर विभागातून धावणाऱ्या गाड्यांचा झालेला पुन:क्रमांक लक्षात ठेवून सदरच्या गाडीने प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाश्यांची आरक्षण करतेवेळी हे क्रमांक लक्षात ठेवून आपला प्रवास निश्चित करावा असे आवाहन सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी केले आहे.

**सोलापूर रेल्वे विभागातून धावणाऱ्या पुन:क्रमांकित करण्यात आलेल्या गाड्यांचा तपशील खालीलप्रमाणे**

| रेल्वे गाडी | जुना क्रमांक | नविन क्रमांक |
|---|---|---|
| सोलापूर-वाडी | ०१३८१ | ७१४५१ |
| वाडी-सोलापूर | ०१३८२ | ७१४५२ |
| निजामाबाद-पंढरपूर | ०१४१३ | ११४१३ |
| पंढरपूर-निजामाबाद | ०१४१४ | ११४१४ |
| कुर्डूवाडी-मिरज | ०१५४५ | ७१४२१ |
| मिरज-कुर्डूवाडी | ०१५४६ | ७१४२२ |
| सोलापूर-होस्पेट | ११३०५ | ११४१५ |
| होस्पेट-सोलापूर | ११३०६ | ११४१६ |
| बिदर-कलबुर्गी | ०७७६१ | ७७६३१ |
| कलबुर्गी-बिदर | ०७७६२ | ७७६३२ |
| बिदर-कलबुर्गी | ०७७६३ | ७७६३३ |
| कलबुर्गी-बिदर | ०७७६४ | ७७६३४ |
| कलबुर्गी-बिदर | ०७७४५ | ७७६३८ |
| बिदर-कलबुर्गी | ०७७४६ | ७७६३५ |
| कलबुर्गी-बिदर | ०७७४७ | ७७६३६ |
| बिदर-कलबुर्गी | ०७७४८ | ७७६३७ |
| बिजापूर-रायचूर | ०७६६३ | ५७६६२ |
| रायचूर-बिजापूर | ०७६६४ | ५७६६१ |
| वाडी-काचीगुडा | ०७७५१ | ५७६०२ |
| काचीगुडा-वाडी | ०७७५२ | ५७६०१ |

# साक्षीदारांना प्रत्येकी ५०० रुपये भत्ता देण्याचा न्यायालयाचा आरोपीस आदेश



**ॲड राजेश कांबळे खून खटला**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर -**

ॲड. राजेश कांबळे यांचा खून खटल्यात आरोपीने वकिल बदलण्याच्या दिलेल्या अर्जास विशेष सरकारी वकिलांनी हरकत घेतल्यानंतर न्यायाधीश जे जे मोहिते यांनी हजर असलेल्या साक्षीदारांना आरोपीने प्रत्येकी ५०० रुपये भत्ता देण्याचा आदेश दिला. या खटल्याची पुढील सुनावणी २२ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे.

ॲड. राजेश कांबळे यांचा खून केल्याप्रकरणी आरोपी संजय उर्फ बंटी महादेव खरटमल, अँड सुरेश तारू चव्हाण व श्रीनिवास म हांकाळी येलदी यांच्यावर भरलेल्या खटल्याच्या सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश जे.जे.मोहिते यांच्यासमोर सुरू झाला आहे.

मंगळवारी या खटल्याच्या सुनावणीच्या वेळी आरोपी ॲड. सुरेश चव्हाण याने त्याचे वकील हे संपर्क केला असता ते फोन उचलत नाहीत, मेसेज केल्यास मेसेजला उत्तर देत नाहीत, त्यामुळे वकील बदलण्यासाठी अर्ज केला. त्यावर विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी हरकत घेतली. त्यानंतर न्यायाधीश मोहिते यांनी आरोपी ॲड. सुरेश चव्हाण यास सुनावणीवेळी हजर असलेल्या साक्षीदारांना प्रत्येकी ५०० रुपये भत्ता देण्याचा आदेश केला. या खटल्याची पुढील सुनावणी २२ जानेवारी रोजी होणार आहे.

या खटल्यात सरकारच्यावतीने विशेष सरकारी वकील अँड. उज्वल निकम, मूळ फिर्यादीतर्फे अँड. मिलिंद थोबडे, अँड. विनोद सूर्यवंशी तर आरोपी संजय खरटमलतर्फे अँड राजेंद्र फताटे, आरोपी ॲड. सुरेश चव्हाण, श्रीनिवास येलदी यांच्यातर्फे अँड जयदीप माने हे काम पाहत आहेत.

# कठोर परिश्रम हीच यशाची गुरुकिल्ली : डॉ. कीर्तिकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १७ डिसेंबर-**

जिल्हा न्यायालयात विविध पदाकरिता सन -२०२३ ला महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये भरती परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा निकाल नुकताच ५ डिसेंबर २०२४ रोजी घोषित करण्यात आला. त्यामध्ये छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागातील राकेश सरवदे, गुरुनाथ पणशेट्टी, मंजुनाथ खानापुरे या तीन विद्यार्थ्यांची लिपिक पदावर पहिल्याच प्रयत्नात निवड झाली त्यानिमित्ताने छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. वाल्मीक कीर्तीकर असे म्हणाले की, कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरीसुद्धा कठोर परिश्रम आणि योग्य दिशेने प्रयत्न केल्यास कुठल्याही स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करणे सहज शक्य आहे, यशाला कुठलाही शॉर्टकट नसतो, ध्येय साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम व त्यागाची भावना विद्यार्थ्यांनी ठेवणे गरजेचे आहे. यावेळी स्पर्धा परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. मधुकर पवार असे म्हणाले की, दिवसभर काम करून संध्याकाळी शिक्षण घेणाऱ्या होतकरू व गरीब विद्यार्थ्यांच्या पाठीशी महाविद्यालय ठामपणे उभे राहते व त्यामुळे गरीब व कष्टकरी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या व रोजगाराच्या संधी प्राप्त होतात. महाविद्यालयाचा स्पर्धा परीक्षा विभाग व करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी अत्यल्प शुल्कात विविध प्रकारच्या सुविधा महाविद्यालयात उपलब्ध दिल्या जातात.





# अल्पसंख्यांक समाजाच्या कल्याणासाठी १५ कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी

**निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

अल्पसंख्याकाच्या कल्याणासाठी पंतप्रधानांचा नवीन १५ कलमी कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी व पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी काटेकोरपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हा अल्पसंख्याक संनियंत्रण समितीच्या बैठकीत कुंभार बोलत होत्या.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी रमेश काटकर, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार पुढे म्हणाल्या की, अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी पंतप्रधानाचा नवीन १५ कलमी कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. माहे ऑक्टोबर २००९ मधील सुधारणाप्रमाणे या कार्यक्रमाची जिल्ह्यात अंमलबजावणी होत असून शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, नियोजन विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पोलीस विभाग या सर्व विभागानी अल्पसंख्याक समाजातील पात्र लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांना सुलभरीत्या लाभ मिळण्याचे नियोजन करावे, असेही त्यांनी सुचित केले. प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी पवार यांनी मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौद्ध, पारसी व जैन या अल्पसंख्याक समुदायातील लाभार्थ्यांना १५ कलमी कार्यक्रम ंतर्गत देण्यात येत असलेल्या लाभाची माहिती दिली. तसेच १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात येतो त्यानिमित्त जिल्हा प्रशासनाच्या वतीने नियोजन भवन येथील सभागृहात अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त कार्यक्रम ठेवण्यात आलेला असून जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असेही त्यांनी आवाहन केले.

## एकता समाज सेवक संस्थेतर्फे सोलापूर-मुंबई पदयात्रा

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

एकता समाज सेवक संस्थेच्या वतीने विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सोलापूर ते मुंबई मंत्रालय पदयात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष इरफान शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एक जानेवारीला येथील नई जिंदगी येथून या पदयात्रेस प्रारंभ होईल. २६ जानेवारी रोजी मुंबई मंत्रालय येथे समारोप होईल. धर्मगुरूंवर अपमानजनक वक्तव्य करणाऱ्यांवर कारवाई करावी. मुस्लिम समाजाच्या गरीब व मागासलेल्या घटकांना पाच टक्के आरक्षण लागू करावे. सामाजिक समता व समरसतेचा विचार बळकट करण्यात यावा. सामाजिक सलोख्याला हानी पोहोचविणाऱ्या कृतींवर कठोर नियंत्रण ठेवण्यात यावे आदी मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी ही पदयात्रा काढण्यात येत आहे.


## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
**सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**जलवितरण विभाग**

**जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिकेकडील मुख्य कार्यालयाकडील सन २०२४-२५ ११० मि.मी. व्यासाचे विंधन विहिर घेणे व त्यावर इंडिया II चा हातपंप पुरविणे व बसविणे कामचे ई-निविदाबाबत

**TENFER ID : 2024-SMC-1125229-1**

या कामाचे टेंडर शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. १८/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून पाहण्यास उपलब्ध आहेत.

**सही/-**
**उपअभियंता (जलवितरण)**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**



## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३५४/२०२४**

**१) शिवाजी मारुती खेंदाड,**
रा. लाडोळे, ता. बार्शी, जि. सोलापूर
असल्यास, तर्फे वकील आर. ए. गुंड) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, लाडोळे, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आई रुक्मिणी मारुती खेंदाड रा. लाडोळे, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे लाडोळे, ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २६ फेब्रुवारी १९९८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदारांची आई रुक्मिणी मारुती खेंदाड यांचा दिनांक २६ फेब्रुवारी १९९८ रोजी मौजे लाडोळे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा),**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**
११३, (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी,
सोलापूर-०१

**श्री वारणा सहकारी बँक लि. वारणानगर** — **- अर्जदार बँक**
शाखा सोलापूर

विरुध्द :

**(खालील तपशीलातील नमुद केलनेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ६५८/२०२४-२५ | ४,३३,१७७.९० | ३ | **सौ. अश्लेशा आनंद पिंपळेकर** रा. हरीकृपा विहार, मंत्री चंडक पार्क, सोलापूर |

याकामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार दि. ०३/०१/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीव्दारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणील घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १७/१२/२०२४ रोजी माही सही व कार्यालयचे मुद्देसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स्**
**को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, मिळकतीचे वर्णन :- डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी गांव बेलाटी येथील शेतजमीन मिळकत यांसी भूमापन क्र. १६६ यांसी एकूण क्षेत्र १ हे. ७६ आर ०० चौ.मी. पैकी १ हे. ३९ आर यांसी आकार ४ रु. ४४ पैसे या सामाईक क्षेत्र असलेल्या मिळकतदार पैकी (१) उर्मिला दत्तात्रय लुंगसे (२) ज्योती उर्फ मंगल जयकर शिंदे (३) सरस्वती शंकरराव गायकवाड यांचे मालकी वहिवाटीची असलेली मिळकत सदरची मिळकतीचे सामाईक क्षेत्र असल्याने एकूण भूमापन क्र. १६६ चे चतुःसिमा खालीलप्रमाणे :- पूर्वेस श्री. कोले यांची,मिळकत पश्चिमेस बेलाटी हिरज रस्ता, दक्षिणेस १६५ पैकी, उत्तरेस १६७ पैकी.

वर मिळकतीचे वर्णनात नमूद केलेली मिळकत मधील वर नमूद सामाईक मिळकतदार यांनी त्यांचे मालकी वहिवाटीची असलेली मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून तशी इसारा पोटी रक्कम स्विकारुन इसारापावती आमचे अशिलांचे नावे दस्त करुन दिलेला आहे व सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी परंतु सदरची मिळकतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, करार, दान, लिज, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वाटणी, पोटगी, टाच, जाती, कुळ, वहिवाट कब्जाकरार या संबंधीचा हक्क असल्यास अगर अन्य कोणत्याही स्वरुपाचा बोजा हक्क हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकतीसंबंधी कोणाची कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास अथवा कोणत्याही प्रकारे सावकारी बोजा असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांचे आत सदर मिळकतीत असलेली हक्क दर्शवणारी कागदपत्रे पुराव्यासह खालील नमूद पत्यावर पाठवावेत. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार व हरकत न आल्यास ठरल्याप्रमाणे आमचे अशिल वर नमूद मिळक्ती संबंधीचा खरेदीचा व्यवहार ही सदरची मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे ग्राहय धरुन खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग त्यानंतर कोणाचीही शेतजमीन मिळकतीबाबत व मालकीबाबत कोणत्याही प्रकारची हरकत व तक्रार आमचे अशिलांचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख - /१२/२०२४

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोकराव शिर्के**
**बी. कॉम., एलएल.बी. ॲडव्होकेट**
**ब्लॉक नं.११ आकांक्षा मोहीते नगर,**
**संचार प्रेस समोर होटगी रोड,**
**सोलापूर ४१३००३**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

**निविदा प्रसिध्दीकरण सन-२०२५-२६**

**जा.क्र.२०२४/न.प.अ.कोट/बांधकाम-११/संकलन-१**
**आर आर/कावि- ११७९ दिनांक : १७/१२/२०२४**

अक्कलकोट नगरपरिषदेने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 2.0 (नागरी) अक्कलकोट नगरपरिषदकडील स्वच्छ भारत अभियान 2.0 SWM DPR अंतर्गत घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे ठिकाणी ओला कचरा, (Wet waste) सुका कचरा, (Dry Waste) शात्रोक्त भूभराव (Scientific Land fill for 5 years) या घटकांतर्गत स्थापत्य (Internal Civil Work) विषयक कामे करणे कामाचे ई निविदा तमाम सरकार मान्य मक्तेदार यांचेकडून ऑनलाईन ई निविदा मागविणेत येत आहे. सदर कामाचे ई निविदा संबंधित सर्व प्रसिध्दीचा सविस्तर तपशील माहिती अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळ वर पहावयास मिळतील.

**सही/-**
**(रमाकात डाके)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**नगरपरिषद अक्कलकोट**



## जाहीर प्रसिद्धीकरण

**दि. कि. अर्ज नं. ९०/२०२४ नि.नं. ०५**
पुढील नेमलेली तारीख ०६/०१/२०२५

**बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात**

**१) असहद सोहेल सय्यद,** वय १६ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. कुर्डुवाडी रोड, जैन मंदिरासमोर, बार्शी, ता. बार्शी,
जि. सोलापूर- अज्ञान
**२) आहद सोहेल सय्यद,** वय १४ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. सदर- अज्ञान
**३) रफिया सोहेल सय्यद,** वय ११ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. सदर- अज्ञान अर्जदार नं. १,२,३,४ चे अ.पा.क. आई
**४) अलफहद सोहेल सय्यद,** वय ०९ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. सदर- अज्ञान
**५) श्रीमती समामा सोहेल सय्यद,** वय ३९ वर्षे,
धंदा- शेती, घरकाम, रा. सदर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**
**महाराष्ट्र सरकार** — **सा. वाला**

ज्याअर्थी अज्ञान अर्जदाराचे नावावरील डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे पानगांव येथील शेतजमीन ग.नं. १६६३ यापैकी १ हे. ६० आर आकार रु. ०.७२ पैसे यासी चतुःसिमा- पूर्वेस- सदर गट नंबरपैकी काळे यांचे क्षेत्र, दक्षिणेस- ग.नं. ५५४, पश्चिमेस- साकत रस्ता, उत्तरेस- ग.नं. ३९६,३८२ येणेप्रमाणे वर्णनाची जमीन आतील तदंगभूत वस्तुसह.

येणेप्रमाणे शेतजमीन ही अज्ञान अर्जदाराचे वडील मयत झालेने वारस हक्काने सदर मिळकतीत हक्क, हिस्सा आहे. ती मिळकत ही अज्ञानाचे भविष्याकरीता तसेच अज्ञान अर्जदाराचे वडील मयत असलेने कसणे अडचणीचे होत असलेने मिळकत विक्रीस काढून अज्ञान अर्जदाराचे अ.पा.क. आई यांनी व्यवहार ठरवलेला आहे. तथापी, जमीन मालक हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. सदर कृती योग्य असून व अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अर्जदाराचे वतीने त्याचे पालनकर्ते आईने या मे. कोर्टात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मागणेचा अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनांसंबंधाने कोणाचे काही हरकती, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे काही हक्क, अधिकार असलेस संबंधितांनी हे जाहिर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमली तारखेस या मे. कोर्टात स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहिर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : १७/१२/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**अधीक्षक**
अपर जिल्हा न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### रॉबिन उथप्पा दिसणार समालोचकाच्या भूमिकेत




**जोहान्सबर्ग :** भारताचा माजी क्रिकेटपटू आणि २००७ चा टी-२० विश्वचषक विजेता रॉबिन उथप्पा ९ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या बेटवे टी-२० लीगच्या तिसऱ्या सत्रात समालोचन करणार आहे. ९ जानेवारी ते ८ फेब्रुवारी दरम्यान चालणारी ही टी-२० लीग भारतात व्हीआयएकॉम १८ चॅनेल आणि डिजिटल प्लॅटफॉर्म स्पोर्ट्स १८ आणि जिओ सिनेमावर थेट प्रसारित केली जाईल. आयोजकांनी जारी केलेल्या प्रसिद्धीनुसार, उथप्पासह दिग्गज फलंदाज केविन पीटरसन, शॉन पोलॉक, स्टुअर्ट ब्रॉड आणि ख्रिस मॉरिस यांचाही समालोकांच्या यादीत समावेश आहे. याशिवाय आक्रमक फलंदाज एबी डिव्हिलियर्स आणि प्रसिद्ध क्रिकेट समालोचक एम. मबांगवा हे देखील समालोचन करणार आहेत.

### पंतप्रधानांकडून ज्युनियर महिला हॉकी संघाचे अभिनंदन

**नवी दिल्ली :** आशिया चषक विजेतेपद पटकावल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघाचे अभिनंदन केले. विशेषत: तरुणांमध्ये हॉकीबद्दलची वाढती लोकप्रियता या यशातून दिसून येते, असे ते म्हणाले. मस्कत येथे रविवारी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताने पेनल्टी शूटआऊटमध्ये तीन वेळच्या अजिंक्य चीनचा ३-२ असा पराभव केला आणि महिला ज्युनियर आशिया चषकावर आपले नाव कोरले. आशिया चषक विजेतेपद पटकावल्याबद्दल भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघाचे अभिनंदन. संघाने खूप संयम आणि जिद्द दाखवली. विशेषत: तरुणांमध्ये हॉकीबद्दलची वाढती आवडही या यशातून दिसून येते. संघाला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'एक्स'वर म्हटले आहे.

### दुखापतीमुळे हेजलवूड कसोटी मालिकेला मुकणार



**ब्रिस्बेन :** ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूडला तिसऱ्या कसोटीदरम्यान उजव्या पायाच्या दुखापतीमुळे भारताविरुद्धच्या बॉर्डर-गावस्कर चषकाच्या उर्वरित सामन्यांपासून मुकावे लागू शकते. दुखापतीमुळे हेजलवूड आता ब्रिस्बेन कसोटीत खेळू शकणार नाही. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने एका निवेदनात म्हटले आहे की, जोश हेझलवूडच्या उजव्या पायाला दुखापत झाली आहे, त्यामुळे तो भारताविरुद्धच्या ब्रिस्बेन कसोटीत पुढे खेळू शकणार नाही. ३३ वर्षीय हेझलवूड चौथ्या दिवशी केवळ एकच षटक टाकू शकला आणि दुखापतीमुळे त्याला मैदान सोडावे लागले. ॲडिलेड कसोटीसाठी ऑस्ट्रेलियन संघात असलेला वेगवान गोलंदाज स्कॉट बोलँडच्या जागी हेझलवूडचा समावेश करण्यात आला.

### पृथ्वी शॉला मुंबई संघात स्थान नाही

**मुंबई :** पृथ्वी शॉ सध्या आपल्या खराब कामगिरीमुळे चर्चेत आहे. खराब फॉर्ममुळे, आयपीएल २०२५ साठी आयोजित मेगा लिलावातही शॉला कोणीही विकत घेतले नाही. शॉ केवळ त्याच्या खराब फॉर्ममुळेच चर्चेत नाही तर काही काळापासून त्याच्या शिस्तीवरही अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. दरम्यान, शॉने समाज माध्यमावरून आपली व्यथा मांडली. विजय हजारे करंडक संघात स्थान न मिळाल्याने त्याने आपली व्यथा मांडली. मुंबई क्रिकेट असोसिएशनने विजय हजारे ट्रॉफी २०२४-२५ साठी संघाची घोषणा केली आहे. स्टार फलंदाज पृथ्वी शॉला संघात स्थान मिळाले नाही. नुकत्याच पार पडलेल्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२४ मध्ये शॉची कामगिरी काही खास नव्हती. अशात आता एकदिवसीय स्पर्धेतील म्हणजेच विजय हजारे ट्रॉफीच्या संघातून त्याचे दुर्लक्षित करण्यात आले आहे. संघात स्थान न मिळाल्यानंतर, शॉने इन्स्टाग्रामद्वारे एक कथा शेअर केली, ज्यामध्ये त्याने लिस्ट-ए सामने हायलाईट केले. यात शॉने विचारणा केली की, देवा, मला आणखी काय पाहायचे आहे? पुढे तो लिस्ट-ए सामन्यांच्या आकडेवारीबद्दल बोलला. आपण नक्कीच करणार असल्याचेही शॉने आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

### चीनमध्ये सर्वांत मोठ्या भ्रष्टाचारातील अधिकाऱ्याला फाशी

**बीजिंग :** चीनमधील सर्वांत मोठा म्हणजे ४२.१ कोटी डॉलर्सच्या भ्रष्टाचार प्रकरणातील एका माजी अधिकाऱ्याला मंगळवारी फाशी देण्यात आली. होहोट आर्थिक आणि तांत्रिक विकास क्षेत्राच्या सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्य समितीचे माजी सचिव ली यांची फाशीची शिक्षा सुरुवातीला सप्टेंबर २०२२ मध्ये ठोठावण्यात आली आणि ऑगस्ट २०२४ मध्ये त्यांचे अपिल फेटाळण्यात आले होते. सुप्रीम पीपल्स कोर्टाने मंजुरी दिल्यानंतर मंगळवारी त्यांना फाशी देण्यात आली, असे सरकारी वृत्तसंस्था शिन्हुआने वृत्तात म्हटले आहे. ली यांना मध्यवर्ती न्यायालयाने यापूर्वी अवैध तीन अब्ज युआन भ्रष्टाचारातून मिळवल्याच्या आरोपात दोषी ठरवले होते आणि चीनच्या इतिहासातील हे सर्वांत मोठे प्रकरण आहे.

# राहुल, जडेजाच्या खेळीने फॉलोऑन टळला

## दोघांची अर्धशतके, संयमी खेळी ● भारत ९ बाद २५२ धावा



रवींद्र जडेजा : १२३ चेंडूंत ७७ धावा



केएल राहुल : १३९ चेंडूंत ८४ धावा

◆ **ब्रिस्बेन, १७ डिसेंबर**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात येथे सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषकाच्या तिसऱ्या कसोटीत चौथ्या दिवशी भारताच्या केएल राहुल आणि अष्टपैलू रवींद्र जडेजा यांनी भारताला फॉलोऑनपासून वाचवले. भारताचे आघाडीचे फलंदाज पटापट बाद झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी भारताची स्थिती पहिल्या डावात ४ बाद ५१ धावा अशी होती. पण केएल राहुल, रवींद्र जडेजा आणि तळातल्या फलंदाजांनी संयमाने खेळ करीत फॉलोऑनची नामुष्की टाळली.

केएल राहुल आणि रवींद्र जडेजा यांच्या अर्धशतकांच्या बळावर भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या क्रिकेट कसोटीच्या चौथ्या दिवशी पावसाने प्रभावित झालेल्या फॉलोऑनला वाचवले, पण आता सामना अनिर्णीतावस्थेकडे झुकत आहे. रवींद्र जडेजाने १२३ चेंडूंत ७ चौकार आणि १ षटकारासह ७७ धावा केल्या, तर केएल राहुलने १३९ चेंडूंचा सामना करीत ८४ धावा केल्या. या खेळीत त्याने आठ चौकार हाणले.

खराब प्रकाशामुळे खेळ लवकर थांबवण्यात आला. तोपर्यंत भारताने नऊ गडी गमावून २५२ धावा केल्या होत्या. जसप्रीत बुमराह १० आणि आकाश दीप २७ धावांसह खेळत आहे. भारतीय संघ अजूनही ऑस्ट्रेलियाच्या १९३ धावांनी मागे आहे.

ऑस्ट्रेलियाला आता पुन्हा फलंदाजीसाठी उतरावे लागणार असून ब्रिस्बेनमधील हवामान लक्षात घेता या सामन्याचा निकाल लागेल असे वाटत नाही. बुधवारीही पावसाची शक्यता आहे.

१०व्या क्रमांकावर आलेला बुमराह आणि ११व्या क्रमांकावर आलेल्या आकाश दीपने संघाला २४६ धावांच्या फॉलोऑनच्या पलीकडे नेले आणि ३३ धावा जोडल्या. पॅट कमिन्सने जडेजाला बाद केल्यावर हे दोघे एकत्र आले आणि भारताची धावसंख्या नऊ गडी बाद २१३ धावा झाली.

तत्पूर्वी, कालच्या ४ गड्यांच्या मोबदल्यात ५१ धावांच्या पुढे खेळताना, भारतीय फलंदाजांनी लढाऊ वृत्तीने खेळत ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना केला. दिवसाच्या पहिल्या चेंडूवर स्मिथकडून जीवदान मिळवण्यात राहुल भाग्यवान ठरला तर पॅट कमिन्स गोलंदाज होता. त्यावेळी राहुल ३३ धावांवर खेळत होता. कर्णधार रोहित शर्मा (१०) पुन्हा एकदा अपयशी ठरला. कमिन्सचा चेंडू ऑफ स्टंपवर पडला आणि लेक्स कॅरीने त्याला यष्टीमागे बाद केले. आर. आश्विन आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्यापेक्षा जडेजाला प्राधान्य दिल्याबद्दल अनेकांनी प्रश्न उपस्थित केले होते परंतु जडेजाने आपली उपयुक्तता सिद्ध केली. त्याने नितीशकुमार रेड्डीसोबत सातव्या गड्यासाठी ५३ धावांची भागीदारी केली. त्याने ८९ चेंडूत कसोटी क्रिकेटमधील २२ वे अर्धशतक पूर्ण केले. नितीशने त्याला चांगली साथ दिली. उद्या कसोटी सामन्याचा पाचवा दिवस असून, सामना अनिर्णीत राहणार हे निश्चित आहे. (वृत्तसंस्था)

# रोहन जेटली यांची डीडीसीएच्या अध्यक्षपदी फेरनिवड

## कीर्ती आझाद यांचा ८०० मतांनी पराभव



निवडणुकीत विजयी झाल्यानंतर सत्कार स्वीकारताना रोहन जेटली

◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

माजी भारतीय क्रिकेटपटू कीर्ती आझाद यांना निवडणुकीत पराभूत करून रोहन जेटली पुन्हा एकदा दिल्ली जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे (डीडीसीए) अध्यक्ष बनले. माजी केंद्रीय मंत्री दिवंगत अरुण जेटली यांचे सुपुत्र ३५ वर्षीय रोहन यांना १५७७, तर कीर्ती आझाद यांना ७७७ मते मिळाली.

एकूण २४१३ मते पडली आणि विजयासाठी १२०७ मतांची आवश्यकता होती. रोहन जेटली २०२० मध्ये बिनविरोध निवडून आले आणि एक वर्षानंतर त्यांनी ॲड. विकास सिंह यांचा पराभव केला. रजत शर्मा यांनी मध्यंतरी पद सोडल्यानंतर २०२० मध्ये रोहन यांची अविरोध निवड झाली. एका वर्षानंतर त्यांनी ॲड. विकास सिंग यांचा पराभव केला. दिवंगत अरुण जेटली हे १४ वर्षे डीडीसीएचे अध्यक्ष होते.

रोहन यांना बीसीसीआयचे माजी कार्यकारी अध्यक्ष सी. के. खन्ना यांचा पाठिंबा होता. त्यांचा दिल्ली क्रिकेटमध्ये मोठा प्रभाव समजला जातो. खन्ना यांची कन्या शिखा कुमार यांनी उपाध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत राकेश कुमार बन्सल आणि सुधीर कुमार अग्रवाल यांचा पराभव केला. (वृत्तसंस्था)

# अंकित राजपूतने घेतली क्रिकेटमधून निवृत्ती

## विजय हजारे करंडकमध्ये ठेवले राखीव



◆ **कानपूर, १७ डिसेंबर**

उत्तर प्रदेशचा वेगवान गोलंदाज अंकित राजपूतने सोमवारी अचानक क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. हा निर्णय का घेतला हे त्याने सांगितले नाही. मात्र उत्तर प्रदेश क्रिकेट असोसिएशनने (यूपीसीए) सोमवारी जाहीर केलेल्या विजय हजारे चषक संघात अंकितला राखीव म्हणून ठेवले होते.

यूपीसीएच्या या निर्णयामुळे अंकितला खूप दु:ख झाले असले तरी त्याने यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. निवृत्ती घेणे हा माझा वैयक्तिक निर्णय असल्याचे त्याने म्हटले आहे.

अंकितने 'एक्स'वर निवृत्ती जाहीर केली आहे. यामध्ये त्याने आपल्या क्रिकेट प्रवासात योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार मानले आहेत.

इंडिया-ए व्यतिरिक्त, कानपूरचा रहिवासी अंकित राजपूत हा आयपीएलमधील राजस्थान रॉयल्स, चेन्नई सुपर किंग्ज, किंग्ज इलेव्हन पंजाब, कोलकाता नाईट रायडर्स, लखनऊ सुपरजायंट्स संघांचा सदस्य होता. (वृत्तसंस्था)

### अंकितची गौरवपूर्ण कामगिरी

अंकित राजपूत यूपी टी-२० लीगमध्ये कानपूर संघाचा सदस्य होता. त्याने अनेक वर्षे उत्तर प्रदेश संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. तो यूपी रणजी संघाचा कर्णधारही राहिला आहे. अंकितने आपल्या कारकीर्दीत ८० प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये २४८ बळी, ५० लिस्ट ए सामन्यात ७१ बळी आणि ८७ टी-२० सामन्यात १०५ बळी घेतले आहेत.



'फिट इंडिया' सायकल स्पर्धेत सहभागी केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया

# फिट इंडिया सायकल स्पर्धेला हिरवा झेंडा

## ५०० सायकलस्वारांचा सहभाग

◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी मंगळवारी नवी दिल्लीतील मेजर ध्यानचंद स्टेडियमवर फिट इंडिया सायकलिंग स्पर्धेला हिरवा झेंडा दाखवला. स्टेडियम ते रायसीना हिल्स आणि परत या तीन किलोमीटरच्या स्पर्धेत सुमारे ५०० सायकलस्वार सहभागी झाले होते. या उपक्रमाचा उद्देश सायकलिंगला शाश्वत आणि आरोग्यदायी वाहतुकीचा मार्ग म्हणून प्रोत्साहन देण्याचा आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, भाजपा खासदार तेजस्वी सूर्या यांच्यासह पॅरिस पॅरालिम्पिकची विजेती सिमरन शर्मा, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक विजेती नीतू घांघास आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेती प्रीती पवार यांच्यासह अनेक खेळाडू उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत ध्वज देण्यात आला. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय, भारतीय सायकलिंग फेडरेशन, माय भारत आणि विविध क्रीडा प्राधिकरणांच्या फिट इंडिया उपक्रमाच्या सहकार्याने देशभरातील १,००० हून ठिकाणी हा कार्यक्रम एकाच वेळी आयोजित करण्यात आला होता. सायकलिंग स्पर्धा भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) प्रादेशिक केंद्रे, नॅशनल सेंटर्स ऑफ एक्सलन्स तसेच खेलो इंडिया सेंटर्स येथे एकाच वेळी घेण्यात आल्या. यामध्ये ५०,००० हून अधिक लोक सहभागी झाले होते.

मंत्री मांडविया म्हणाले, आम्ही फिट इंडिया सायकलिंग मंगळवार म्हणून हा कार्यक्रम सुरू केला आहे, परंतु सायकलिंग चाहत्यांच्या सोयीसाठी, आता रविवारी आयोजित केला जाईल आणि त्याला रविवार ऑन सायकल म्हटले जाईल. डॉक्टर, पत्रकार, शिक्षक, कॉर्पोरेट व्यावसायिक आणि तरुण रविवारी नवी दिल्लीसह देशभरातील एक तासाच्या सायकल सहलीत सामील होतील. सायकल चालवल्याने पर्यावरणाला मोठी चालना मिळते. हा प्रदूषणावर एक प्रभावी उपाय आहे, यावर त्यांनी भर दिला. (वृत्तसंस्था)

# न्यूझीलंडचा इंग्लंडवर ४२३ धावांनी विजय

## इंग्लंडने २-१ ने मालिका जिंकली




मालिका विजयानंतर चषकासह इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स आणि सहकारी

◆ **हॅमिल्टन, १७ डिसेंबर**

हॅमिल्टन कसोटीत न्यूझीलंडने इंग्लंडचा ४२३ धावांनी पराभव केला आहे. किवींचा हा इंग्लंडवर धावांच्या फरकाने सर्वांत मोठा विजय आहे. तिसऱ्या कसोटीत ६५८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या इंग्लंड संघाला केवळ २३४ धावा करता आल्या. मात्र, इंग्लंडने ३ सामन्यांची कसोटी मालिका २-१ ने जिंकली. संघाने पहिला सामना ८ गडी राखून आणि दुसरा सामना ३२३ धावांनी जिंकला.

मंगळवारी सेडन पार्क येथील सामन्याच्या चौथ्या दिवशी इंग्लंडने २ बाद १८ धावांवरून खेळाला सुरुवात केली. जेकब बिथेलने ७६ धावांची तर जो रूटने ५४ धावांची खेळी खेळली. तर गस एटकिन्सनने ४३ धावांचे योगदान दिले.

न्यूझीलंडच्या मिचेल सँटनरने पहिल्या डावात ७६ धावा केल्या आणि ३ बळी घेतले. त्याने दुसऱ्या डावात ४९ धावा केल्या आणि ४ बळी घेतले. या कामगिरीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. इंग्लंडचा अष्टपैलू हॅरी ब्रूकला मालिकावीर घोषित करण्यात आले.

शनिवारी इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या डावात न्यूझीलंडने ३४७ धावा केल्या होत्या आणि इंग्लंडने १४३ धावा केल्या होत्या. न्यूझीलंडने दुसऱ्या डावात ४५३ धावा केल्या आणि इंग्लंडला ६५८ धावांचे लक्ष्य दिले.

न्यूझीलंडने इंग्लंडचा ४२३ धावांनी पराभव केला. धावांच्या फरकाने हा संघाचा सर्वांत मोठा संयुक्त विजय ठरला. याआधी २०१८ मध्ये क्राईस्टचर्चमध्येही या संघाने श्रीलंकेचा ४२३ धावांनी पराभव केला होता. (वृत्तसंस्था)

### टीम साऊदीचा शेवटचा कसोटी सामना



न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज टीम साऊदीचा हा शेवटचा कसोटी सामना होता. मालिका सुरू होण्यापूर्वीच त्याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. निवृत्तीची घोषणा करताना, ३५ वर्षीय सौदी म्हणाला, जर आमचा संघ जागतिक कसोटी अजिंक्यपद चषकाच्या अंतिम सामन्यासाठी पात्र ठरला तर मी उपलब्ध असेल.

# भारत जागतिक मुष्टियुद्ध चषकाचे यजमानपद भूषवणार

## २०२५ मध्ये होणार स्पर्धा

◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

भारत पुढील वर्षी नोव्हेंबरमध्ये जागतिक मुष्टियुद्ध चषक फायनलचे यजमानपद भूषवणार आहे. बॉक्सिंग फेडरेशन इंडिया (बीएफआय) तिसऱ्या जागतिक बॉक्सिंग परिषदेचेही आयोजन करेल, ज्यामध्ये अध्यक्ष आणि कार्यकारी मंडळाच्या पदासाठी निवडणुका होतील.

या वर्षाच्या सुरुवातीला नवीन नियामक मंडळात सामील होण्याचा निर्णय घेतल्यानंतर बीएफआयद्वारे आयोजित केलेली ही पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा असेल.

शेवटच्या वेळी बीएफआयने आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग असोसिएशन (आयबीए) महिला जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२३ मध्ये केली होती. बीएफआयचे अध्यक्ष अजय सिंग म्हणाले, अशा प्रतिष्ठित स्पर्धा आयोजित केल्याबद्दल जागतिक बॉक्सिंगने भारताला मान्यता मिळणे ही अभिमानाची बाब आहे. हे भारताच्या संघटनात्मक उत्कृष्टतेचे प्रतिबिंबित करते आणि ऑलिम्पिकचा एक भाग म्हणून बॉक्सिंग ठेवण्याची आमची अतूट बांधिलकी दर्शवते.

सिंग म्हणाले, खेळाच्या वारशात योगदान दिल्याबद्दल आणि २०२५ मध्ये जागतिक मुष्टियुद्ध समुदायाचे भारतात स्वागत करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. या स्पर्धेच्या तारखा जानेवारीत जाहीर केल्या जातील.

वर्षातील पहिला विश्व बॉक्सिंग चषक मार्चमध्ये ब्राझीलमध्ये होणार असून त्यानंतर जर्मनी, कझाकस्तान आणि भारतात स्पर्धा होणार आहेत.

जागतिक बॉक्सिंगचे अध्यक्ष बोरिस व्हॅन डर व्होर्स्ट म्हणाले, २०२४ मध्ये आमच्या पहिल्या विश्व बॉक्सिंग चषक मालिकेच्या प्रचंड यशानंतर, २०२५ मध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी आमच्याकडे चार प्रबळ दावेदार आहेत हे पाहणे आश्चर्यकारक आहे. मी ब्राझील, जर्मनी, कझाकस्तान आणि भारताच्या राष्ट्रीय महासंघांचे समर्थन आणि वचनबद्धतेबद्दल आभार मानू इच्छितो. (वृत्तसंस्था)

# विदर्भाचा सलग दुसरा विजय

## २३ वर्षांखालील एकदिवसीय स्पर्धा



◆ **बडोदा, १७ डिसेंबर**

येथील दर्शन् स्पोर्ट्स ॲण्ड एज्युकेशन अकादमी मैदानावर मंगळवारी झालेल्या 'अ' गटातील साखळी सामन्यात विदर्भाने २३ वर्षांखालील एकदिवसीय स्पर्धेत सलग दुसरा विजय मिळवला आहे. अनिकेत पांडेने सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक फटकावले व सामन्यातील सर्वाधिक धावा काढणारा फलंदाज ठरला. रविवारी पुद्दुचेरीवर चार गडी राखून विजय मिळवल्यानंतर विदर्भाच्या फलंदाजांचा आत्मविश्वास वाढला आणि मंगळवारी त्रिपुराविरुद्ध नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर विदर्भाने निर्धारित ५० षटकांत पाच बाद ३५० धावांची मजल मारली.

सलामीवीर शिवम देशमुख (४८) आणि अनिकेत पांडे (८५) यांनी ११८ चेंडूंत १०१ धावांची सलामी देत त्रिपुराला दबावात आणले. कर्णधार मोहम्मद फैजने ५६ चेंडूंत ७३ धावांचे योगदान दिले. हर्ष दुबेने केवळ २४ चेंडूंमध्ये आतषबाजी करीत ६८ धावांची नाबाद खेळी करीत धावसंख्येला आकार दिला. त्याने सहा षट्कार आणि पाच चौकार फटकावले.

३५० धावांचा पाठलाग करताना त्रिपुराने आक्रमक सुरुवात केली. तन्मय दास (५६) आणि ऋतुराज घोष रॉय (४९) यांनी सलामीला येथ १०८ धावांची भागीदारी केली. आनंद भौमिकने ८२ धावा काढत झुंज दिली. मात्र, त्रिपुरा संघाला धावगती कायम ठेवता आली नाही. विदर्भाकडून गोलंदाज हर्ष दुबेने ३३ धावा देत दोन फलंदाज टिपले, तर तरुण बिश्तने २१ धावांत दोन फलंदाजांना तंबूत पाठवले. (वृत्तसंस्था)

# गावस्कर यांनी इतर खेळाडूंनाही सूचना कराव्या

## प्रशिक्षक राजकुमार शर्मा यांचे मत

◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

महान फलंदाज सुनील गावस्कर यांनी धावा काढण्यासाठी धडपडणाऱ्या विराट कोहलीला सचिन तेंडुलकरच्या सिडनीतील २४१ धावांच्या ऐतिहासिक खेळीचे अनुकरण करण्याचा सल्ला दिला आहे. परंतु हा सल्ला भारताच्या सध्याच्या फलंदाजाने घेतला स्टार फलंदाजाचे बालपणीचे प्रशिक्षक राजकुमार शर्मा यांनी नकार दिला आणि या सूचनेवर ते अजिबात खुश नाहीत.

आपल्या किशोरवयात कोहलीचे प्रशिक्षक असलेले दिल्लीचे माजी ऑफस्पिनर राजकुमार यांनी मंगळवारी वृत्तसंस्थेला सांगितले की, सुनील गावस्कर हे एक महान खेळाडू आहेत आणि त्यांच्या सूचनांचे नेहमीच स्वागत आहे, परंतु मला आशा आहे ते इतरांनाही त्यांच्या फलंदाजीबद्दल सूचना करतील.

कसोटी क्रिकेटमध्ये १०,००० धावा आणि ३४ शतके झळकावणारे पहिले खेळाडू गावस्कर यांनी कोहलीचे नाव न घेता, समालोचन करताना खेळाडूंबद्दल सविस्तर बोलले.



राजकुमार म्हणाले, तो २००८ पासून चांगली कामगिरी करत आहे. दोन डावांच्या आधारे तो फॉर्मात नाही असे म्हणणे अयोग्य ठरेल. या मालिकेत त्याने यापूर्वी शतक झळकावले आहे. मालिकेत किती खेळाडूंनी शतक ठोकले?

भारताने ३०० हून अधिक धावांची आघाडी घेतल्यानंतर झालेल्या पर्थमधील कोहलीच्या दुसऱ्या डावातील शतकाचा त्याने उल्लेख केला.

२०२४-२५ च्या मोसमात, बांगलादेश मालिकेपासून सुरू झालेल्या, कोहलीची पहिल्या डावातील सरासरी ९.१२५ आहे आणि या काळात त्याने आठ डावांत ७३ धावा केल्या आहेत. सलग आठ कसोटी सामन्यांमध्ये एकही अर्धशतक न झळकावल्याबद्दल त्याच्यावर टीका झाली, याचे त्याला वाईट वाटते का? राजकुमार म्हणाले, प्रामाणिकपणे सांगायचे तर, मला आकडेवारीबद्दल जास्त माहिती नाही पण तो ज्या प्रकारचा खेळाडू आहे, तो परत येईल. मला वाटते की तो इतका चांगला खेळाडू आहे की त्याला काहीही बोलण्याची किंवा टीका करण्याची गरज नाही. (वृत्तसंस्था)

# ओडिशाने गोव्याला, दिल्लीने तामिळनाडूला हरविले

◆ **हैदराबाद, १७ डिसेंबर**

ओडिशाने संतोष ट्रॉफीसाठी ७८व्या वरिष्ठ राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेच्या ब गटातील सामन्यात माजी चॅम्पियन गोव्याचा २-० असा पराभव केला तर दिल्लीने तामिळनाडूवर विजय मिळवून विजयी घोडदौड सुरू ठेवली.

गेल्या सामन्यात पराभूत झालेल्या ओडिशाने चार मिनिटांत दोन गोल करत पाचवेळच्या विजेत्या गोव्याला हरवले. ओडिशाकडून राहुल मुखी (६०व्या मिनिटाला) आणि कार्तिक हंतल (६४व्या मिनिटाला) यांनी गोल केले. या विजयासह ओडिशा गटात चौथ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. दिवसाच्या दुसऱ्या सामन्यात दिल्लीने तमिळनाडूचा त्याच फरकाने पराभव केला. भरण्यु बन्सल (सातवे) आणि साओ (६५वे) यांच्या गोलमुळे दिल्लीने स्पर्धेतील विजयाची मालिका पाच सामन्यांपर्यंत वाढवली. या पराभवानंतर सहा संघांच्या गटात तामिळनाडू पाचव्या स्थानावर आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### क्रीडाशिक्षक समीर वायकुळे यांचा कृतीशील शिक्षक पुरस्काराने गौरव

**बार्शी, दि.१७ डिसेंबर-**

सुलाखे हायस्कूलचे उपक्रमशील क्रीडाशिक्षक समीर वायकुळे यांना उत्तम कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्यावतीने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. खेळाच्या माध्यमातून शाळेतील मुलांमध्ये खिलाडू वृत्ती निर्माण व्हावी तसेच विविध स्पर्धे तील सहभागातून त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी वायकुळे यांनी आजवर उत्तम कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे त्यांच्या मार्गदर्शनामुळे हायस्कूलमधील खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात जिल्हा व राज्यस्तरावर आपला ठसा उमटविला आहे. या कार्याबद्दल बार्शीतील यशवंतराव चव्हाण सभागृहात वायकुळे यांचा आ. दत्तात्रय सावंत व इतिहास अभ्यासक श्रीमंत कोकाटे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.



### उपळे दुमाला येथे क्रियाशील मासेमारांची ऑनलाईन नोंदणी कार्यक्रम

**बार्शी, दि. १७ डिसेंबर-**

तालुक्यातील मौजे उपळे दुमाला येथे मत्स्य व्यवसाय विभाग अंतर्गत मासेमारांची एनएफडीपीवर ऑनलाईन नोंदणी कार्यक्रम श्री. रत्नाकर राजम, सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग सोलापूर यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली उपळे दुमाला ग्रामपंचायत कार्यालयात संपन्न झाला. यामध्ये परिसरातील मासेमारांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन नाव नोंदणी केली. यात सभासदांना सदर पोर्टलची माहिती देण्यात आली. मत्स्य व्यवसाय विभागातील विनोद वाघमोडे, प्रदीप पाटील व श्रीमती रेखा रावणगाव यांनी विशेष परिश्रम घेऊन मासेमारांना केसीसी आणि अपघात गटविमा याची माहिती दिली. सदर कार्यक्रमास गावातील बालाजी मत्स्य संस्थेचे अध्यक्ष जयंत बुरगुटे, कैलास नेवाळे, उमाकांत ढावारे, विनोद कांबळे, बाळासाहेब ढावारे, बापू आवटे तसेच संस्थेचे बहुतांश सभासद उपस्थित होते. या कार्यक्रमाला स्थानिक सीएससी सेंटरचे अजित शिंदे, आशिष सोनटक्के व हनुमंत सारंग यांनी मोलाचे सहकार्य केले.



### पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात पोलिस पाटील दिन साजरा

**पंढरपूर, दि. १७ डिसेंबर -**

येथील तालुका पोलीस ठाण्यात पोलीस पाटील दिन साजरा करण्यात आला. यावेळी तालुक्यातील सर्व पोलीस पाटलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर,एपीआय रेळेकर, एपीआय पाटील,पीएसआय भोसले, पीएसआय वडने, पोलीस पाटील संघटनेचे राज्य प्रसिद्धीप्रमुख तोफिक शेख, राज्य सचिव देठे, पंढरपूर तालुका अध्यक्ष विजय वाघमरे व तालुक्यातील सर्व पोलीस पाटील हजर होते.



### कबड्डी स्पर्धेत सोलापूर विभाग विजेता; संघात कर्मयोगीच्या खेळाडूंचा समावेश

**पंढरपूर, दि. १७ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नोलॉजीकल यूनिवर्सिटी लोणेरे अंतर्गत आंतर महाविद्यालयीन आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेत सोलापूर झोनच्या पुरुष संघांनी विजेतेपद व महिलांनी उपविजेतेपद संपादिले. विभागीय संघात कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या तीन पुरुष व सहा महिला खेळाडूंचा समावेश होता. यशोदा टेक्निकल कॅम्पस यांच्या सहकार्याने आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. या संघात कर्मयोगीच्या सहा मुली खेळाडू होत्या. सुहानी यादव (कर्णधार), वृशाली बाबर, रेवती घळके, अर्चना कांबळे, पूनम काळे, राधिका शिंदे, ऋतुजा कदम, भक्ति मोरे, रुद्राक्षी यादव, तेजस्विनी कांबळे, साक्षी महापूरकर व माधवी पांढरे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत संघास विजेतेपद पटकावून दिले. मुलींच्या संघाचे सराव शिबीर कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे पार पडले. या संघास प्रा. गणेश बागल यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मुलांच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. यामध्ये सोलापूर झोन मधील उत्कृष्ट खेळाडू निवडून सोलापूर झोनचा संघ तयार करण्यात आला होता. त्यामध्ये कर्मयोगीच्या तीन खेळाडूंचा समावेश होता. या संघाचे सराव शिबीर एम. जी. एम. कॉलेज ऑफ इंजिनिरिंग नांदेड येथे पार पडले. यावेळी संघ प्रशिक्षक म्हणून प्रा. मनोज राठोड यांची नियुक्ती करण्यात आली होती. पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, प्रा. शिवशारण कोरे, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी.कणसे, रजीस्ट्रार जी.डी. वाळके, उपप्राचार्य प्रा.जे एल. मुडेगावकर, डॉ. अभय उत्पात, प्रा. आशीष जोशी, प्रा. डॉ. एस. व्ही. एकलारकर, प्रा. अनिल बाबर, प्रा. सोमनाथ लंबे, प्रा. दीपक भोसले, प्रा. अभिनंदन देशमाने यानी अभिनंदन केले.

# शरद पवारांनी पुरोगामित्वाला सोडचिठ्ठी दिली

## प्रा. सकटे यांची माहिती : राहुल गांधींना मारकडवाडीमध्ये काळे झेंडे दाखवणार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १७ डिसेंबर-**

उत्तम जानकरांनी धनगर असताना खाटीक जातीचा दाखला काढला आहे. त्यांनी खोटा दाखला काढुन एस.सी. च्या हक्काची चोरी केली आहे. हे शरद पवारांना, जानकरांना उमेदवारी देताना माहिती नव्हते का? मुळात शरद पवारांनीच पुरोगामित्वाला सोडचिठ्ठी दिली आहे. दलितांचे, आदिवासींचे राजकिय हे त्यांनाच मिळाले पाहिजे असे संविधान सांगते. परंतु शरद पवार आणि राहुल गांधी यांना संविधानाचे काही देणे घेणे नाही. राहुल गांधीना आम्ही मारकडवाडीमध्ये काळे झेंडे दाखवणार असल्याचे दलित महासंघाचे अध्यक्ष प्रा.मच्छिंद्र



सकटे यांनी अकलूज येथे पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

या पत्रकार परिषदेला राजाभाऊ खिलारे, शेखर खिलारे, ॲड. अविनाश काले, बाळासाहेब धाईजे, पी.एस. गायकवाड, केरबा लांडगे, सुनिल अवघडे, पांडुरंग खिलारे, छगनराव गायकवाड, बहुजन समता पार्टी, सांगली जिल्हाध्यक्ष बळीराम रणदिवे उपस्थित होते.सकटे पुढे म्हणाले, माळशिरस तालुक्यात जात बदलुन सुमारे १५८ जातीचे दाखले काढण्यात आले आहेत. त्यात धनगर समाज अग्रस्थानी आहे. माळशिरस तालुक्या बरोबरच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये जात चोरांची संख्या वाढली आहे. त्यामुळे एस.सी. वर्गात असणाऱ्यांच्या हक्कांवर गदा येत आहे. त्यांच्या राजकिय हक्कांवर अतिक्रमण होत आहे. त्यामुळे आम्ही माळशिरस तालुका अनुसुचित जाती हक्क संरक्षण कृती समिती तयार केली असून आम्ही जात चोरांच्या विरोधात जनआंदोलन उभे करणार आहोत. त्यांच्या विरोधात न्यायालयीन लढाई लढणार आहोत. शरद पवारांनी २०१९ मध्येच माळशिरस व मोहोळ विधानसभा मतदार संघात अशा जात चोरांना उमेदवारी दिली होती. त्यामुळे त्यांच्या राजकिय भुमिकेबद्दल आमच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे. राज्यातील बहुतांश सर्वच राजकिय पक्षांनी अशा जात चोरांना उमेदवारी देवून त्यांना आमदार खासदार होण्यासाठी मदतच केली आहे. अशा जात चोरांच्या विरोधातील न्यायालयीन लढाई ही फार वेळखाऊ असते. न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत यांची आमदारकी, खासदारकीची पाच वर्षे संपलेली असतात. त्यासाठी अशा जात चोरांच्या विरोधातील न्यायालयीन लढाई फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये चालवली जावी, अशी आम्ही मागणी करत आहोत. अनुसुचित जातींच्या जागांवर राज्यातील प्रामुख्याने धनगर आणि लिंगायत समाजाने अतिक्रमण केलेले आहे. यामुळे आमच्या भावी पिढ्यांच्या राजकिय, शैक्षणिक व आर्थिक अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालाय. या जात चोरांना रोखण्यासाठी दलितांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

> गत विधानसभा निवडणुकांमध्ये शरद पवारांनी उत्तम जानकरांना धनगर नेता म्हणून राज्यात प्रचारासाठी नेले. तेथे जानकरांना मी किती गरीब धनगर समाजातून आलो आहे. मी कसा धनगर समाजाच्या आरक्षणासाठी लढा दिला आहे. असे सांगून मते मिळवण्याचा प्रयत्न केला. मग हेच जानकर स्वतःला राज्यभर धनगर म्हणवून घेतात आणि माळशिरस तालुक्यात आले की खाटीक होतात. हा चमत्कार होतोच कसा. आणि तो शरद पवारांना चालतोच कसा. शरद पवार हे सोयीचे राजकारण करत आहेत. जानकरांना उमेदवारी देणे म्हणजे दलितांच्या विरोधातील कृतीच आहे. हे संविधान विरोधी आहे.
>
> **- प्रा. मच्छिंद्र सकटे**

## पश्चिम महाराष्ट्र संघाची विजयी सलामी

### दिव्यांगांच्या शालेय राज्य क्रिकेट स्पर्धा : गंगा कदम सामनावीर



**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

दिव्यांगाच्या राज्य शालेय क्रिकेट स्पर्धेत पश्चिम महाराष्ट्र संघाने विजयी सलामी दिली.

रेल्वे मैदानावर सुरु झालेल्या सलामीच्या सामन्यात पश्चिम महाराष्ट्र संघाने विदर्भ संघाचा ८१ धावांनी पराभव केला. यात गंगा कदम हिने ४५ चेंडूत १७ चौकारांच्या सहाय्याने नाबाद ९९ धावा फटकाविल्या व २ गडी बाद केले. गंगा ही या सामनावीर ठरली. मुलांच्या सामन्यात दमाणी अंध शाळेने राजीव गांधी अंध शाळेचा ३९ धवांनी पराभव केला. यात रोहित कुंभार याने २० चेंडुत २९ धावा केल्या. तो सामन्याचा मानकरी ठरला. सामनावीर ठरला. जागतीक दिव्यांग दिन व पंधरवाड्याचे औचित्य साधुन, लुई ब्रेल अंध विकास, बहुद्देशीय सामाजिक संस्था सोलापूर यांचे वतीने रेल्वे मैदानावर ही स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेसाठी अंध मुलींचे विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र हे संघ त्याच प्रमाणे शालेय अंध मुलांच्या स्पर्धेमध्ये येथील भैरुरतन दमाणी अंध शाळा व राजीव गांधी मेमोरिअल स्कुल फॉर दि. ब्लाईंड हे संघ सहभागी झालेले आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी केले. यावेळी बलदवा परिवारातील नंदकिशोर वलदवा, गिरीष बलदवा, मधुसूदन बलदवा, आल्का बलदवा, संतोष भंडारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजु शेळके यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष सुरज सोनटक्के यांनी आभार केले. संस्थेचे महासचिव संतोष देशमुख यांनी सुत्रसंचलन केले.





## स्टार क्रिकेटर अजिंक्य रहाणे सोलापुरात

### वडापूर येथील अंगणवाडीच्या चिमुकल्यांशी मनमोकळ्या गप्पा मारत चाखली खिचडीची चव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर**

भारताचा स्टार क्रिकेटर अजिंक्य रहाणे सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर या गावातील अंगणवाडी तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी अंगणवाडीतील तयार होणारी खिचडीची चव चाखून चिमुकल्यासोबत मनमोकळ्या गप्पा मारल्या.

दरम्यान, अर्थ फिट या सामाजिक संस्थेच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध उपक्रम पाहण्यासाठी अजिंक्य रहाणे हे सोलापूर दौऱ्यावर आहेत. मंगळवारी दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर या ठिकाणी त्यांनी गाव फिरताना जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाडी तसेच इतर ग्रामपंचायत येथे भेटी देत पाहणी केली.

अंगणवाडीतील चिमुकले विद्यार्थी तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसोबत त्यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात येत असलेल्या खिचडी किचनला त्यांनी भेट दिली यावेळी विद्यार्थ्यांची खिचडी त्यांनी टेस्ट केली. नंतर मुलांमध्ये बसून गप्पा मारल्या.भारतीय क्रिकेटर अजिंक्य रहाणे हे वडापूर गावांमध्ये आले असल्याची माहिती पंचक्रोशीत कळल्यानंतर त्यांना पाहण्यासाठी विशेष करून क्रिकेट प्रेमी युवकांची मोठी गर्दी होती.



## पंढरपुरात किल्ला स्पर्धेत शिवप्रेमी दहा ग्रुप विजेते; खुल्या गटात अभिषेक कुलकर्णी अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. १७ डिसेंबर -**

येथील जय महाराष्ट्र युवा मंच आणि रुक्मिणी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य किल्ला स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच पार पडला. जय महाराष्ट्र युवा मंच तर्फे आयोजित किल्ला स्पर्धेचे हे १० वे वर्ष आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जय महाराष्ट्र युवा मंचचे संस्थापक श्रीराम साळुंखे तर प्रमुख पाहुणे म्हणून सुहासिनी डेअरीचे मालक आणि प्रसिद्ध व्याख्याते शशिकांत कराळे उपस्थित होते.

प्रास्ताविक ॲड. सोहम व्होरा यांनी केले. यानंतर सर्व विजेते तसेच सर्व सहभागी यांचा प्रशस्तीपत्र आणि पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. सदर किल्ला स्पर्धा ही शालेय गट, महिलांसाठी हिरकणी गट, खुला गट आणि सांघिक गट अश्या चार गटात आयोजित केली होती. किल्ले बांधणी, पर्यावरणपूरक सजावट आणि गडकिल्ले विषयाचे ज्ञान यांच्या आधारे या किल्ल्याचे परीक्षण करण्यात आले. परीक्षक म्हणून सोहम व्होरा, श्रीराम साळुंखे यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी रुक्मिणी प्रतिष्ठानचे श्रीकृष्ण साळुंखे, जय महाराष्ट्र युवा मंचाचे श्रीराम साळुंखे, मनीष कुलकर्णी, हेमंत विभते आणि इतर सर्व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**खुला गट :-** अभिषेक कुलकर्णी,स्वानंद कुलकर्णी श्रेयस बडवे.
**हिरकणी गट:-** श्वेता घाडगे, ऐश्वर्या कुलकर्णी कार्तिकी कुलकर्णी.
**शालेय गट:-** दुर्वांकुर बेणारे, ओम बडवे, अवधूत महाजन.
**सांघिक गट:-** शिवप्रेमी १० ग्रुप, संकल्प प्रतिष्ठान, शिवाज्ञा ग्रुप, चळे

## परभणीच्या माथेफिरुला अटक करण्याची मागणी



### पंढरपूर येथील रिपाइं (आठवले) यांच्या वतीने निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ डिसेंबर-**

संविधान प्रतिकृतीचा अवमान करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. त्याची सीबीआय मार्फत चौकशी करावी, अशी मागणी रिपाइं पंढरपूर तालुका अध्यक्ष संतोष पवार यांनी केली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पंढरपूर तालुका व शहरच्या वतीने पंढरपूर तहसील कार्यालय येथे मंगळवारी (ता.१७) आंदोलन करण्यात आले.

परभणी येथील भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ संविधान प्रतिकृतीच्या अवामान करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून पोलीस कोठडी मध्ये पोलीसांनी मारहाण केल्यामुळे त्यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. त्यांची सी.बी.आय.मार्फत चौकशी करावी, अशी मागणी पंढरपूर येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पंढरपूर तालुका व शहर यांच्या वतीने परभणी प्रकरणाचा निषेध नोंदवून पंढरपूर तहसील कार्यालय येथे तहसीलदार सचिन लंगुटे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी राज्य सचिव सुनील सर्वगोड, पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस जितेंद्र बनसोडे, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष आप्पासाहेब जाधव, बाळासाहेब कसबे पश्चिम महाराष्ट्र सचिव, कुमार भोसले पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष, ॲड. कीर्तीपाल सर्वगोड शहराध्यक्ष, विजय खरे शहर कार्याध्यक्ष, दयानंद बाबर तालुका सरचिटणीस, सचिन गाडे शहर सरचिटणीस, सचिन भोसले तालुका कार्याध्यक्ष, संदेश माने जि.युवक संघटक, विशाल मांदळे युवक श.अध्यक्ष, निलेश जाधव, भैय्या फडतरे, बत्तास वनसाळे, विशाल कसबे सरपंच, विक्रम चंदनशिवे,पोपट क्षीरसागर,आकाश शिंदे, नितीन गायकवाड, समाधान आठवले, रुपेश वाघमारे,महादेव सोनवणे, राघु भोपळे, आण्णा कांबळे, दत्ता वाघमारे, अमर फडतरे उपस्थित होते.

## विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठाच्या आंतर विभागीय निवड बुद्धिबळ स्पर्धेत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू दिक्षा कुलकर्णी, दर्शन जाधव या मानांकित खेळाडूंसह निखिल अंबुरे, शशिकांत बनसोडे, श्रेयस बोबडे यांच्यासह मुलींमध्ये धनश्री नेरकर, सृष्टी गायकवाड, युक्ता कांबळे, प्रज्ञा कुतवडे, जाणकी शर्मा यांनी देखील आकर्षक विजय मिळविले.

एन. के. ऑर्चिड महाविद्यालयाने सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या स्पर्धेस आज सुरुवात झाली. या स्पर्धेत सोलापूर विभागासह नागपूर, जळगाव, पुणे व कोल्हापूर विभागातील निवड झालेल्या मुले व मुलीनी सहभाग नोंदविला.



तसेच आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू स्वप्नील बुडके याला आदित्य गणवीरने अनपेक्षितरित्या पराभूत केले तर रोहित बुडके याला बिगरमानांकित तेजसगिरी गोसावी यांने बरोबरीत रोखत धक्कादायक निकाल नोंदविला. ऑर्चिड महाविद्यालयात सुरु असलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन उद्घाटन क्रीडा समन्वयक डॉ बालाजी फुलचवाड बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांच्या हस्ते व एन. के. ऑर्चिड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी के सोनगे यांच्या अध्यक्षतेखाली उपप्राचार्य डॉ. पत्की, सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड, स्पर्धा निरीक्षक प्रा. सावंत, झोनल सचिव प्रा. शिवशरण कोरे, आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ प्रशिक्षक सुमुख गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. यु. के. जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा आवटे यांनी मानले. या स्पर्धा पार पाडण्यासाठी बुद्धिबळ संघटनेचे पंच उदय वगरे, प्रा. रुचिता श्रीराम, वामन पवार, पुकाळे सर, पासकंटी सर, दादा पांगळे, प्रमोद लिगाडे यांनी सहकार्य केले.

## विविध प्रश्न सोडविण्यासाठी अल्पसंख्याक आयोगाशी संपर्क साधावा

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

विविध प्रश्न सोडविण्यासाठी संबंधितांनी अल्पसंख्यांक आयोगाशी संपर्क साधावा, असे आवाहन या आयोगाचे सदस्य वसीम बुऱ्हाण यांनी केले आहे. महायुती सरकारने महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजासाठी महत्त्वपूर्ण अनेक निर्णय घेतले आहेत. अल्पसंख्यांक भागातल्या विकास कामांसाठी पहिल्या अर्थसंकल्पात ७०० कोटी आणि आता २६६ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. दरम्यान, बुधवार दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्यांक संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांची बैठक जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली आहे. सोलापुरातील सामाजिक, शैक्षणिक धार्मिक व विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी या बैठकीस उपस्थित राहून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाकडे आपल्या समस्या व तक्रारी सादर कराव्यात. या तक्रारीवर आयोगाकडून पाठपुरावा करण्यात येईल.

## संक्षिप्त वृत्त



### पाटील पंचकन्येकडून सुंदराबाई डागा शाळेस शैक्षणिक साहित्य भेट

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**
मनपा मराठी मुलांची सुंदराबाई डागा शाळेमध्ये पाटील पंचकन्येकडून महानगरपालिका सुंदराबाई डागा शाळेस स्टडी टेबलसह शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. मनपा मराठी मुलांची सुंदराबाई डागा शाळेमध्ये कै. लक्ष्मण विठ्ठल पाटील यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पंचकन्या मनीषा पाटील, उषा पाटील, स्वाती पाटील,शिल्पा पाटील, आरती पाटील यांच्याकडून मुलांना २१ स्टडी टेबल व जवळपास २५ हजार रुपयाचे शैक्षणिक साहित्य भेट दिले. प्रा. विक्रमसिंह बायस यांनी कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश स्पष्ट केला.तर कार्यक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन नागेश गोसावी यांनी केले. प्रास्ताविक दिवसे यांनी केले तर आभार मनोज पाटील यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक राजीव क्षीरसागर, मनोज पाटील, गिरीश कुरुडे, कावेरी पवार आदींसह शिक्षक वृंद उपस्थित होते.



### तामलवाडी शिवारात बिबट्या सदृष्य प्राण्याचा वावर

**सोलापूर, दि.१७ डिसेंबर-**
तुळजापूर तालुक्यातील तामलवाडीसह परिसरात बिबट्या सदृष्य प्राणी आढळुन आल्याचे काही शेतकऱ्यांनी पोलिसांना सांगितले असून, शेतकरी व नागरीकांनी सतर्क रहावे असे आवाहन तामलवाडी पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान, या बिबट्याच्या भीतीने शेतकरी बांधव शेताकडे जाण्यासही भित आहेत. तालुक्यातील चव्हाणवाडी येथे दोन दिवसांपूर्वी हा आढळून आल्याचे समजले. १६ डिसेंबर रोजी तामलवाडी येथील साठवण तलावाच्या परीसरात पिंपळा बु. येथील शेतकऱ्यांनी आढळून आल्याचे सांगितले. तामलवाडी, पिंपळा बु., पिंपळा खुर्द, गंगेवाडी येथील शेतकऱ्यांनी सावधानता बाळगण्यास सांगितले आहे. यामुळे या परीसरातील शेतकरी व नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरलेले आहे. रात्री किंवा सकाळी शेतामध्ये जाताना शेतकरी बांधवांनी सावधानता बाळगुन शेताकडे जावे, असे आवाहन तामलवाडी येथील ग्रामपंचायतीच्या वतीनेही करण्यात येत आहे. दरम्यान, या बिबट्यामुळे तामलवाडी येथील ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरलेले दिसून येत आहे.

# ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रेनिमित्त मंदिरात रंगरंगोटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**
सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची यात्रा दृष्टीक्षेपात आली असून, यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरात तयारी सुरू झालेली आहे. यात्रेच्या अनुषंगाने शहरातील विविध मंदिर आणि मंदिर परिसरात मंदिर समितीच्या वतीने रंग-रंगोटीचे कामकाजास सुरुवात करण्यात आली आहे. श्रीदत्त जयंतीचे औचित्य साधून रंगरंगोटी सुरू झाली असून, जुने सिद्धेश्वर मंदिर परिसरात रंगरंगोटी पूर्ण करण्यात आली आहे. तर रेवणसिधदेश्वर मंदिर रंगवण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

दरम्यान, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमटीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील श्री सिद्धेश्वर मंदिर, रेवणसिद्धेश्वर मंदिर, जुने सिद्धेश्वर मंदिर, गुरुभेट, तसेच सिद्धेश्वर महाराजांनी शहरात



स्थापित केलेल्या ६८ शिवलिंग आणि अष्टविनायक मंदिरांना रंग दिला जातो. यात्रेच्या अनुषंगाने दरवर्षी एक महिना अगोदर या कामकाजास सुरुवात होते. त्याच पार्श्वभूमीवर श्रीदत्त जयंती पासून या कामकाजाला सुरुवात झाली आहे.

### सुमारे ९०० लिटर विविध रंगांचा होतोय वापर



ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील रंगरंगोटी केली जात आहे. यासाठी १६ कामगार काम करत आहेत. रंगकामासाठी सुमारे ८०० ते ९०० लिटर रंग लागतात. त्यामध्ये ऑइल बॉण्ड, ऑइल पेंट, प्रायमर, अपेक्स अल्टिमा, असे विविध रंगांचा समावेश आहे. यात्रेच्या अगोदर रंगकामाचे काम पूर्ण केले जाते. एक सेवा म्हणून श्रींचे काम गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. सकाळी सात वाजल्यापासून ते संध्याकाळी सात वाजेपर्यंत हे काम सुरू राहते.

**-मनोज कडाळे, पेंटर.**

### शहरात यूपी, बिहारी कामगारांची वाढतीय संख्या

ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेनिमित्त शहरातील विविध ६८ शिवलिंग, तसेच अष्टविनायक मंदिर, जुने सिद्धेश्वर मंदिर, रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसरास रंग देण्यासाठी यु.पी. आणि बिहार येथील कामगार येतात. सध्या यु.पी आणि बिहार येथील कामगारांची संख्या महाराष्ट्रात जास्त आहे. सर्व कामे करण्यासाठी हे कामगार तत्पर असतात. त्यामुळे सोलापूर मध्ये देखील युपी आणि बिहारी कामगारांची संख्या वाढत आहे. मनोज कडाळे यांच्याकडे चार ते पाच यु.पी बिहारी कामगारांची संख्या आहे.

# शहीद सूर्यवंशी यांच्या मृत्यूची चौकशी करा

### भीमशक्ती संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर -**
परभणी येथील पोलिसाच्या मारहाणी मृत्यू पावलेल्या शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्युची न्यायालयीन चौकशी करा अश मागणी करत मंगळवारी सकाळी भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करण्यात आली.

परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ लावण्यात आलेल्या संविधान प्रास्ताविकेचे विटंबना केल्यामुळे उद्धवलेल्या उद्रेकात तेथील पोलीस प्रशासनाने भीम अनुयायी यांना अमानुष अशी मारहाण केली. अनेकांना गुन्ह्यात अटक केली. त्याचे पडसाद संपूर्ण राज्यभर उमटले. या प्रकरणात न्यायालयीन कोठडी भोगत असलेल्या शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला. याला सर्वस्वी पोलीस प्रशासन जबाबदार आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निवृत्त न्यायाधीशाच्या मार्फत न्यायालयीन चौकशी करावी. अशी मागणी करत राज्य सरचिटणीस वाघमोडे व पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस राजा कदम व शहराध्यक्ष उमेश सुरते यांच्या नेतृत्वाखाली ही निदर्शने करण्यात आली.

प्रारंभी पार्क चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन तसेच शहीद



सोमनाथ सूर्यवंशी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

याप्रसंगी प्रमिला तूपलवंडे, ॲड कमरुनिसा बागवान, संध्या काळे, शोभा बोबे, नसरीन शेख, राजश्री साबळे, मयूर तळभंडारे, प्रकाश बनसोडे, रफिक शेख, सलीम मुल्ला, गणेश बंदनशिवे भारती रसागर, समिन साबळे, राजा नागटिळक, कीर्ती शिवशरण, मनोज लोंढे, आदि पदाधिकारी बहुसंख्याने यावेळी उपस्थित होते.

# मध्य रेल्वेने प्रवासी वाहतुकीच्या उत्पन्नात केली उल्लेखनीय वाढ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**
मध्य रेल्वेने चालू आर्थिक वर्षात नोव्हेंबर २०२४ पर्यंत प्रवासी वाहतूक आणि उत्पन्नात उल्लेखनीय वाढ केली आहे.

मध्य रेल्वेने या आर्थिक वर्षात प्रवासी भाड्यातून ४ हजार ९६६ कोटी रुपये मिळवले आहेत, जे मागील वर्षी याच कालावधीत ४ हजार ६९९ कोटी रुपये होते. अशा प्रकारे ५.६८% ची वाढ झाली आहे.

यामध्ये नोव्हेंबर-२०२४ पर्यंत गैर-उपनगरीय उत्पन्नाच्या मार्गाने ४ हजार ३२८ कोटीं रुपयांचा समावेश आहे, जो मागील वर्षीच्या याच कालावधीतील ४ हजार ९५ कोटी रुपये होता. जो नोव्हेंबर-२०२४ पर्यंत उपनगरीय उत्पन्नाच्या मार्गाने ५.६९% आणि ६३८ कोटीं रुपयांनी वाढला आहे. मागील वर्षी याच कालावधीतील ६०४ कोटी रुपयांच्या तुलनेत ५.६३ टक्के ने वाढ झाली आहे. प्रवासी संख्येच्या बाबतीत, मध्य रेल्वेने या आर्थिक वर्षात नोव्हेंबर-२०२४ पर्यंत १०६४ दशलक्ष प्रवाशांची वाहतूक केली होती, जी मागील वर्षी याच कालावधीत १०३९ दशलक्ष प्रवाशांच्या तुलनेत २.३५ टक्के ची वाढ नोंदवली आहे. यामध्ये या आर्थिक वर्षात १२७ दशलक्ष गैर-उपनगरीय प्रवाशांचा समावेश आहे, गेल्या वर्षीच्या १२१ दशलक्ष गैर-उपनगरीय प्रवाशांच्या तुलनेत ५.६१ टक्के वाढ झाली आहे.

यामध्ये या आर्थिक वर्षात ९३६ दशलक्ष उपनगरीय प्रवाशांनी प्रवास केला आहे, गेल्या वर्षी ९१८ दशलक्ष उपनगरीय प्रवाशांनी प्रवास केला होता. उल्लेखनीय म्हणजे, एकट्या नोव्हेंबर २०२४ मध्ये मध्य रेल्वेने १३८ दशलक्ष प्रवासी (१२२ दशलक्ष उपनगरी आणि १६ दशलक्ष गैर-उपनगरीयांसह) प्रवास केला आणि ५५४ कोटी रुपयांचा महसूल मिळवला (८४ कोटी रुपये उपनगरीय उत्पन्न आणि ४७० कोटी गैर-उपनगरीय उत्पन्नाचा समावेश आहे).

संजय गांधी निराधार योजना

# लाभार्थ्यांच्या खात्यावर एप्रिल ते नोव्हेंबर अखेर २६ कोटी ७६ लाख वर्ग

### तहसीलदार शिल्पा पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**
सोलापूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना केंद्र आणि राज्य शासनाकडून विशेष सहाय्य योजना अनुदानातून एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ पर्यंत २६ कोटी ७६ लाख ७५ हजार २०० रूपयांचे वाटप झाल्याची माहिती संगायो जिल्हा कार्यालयाच्या तहसीलदार शिल्पा पाटील यांनी आज (दि. १७) दिली.

या योजनेचे सोलापूर जिल्ह्यात लाभार्थी ८८ हजार १७३ इतके असून, यामध्ये राज्याकडून १ लाख ७३ हजार ५१० इतक्या लाभार्थ्यांना आर्थिक मदत येते तर ३१ हजार ३२४ जणांना केंद्राकडून आर्थिक लाभ मिळतो. जिल्ह्यातील संगायोच्या सर्वसाधारण असलेल्या ६३ हजार ६४६ इतक्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो तर संगायो अनु.

संजय गांधी निराधार अनुदान योजना

जाती ७ हजार ३९२, संगायो अनु. जमाती ४५३ अशा एकूण ७१ हजार ४९१ जणांना याचा लाभ मिळतो. तर श्रावणबाळ (सर्वसाधारण) ८८ हजार १७३, श्रावणबाळ अनु. जाती १३ हजार ४१९, श्रावणबाळ अनु. जमाती ४२७, अशा १ लाख ०२ हजार ०१९ इतक्या लाभार्थ्यांना आर्थिक लाभ मिळतो. तर इंगायो वृध्दापकाळ योजनेतून २८ हजार २६५, इंगायो विधवा २४२०, इंगायो दिव्यांग ३१७, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना ३२२ जणांना लाभ मिळतो. ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्याची आर्थिक मदतही तालुकानिहाय वर्ग करण्यात आली असून, येत्या काही दिवसात सर्व लाभार्थ्यांच्या खात्यावर ती वर्ग होणार आहे.

# सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वेमार्गाची ‘झिरो पेंडन्सी’

### वनविभागासह शेतकऱ्यांचे भूसंपादन करून रेल्वे विभागाकडे १८७.33 हेक्टरचा दिला ताबा

### रेल्वेकडून आता लवकरच सुरू होणार काम

### भूसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अमोलसिंह भोसले यांची माहिती

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**
सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वेमार्गाचे काम आता काही दिवसात सुरू होणार असून, त्यासाठी सोलापूर हद्दीतील १८७.३३ हेक्टर क्षेत्र (वनविभागासह) भूसंपादित करून सर्व क्षेत्र रेल्वे विभागाकडे सुपूर्द केले आहे आणि यासाठी कसलीही पेंडन्सी ठेवली नसल्याची माहिती भूसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अमोलसिंह भोसले यांनी आज (दि. १७) दैनिक तरुण भारतशी बोलताना दिली. दरम्यान, आता या २४ किलोमीटर रेल्वेमार्गाच्या कामाची सुरूवात लवकरच होणार असल्याचेही ते म्हणाले.



या रेल्वेमार्गाबाबत विस्तारितपणे बोलताना भोसले म्हणाले की, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या रेल्वेमार्गासाठी सोलापूर हद्दीतील खेड, बाळे, सेवालालनगर, कसबे सोलापूर, मार्डी, होनसळ, भोगाव, देगाव, बाणेगाव, शहर सोलापूर मुरारजी पेठ आदी ठिकाणची १८७.३३ हेक्टर इतकी जमीन भूसंपादन केली होती. या मार्गाची लांबी २४ किलोमीटर असून, यासाठीचा ताबा रेल्वे विभागाकडे दिला असून, याबाबत आमच्या विभागाने कोणतीही पेंडन्सी ठेवली नाही. या मार्गासाठी जिल्हा हद्दीतील २६० गटातील ५ हजार ८४ जणांची जमीन भूसंपादन केली आहे. यासाठीची नुकसानभरपाई म्हणून ६२०.०९ कोटी रूपये मंजूर करण्यात आले होते. यातील २९४.५७ कोटीचा जमीन मावेजा वाटप करण्यात आला आहे. तर यातील मावेजा वाटपाची शिल्लक रक्कम ३२५.५२ कोटी आहे. आता वरील सर्व जमिनीचा ताबा घेतला असून, भूसंपादनाची झिरो पेंन्डसी आहे. या वरील जमिनीत महसुली फॉरेस्ट क्षेत्र ३ हेक्टर ३६.८५ आर इतके होते. त्याचाही ताबा रेल्वे विभागाकडे दिला आहे.

### धाराशिवचे जिल्ह्यातील रेल्वेकाम सुरू


धाराशिवकडून सध्या रेल्वेचे तीन टप्प्यात काम सुरू झाले आहे. यामध्ये सध्या ८ किलोमीटरवरील खोदकाम, भराव आणि पुलांच्या कामांना हाती घेण्यात आले आहे. धाराशिव ते तुळजापूर या ३० किलोमीटर अंतरावर एकूण १७ मोठे पूल आहेत. तर ३३ छोटे पूल साकारले जाणार आहेत. एकूण ५० छोटे-मोठे पूल ३० किलोमीटर अंतरावर आहेत. त्यात रेल्वे स्थानकाजवळ सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर १०६ मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल उभारण्यात येणार आहे. या पुलाच्या नकाशांचे काम अंतिम टप्प्यात आहे. पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटरच्या ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी ५४४ कोटी रूपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. या मार्गावरील अन्य पुलांच्या कामांना डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच हाती घेतले जाणार आहे.

### पोटहिस्से मोजणीनुसार उर्वरित लाभार्थ्यांना मिळणार मोबदला

सोलापूर हद्दीतील भूसंपादित जमिनीचा मावेजा योग्य त्या लाभार्थ्यांना मिळण्यासाठी प्रत्येक भूसंपादित गटातील पडलेल्या पोटहिस्स्याचे वाटप उपअधीक्षक, भूमिअभिलेख उत्तर सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या पोटहिस्स्याच्या मोजणी अहवालानुसार त्रुटी नसलेले अहवाल तपासून करण्यात येणार आहे. ज्यांच्या जमीन मावेजा तक्रारी होत्या...त्यांचे पैसेही कोर्टाकडे वर्ग केले आहेत. सध्या याबाबतच्या सुनावण्याही गतीने सुरू असून, उर्वरित लाभार्थी शेतकऱ्यांनीही जमिनीच्या वादाच्या तडजोडी करून आपले पैसे खात्यावर वर्ग करून घ्यावेत.

**- अमोलसिंह भोसले,**
**भूसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी**







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## क्राईम वृत्त...



### चोरट्याने खिशातून मोबाईल पळवला

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

मार्केट यार्ड येथील महाराष्ट्र ट्रेडर्स दुकानाजवळ फिर्यादी सोमनिंग महादेव पुजारी (वय४०, रा.वळकबाळ) हे दुकानाजवळ झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील बारा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. ही घटना २५ नोव्हेंबर रोजी घडली याप्रकरणी सोमनिंग पुजारी यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार नदाफ हे करीत आहेत.

### तुला लय मस्ती आली का म्हणत सत्तुरने मारहाण

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत तुला लय मस्ती आली आहे का असे म्हणून फिर्यादी विकी रवींद्र म्हेत्रे (वय-३३,रा.कोनापुरे चाळ) यांना सत्तुरने मारहाण करून गंभीर जखमी केले. ही घटना १५ डिसेंबर रोजी सकाळी पावणे अकरा वाजण्याच्या दरम्यान महापौर बंगल्याजवळ घडली. याप्रकरणी विकी म्हेत्रे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून मनीष दीपक नाईक (रा. ऐश्वर्या अपार्टमेंट, रेल्वे लाईन) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास स.पोलिस निरीक्षक केंद्रे या करीत आहेत.

### माहेरून पैसे आणण्यासाठी विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

विवाहिता ही सासरी नांदत असताना तिला वेळोवेळी माहेरून पैसे आणण्यासाठी शारीरिक व मानसिक त्रास देऊन छळ करत असल्याची फिर्याद दिपाली बिपिन लोणकर (वय ३६, रा. जगदंबा चौक) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अशोक सतीश माने (रा.बेडर पूल,दर्गा मंदिर समोर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २० ऑगस्ट २०२० ते आजतागायत पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली.या घटनेचा तपास पोलीस हवालदार इनामदार हे करीत आहेत.

### बसवर दगडफेक; तिघा अज्ञात इसमांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

बसवर दगडफेक केल्याप्रकरणी तीन अज्ञात इसमानविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १६ डिसेंबर रोजी सायं पाच ते सव्वा पाच वाजण्याच्या दरम्यान प्रभाकर महाराज चौक व डी मार्ट समोर घडली. याप्रकरणी कैलास आनंदराव हेंडगे (वय-३८,एसटी चालक,रा. गौळ तालुका कंदार जिल्हा नांदेड) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात तीन इस्मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हे त्यांच्या ताब्यातील एसटी बस क्रमांक एम एच.१४ बी.टी.४९५२ ही घेऊन जात असताना अज्ञात कारणावरून बसवर दगडफेक केली. त्यानंतर बसची काच फुटून चार हजारांचे नुकसान झाले.तसेच साक्षीदार बालाजी दत्तात्रय गंगणे हे चालवीत असलेल्या बस क्रमांक एमएच.०५ ईएम.१३८२ यावरही दगड फेकून काच फोडून सहा हजारांचे नुकसान केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक खंडागळे हे करीत आहेत.

### रस्ते अपघातात दोड्डीच्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

हैद्राबाद रोडवरील दोड्डी पाटीजवळ रस्ते अपघातात जखमी झालेल्याचा उपचारावेळी मृत्यू झाला. पंडीत रामदास कुलकर्णी (वय ५४) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. १८ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास दोड्डी पाटीजवळ रस्ते अपघातात पंडीत कुलकर्णी हे गंभीर जखमी झालेल्या अवस्थेत मिळून आले होते. त्यामुळे कुलकर्णी यांना उपचारासाठी मार्कंडेय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर कुलकर्णी हे घरी गेले असता १६ डिसेंबर रोजी सायंकाळी घरी अचानक त्रास होऊ लागल्याने त्यांना नागेश कुलकर्णी यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. शीतलकुमार यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# शिवशाही बस जळून खाक !

## परभणी घटनेचे पडसाद

## मध्यरात्री साडेबाराची घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर**

सोलापूर आगारातील बस यार्ड मध्ये देखभाल दुरुस्ती करून उभ्या करण्यात आलेल्या आरामदायी शिवशाही बसला मध्यरात्री अचानक आग लागली. साडेबारा वाजण्याच्या सुमारास लागलेल्या आगीत बस क्र.एम.एच. ०६. बी. डब्लू. ०५८९ शिवशाही बस जळून खाक झाली. या आगीमध्ये एसटी महामंडळाचे १८ लाखांचे नुकसान झाले आहे.

शिवशाही बसमधील एअर कंडिशन सिस्टीम तसेच इतर तंत्रज्ञान जळून खाक झाल्याने एसटी महामंडळाला लाखोंचा भृदंड सोसावा लागणार आहे. तसेच शिवशाहीच्या बाजूला उभी असलेली एम.एच.११ बी.एल. ९०६७ या क्रमांकाच्या सोलापूर-मंगळवेढा या साध्या लालबसला देखील आगीची धग लागली. यामुळे एसटीचे समोरील काच आणि आरसा तडकला आहे. यामध्ये साध्या बसचे देखील सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे एसटीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.



दरम्यान, सोमवारी संध्याकाळी दोन एसटी बसेसच्या काचा आज्ञातांनी फोडल्या होत्या. संध्याकाळी ही घटना ताजी असतानाच मध्यरात्री पुन्हा एसटी बसेसला अचानक आग लागल्याने, सदरची घटना संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. रात्री साडेबारा वाजता दारुड्यांची टोळी येथे होती, अशी माहिती एसटी महामंडळाच्या सुरक्षा रक्षकाने दिली. त्यानुसार पोलीस सीसीटीव्ही कॅमेरामध्ये याची तपासणी करत आहेत. दारुड्यांमुळे सदरच्या बसला आग लागली का? का परभणीचे पडसाद उमटले? हा प्रश्न आता पोलीसांसमोर उभा आहे.

मंगळवारी सकाळी सोलापूर आगार व्यवस्थापक उत्तम जुंदळे, अधिकारी कर्मचारी यांनी शिवशाही बसेसची संपूर्ण तपासणी केली आहे. यामध्ये एसी सिस्टीम जळून खाक झाली असून, पडदे, कुशन आणि इंजिन देखील जळाल्याचे सांगण्यात आले.

### परभणीचे पडसाद की, दारुड्यांचा प्रताप?

राज्यात परभणीचे पडसाद उमटत आहेत. सोमवारी मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर संध्याकाळी एसटी बसेसच्या काचा फोडल्या. मध्यरात्री १२.३० वाजता बसला आग लागली का? लावण्यात आली? हा प्रश्न आता पोलिसांसमोर उभा ठाकला आहे. एसटी महामंडळाचे सुरक्षा रक्षकाने रात्री दारुड्यांचा वावर होता, असे सांगितल्यामुळे सदरची घटना ही परभणीचे पडसाद की? दारुड्यांचा प्रताप असा प्रश्न आता पोलिसांसमोर आला आहे. त्या अनुषंगाने पोलिसांची शोध मोहीम सुरू झाली आहे. सदरच्या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे. शिवशाही बसला रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास आग लागली आहे. यामध्ये संपूर्ण बस जळून खाक झाली आहे. बसचे सुमारे १८ लाखांचे नुकसान झाले आहे. आग लागली का? लावली आहे. या घटनेचा पोलिसांचा तपास सुरू आहे. या अगोदर बसेसच्या काचा फोडल्या त्याचा देखील पंचनामा सुरू आहे.

**- उत्तम जुंदळे, आगार व्यवस्थापक सोलापूर आगार**

### अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

सोमवार आणि मंगळवार असे दोन दिवस घडलेल्या घटनांवरून एसटी महामंडळाकडून संबंधित अधिकाऱ्यांच्या माध्यमातून फिर्याद नोंदवण्याचे कामकाज सुरू आहे. पोलीस ठाण्यामध्ये याबाबत माहिती देण्यात आली. असून पुढील चौकशी सुरु आहे.

**-अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक**

रात्रीच ही शिवशाहीबस देखभाल दुरुस्ती करून यार्डमध्ये उभी करण्यात आली होती. आज सकाळी पुणे मार्गावर सदरची बस सोडण्यात येणार होती.

# क्रेडाई सोलापूर शाखेतर्फे प्रॉपर्टी एक्स्पो २०२४चे आयोजन

## सोलापुरात शुक्रवारी उद्‌घाटन

## यंदाच्या प्रदर्शनात सुमारे ६५ स्टॉल्स् उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर -**

क्रेडाई सोलापूर तर्फे प्लॉट,फ्लॅटस, रो हाऊझेस् , बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स , वित्तीय संस्था इत्यादीचे प्रदर्शन यंदा दि. २० ते २३ डिसेंबर दरम्यान नॉर्थ कोट हायस्कुल मैदान येथे आयोजीत करण्यात आले असल्याची माहिती क्रेडाई सोलापूरचे अध्यक्ष अभय सुराणा यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार दि. २० डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता महापालिका आयुक्त शीतल तेली- उगले यांच्या हस्ते क्रेडाई नॅशनलचे उपाध्यक्ष सुनिल फुरडे यांच्या अध्यक्षतेखाली व कोठारी पाईप्सचे व्यवस्थापकीय संचालक उज्वल कोठारी, क्रेडाई नॅशनलचे सभासद व शाखा विस्तार समितीचे चेअरमन शशिकांत जिड्डीमनी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

सोमवार दि. २३ डिसेंबरपर्यंत दररोज सकाळी १० ते रात्री ८ दरम्यान सर्वांसाठी हे प्रदर्शन खुले असणार आहे. क्रेडाई सोलापूर

CREDAI SOLAPUR PROPERTY EXPO 2024 CREDAI for CREDIBILITY..

आयोजीत या प्रदर्शनाचे कोठारी प्लमबींग पाईप्स् हे प्लम्बिंग पार्टनर आहेत.यंदाच्या प्रदर्शनात सुमारे ६५ स्टॉल्स् असून सोलापुरातील क्रेडाई सभासदांचे विविध प्लॉटस,फ्लॅटस, बंगलोज, रो-हाऊसेस, कमर्शिअल कॉम्प्लेक्स् तसेच अनेक बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स , वित्तीय संस्था भाग घेत असून प्रदर्शनाच्या ठिकाणीच गृहकर्जाची माहिती ही मिळणार असल्याची माहिती या प्रदर्शनाचे समन्वयक विरल उदेशी यांनी दिली. या प्रदर्शनात रविवार दि. २२ डिसेंबर रोजी क्रेडाई वुमन्स विंग व युथ विंग च्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सोलापूरकरांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष अभय सुराणा यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस क्रेडाई सोलापूरचे उपाध्यक्ष आनंद पाटील, सचिव संतोष सुरवसे, खजिनदार राजीव दिपाली आदी उपस्थित होते.

## रणजितसिंह मोहिते-पाटलांना भाजपाकडून शिस्तभंगाची नोटीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

भाजप आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांना पक्षाकडून शिस्तभंगाची कारणे नोटीस बजावण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश कार्यालयातून त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. भाजपचे कार्यालयीन सचिव मुंकुद कुलकर्णी यांच्या सहीने



ही नोटीस मोहिते पाटील यांना देण्यात आली आहे. रणजितसिंह मोहिते पाटील व परिवाराने लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षविरोधी काम केल्याने पक्षाकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. माजी आमदार राम सातपुते यांनी केलेल्या तक्रारीवरुन ही नोटीस बजावण्यात आल्याचे वृत्त आहे.

# श्री मार्कंडेय फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांसाठी नंदीध्वज बनवा स्पर्धा २९ डिसेंबरला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर -**

श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम व पद्मकमळ प्रतिष्ठान तर्फे सोलापूर शहर व जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी नंदीध्वज बनवा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

सोलापुरातील ग्रामदैवत श्री सिध्देश्वरांचे यात्रेचे वेध सर्वांनाच लागले आहे. गड्डा यात्रा परंपरेप्रमाणे १४ जानेवारी २०२५ रोजी होत आहे. जत्रेचे मुख्य आकर्षण आणि प्रमुख अक्षता सोहळा साठी नंदीध्वजांची मिरवणूक पाहण्यासाठी जगभरासह, स्थानिक, महाराष्ट्रातील, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक आधी राज्यांतून भाविक भक्त येतात.

म्हणूनच आम्ही यावर्षी शालेय विद्यार्थ्यांसाठी नंदीध्वज स्वतः बनवा आयोजित केली आहे. ही स्पर्धा ५ वी ते १० वीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी रविवार दि. २९ डिसेंबर रोजी सकाळी १०.३०



वाजता सोलापुरात कुचन प्रशाला येथे आयोजित केली आहे.

स्पर्धक विद्यार्थ्यांनी सर्व साहित्य स्वतः आणावयाचे आहेत. दीड तासांची वेळ देण्यात येईल. नंदीध्वजाचे साईज किमान २-३ फुटाचे असावेत. सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ दोन्ही गटांसाठी (स्वतंत्र) ३ - ३ आकर्षक बक्षीसे दिले जाईल, अशी माहिती पद्मशाली सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम व पद्मकमळ प्रतिष्ठानचे अध्यक्ष गोपीकृष्ण वड्डेपल्ली यांनी दिली आहे. संस्थापक गौरीशंकर कोंडा यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा घेण्यात आली आहे.

या स्पर्धेत शहर व जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन, फाउंडेशनचे उपाध्यक्ष श्रीनिवास कामूर्ती नागेश पासकंटी, नागेश सरगम, सल्लागार सुकुमार सिध्दम, दयानंद कोंडाबत्तीनी, समन्वयक श्रीनिवास रच्चा, किशोर व्यंकटगिरी, सदस्य श्रीनिवास पोटाबत्ती, वैकुंठम जडल, सखी संघमच्या सचिवा पूजा चिप्पा, उपाध्यक्षा मंजुळा आडम, कल्याणी पेनगोंडा, सहसचिवा लक्ष्मी कोडम यांनी केले आहे.

# ‘काय झाडी’चं झालं थोडं, आता ‘मारकडवाडी’चं आलं घोडं

## ऊस, तमाशा व राजकारण या तिन्ही पडात सोलापूर जिल्हा कायम पुढे

## एकाचवेळी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्रीपद मिळालेला एकमेव सोलापूर जिल्हा

‘घरचं झालं थोडं, व्याहानं धाडलं घोडं’ अशी मराठीत एक म्हण आहे. ही म्हण चपखल बसावं असंच काहीसं राजकीय घडामोडी सोलापूर जिल्ह्याशी निगडित घडत आहेत. यापुर्वी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार ॲड. शहाजीबापू पाटील यांच्या काय झाडी, काय डोंगार, समदं कसं ओकके हाय या डायलॉगची चर्चा सर्वदूर झाली. आता सोलापूर जिल्ह्यातीलच माळशिरस विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार उतमराव जानकर यांच्या नेतृत्वाखाली मारकडवाडी येथील बॅलेट पेपरद्वारे निवडणूक या मुद्द्यावरुन देशभरातील राजकीय वातावरण चांगलंच तापत आहे. यावरुन ‘काय झाडी’ चं झालं थोडं, आता ‘मारकडवाडी’चं आलं घोडं, अशी मल्लिनाथी राजकीय क्षेत्रातून केली जात आहे.




‘पड’ मग तो उसाचा, तमाशाचा वा राजकारणाचा असो. या तिन्ही पडात सोलापूर जिल्हा कायम पुढेच असतो. याविषयी उदाहरणच द्यावयाचे झाल्यास महाराष्ट्रातील सर्वाधिक ऊस क्षेत्र, साखर कारखाने





सोलापूर जिल्ह्यात आहेत. सोलापूरचे शाहीर रामजोशी यांनी रचलेले अनेकांनेक लावणी आजही तेवढ्याच ताकदीने सादर केले जातात. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री असे एकाचवेळी दोन्ही पदाचा मान मिळविणारा सोलापूर हा एकमेव जिल्हा. सांगोला या एकाच मतदारसंघातून, शेतकरी कामगार पक्ष या एकाच पक्षाकडून अकरा वेळा आमदारकी पटकावणारे स्व. गणपतआबा देशमुख हेही सोलापूर जिल्ह्याचेच. इतकेच नाही तर स्वातंत्र्यपूर्व काळात चार दिवस का होईना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य उपभोगण्याचा अहोभाग्यही सोलापूर शहराच्याच वाट्याला आले होते. शिवसेना फुटीनंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गुवाहाटीला गेलेल्या टीममध्ये सोलापूर जिल्ह्यातील ॲड. शहाजीबापू पाटील या एकमेव आमदाराचा समावेश होता. या दौऱ्याच्या वेळी ॲड. शहाजीबापू पाटील आणि त्यांच्या एका समर्थक कार्यकर्ता यांच्यात फोनवर झालेल्या 'काय झाडी, काय डोगार, समदं कसं ओकके हाय' या डायलॉगवजा वाक्याविषयी एकीकडे विनोदी तर दुसरीकडे उपहासात्मक चर्चांना

### हायती तशी चार कार्टी

मारकडवाडी (ता.माळशिरस) येथील बहुसंख्य महिला व गावकरी म्हणताहेत की, मशीनमध्ये अजिबात घोळ झालेला नाही. एकमेकांवर राजकीय कुरघोडी करण्यासाठी हा सारा खेळ सुरु आहे. हायती तशी चार कार्टी गावात. त्यांच्यामुळे तर संपूर्ण गावाची बदनामी होत आहे. आता हे थांबलंच पाहिजे.

उधाण आले होते. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या घवघवीत यशावरुन ईव्हीएम नको बॅलेट हवा, असा अट्टाहास विरोधी पक्षांकडून केला जात आहे. यासाठी स्थानिक ते देशपातळीवरील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यात शाब्दिक युध्द, राजकीय नाट्य सुरु असल्याचे पहावयास मिळत आहे. बॅलेट पेपरद्वारे निवडणूक या मुद्द्यावरुन माळशिरस विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार उत्तमराव जानकर आणि माजी आमदार राम सातपुते यांच्यात राजकीय कलगीतुरा रंगलेला आहे. बॅलेट पेपरद्वारे मतदान या उपक्रमामागे विधानपरिषद सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा हात असल्याचा थेट आरोप माजी आमदार राम सातपुते यांनी केला. त्यामुळे भारतीय जनता पार्टीतही अंतर्गत धुसपुस सुरु झाल्याचे ऐकावयास येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खा. शरद पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्याक्ष नाना पटोले यांच्यासह विरोधी पक्षातील इतर नेते 'मारकडवाडी'च्या दौऱ्यावर येऊन हा मुद्दा तापवत ठेवल्याचे दिसून येते. या सर्व प्रकारावरून सोलापूर देशपातळीवर चर्चेत आहे.



# बक्षीहिप्परगे गावात स्मशानभुमीसाठी नविन शेड बांधकामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षीहिप्परगे गावातील स्मशानभूमी मधिल दहनशेडच्या वरचा छत कोसळला असल्यामुळे पावसाचे पाणी शेडमध्ये गळत होते. यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी व संचालक मंडळाच्यावतीने बक्षीहिप्परगे गावात स्मशानभूमीच्या शेडसाठी तत्काळ मंजुरी दिली.

यामध्ये नविन आरसीसी दहनशेड शवदाहिनी, स्मशानभुमी मध्ये लोकांना बसण्याकरीता वेटींग शेड, स्मशानभुमी मधिल रस्ता, स्मशानभुमी मधिल फरशीकरण, स्मशानभुमी मध्ये ३००० लि सिमेंटची पाण्याची टाकी अशा विविधकामाना मंजुरी दिली आहे.गावातील स्मशानभुमी मधील नविन आरसीसी दहनशेड व वेटींग शेडच्या कामाचे भूमिपूजन बालाजी अमाईन्सचे तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार यांचे हस्ते या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ग्राम पंचायत सदस्य विश्रांत गायकवाड यांनी बालाजी अमाईन्सच्या वतीने स्मशानभुमी मधिल नविन शेड बांधकाम सुरू करण्यात आल्याबद्दल व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी व संचालक मंडळाचे आभार मानले.

या कार्यक्रमास सरपंच मनोज महाडीक, माजी सरपंच सिताराम राठोड, ग्रामपंचायत सदस्य विश्रांत गायकवाड, तंटामुक्ती अध्यक्ष नानासाहेब जाधव, बाबासाहेब माने, शंकर यादव, गणपत शिंदे, रमेश शिवशरण ,विश्वास निकंबे, अण्णासाहेब जाधव, बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर बसवराज अटद तसेच बक्षीहिप्परगे गावातील नागरीक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९७८

**काय दिनकरा । केला कोंबडयानें खरा ।।**

जन्मत:च आई-वडील वारले तरी त्या बाळाचे राहून जात नाही. तो वाढतो, मोठा होतो, जगतो हे खरे आहे. जर जन्मलेल्या नवजात बाळाचे राहात नाही तर इतरांचे कांही राहण्याचा किंवा कोणावाचून आडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तरी पण हा बुध्दीवादी माणूस सतत म्हणत असतो की, हे मी केले, ते मी केले, मी नसतो तर हे झालेच नसते, मी असतो तर असे होऊच दिले नसते, वगैरे-वगैरे. आपल्या हस्तक्षेप करण्याने किंवा न करण्याने एखादे काम मागे-पुढे होऊ शकते. हे खरे असले तरी निसर्गनियमान्वये जे घडणार आहे, त्यात मात्र आपल्या होण्या किंवा न होण्याने बदल घडत नाही. या सर्व सांगण्या मागचा एकच अर्थ आहे की, माणसाने मी-मी म्हणू नये. कांही चांगल्या-वाईट गोष्टीला आपण कारणीभूत होऊ शकतो, हे खरे असले तरी त्यात मी ला गुंतवण्याचे कारण नाही. आपल्या वाट्याला आलेले कर्म/कर्तव्य आपण निती-नियमाला अनुसरुन करीत रहावे.



त्यापेक्षा वेगळा विचार करण्याचे कारण नाही. सद्सद्विवेक बुध्दी जागृत ठेवून आपण आपले कर्तव्य पार पाडीत गेलो तर आपण कोणत्याही कर्मात गुंतण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. कर्मात न गुंतता कर्म करणारा घडणाऱ्या घटनांच्या परिणामाचा विचारही करीत नाही. कारण आपले कर्तव्य चोखपणे पार पाडणे एवढ्यापुरताच तो विचार करीत असतो. एखाद्या कर्माशी मी ला जोडून मोठेपणा घेणे योग्य नसते. निसर्ग नियमाच्या घटना ह्या आपोआप घडत असतात. कोंबड्याने आवाज दिला नाही किंवा कोंबडा ओरडला नाही म्हणून सूर्य उगवण्याचा थांबत नाही. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**काय दिनकरा । केला कोंबडयानें खरा ।।**

या जगाच्या पाठीवर अनेक राजे-महाराजे, योध्दे, संत, महात्म्ये होऊन गेले. प्रत्येकाकडून थोडे- फार चांगली कार्ये घडून गेली असतील. सदरची कार्ये करुनही यांपैकी अनेक महात्म्यांनी त्याचे श्रेय स्वत:कडे घेतले नाही. अनेकांची कार्ये ही काळाच्या पडद्याआड झाकली गेली. आपल्याबाबतीतही तसेच घडू शकते. आपल्याकडून कांही चांगले घडले किंवा वाईट घडले तरी लोक कांही काळ ते स्मरणात ठेवतीलच. त्यामुळे मी हे केले, ते केले किंवा माझ्यामुळेच हे झाले, असे आपण म्हणू नये. पण कांहींना सवयच असते की, थोडे करायचे आणि जास्त सांगायचे. कांही गेष्टी आपल्या अखत्यारीत नसतांनाही अशा गोष्टीतही लोक मी चा शिरकाव करतात. मोठेपणाच्या नांवाखाली कांहीही झाकून जाते म्हणून कांहीही बोलणे योग्य नसते. आपण आपल्या मर्यादेमध्ये राहून आपली कर्तव्य करायला हवीत. जगात अनेक खूप चांगल्या गोष्टी घडतात. या गोष्टी/घटना घडवून आणणारे बरेच लोक स्वत:ला पुढे येऊ देत नाहीत. पण कांही लोक चार-दोन आण्याचा दान-धर्म केला तरी मी केला म्हणून गाजावाजा करीत असतात. माणसाचा मी पणाचा गाजावाजा कधी ना कधी तरी त्याला दु:ख देऊन जातो. मीपणात अडकलेला किंवा सदैव मोठेपण मिळविण्याचा छंद जोपासणारा व्यक्ती सुखी असू शकत नाही.आपल्या करण्याने किंवा न करण्याने विशेष फरक पडो किंवा न पडो आपल्या वाट्याला आलेले कार्य आपण निरिच्छ भावनेने व त्या कर्मात मीला न गुंतविता करावे, एवढीच या अभंगप्रसंगी अपेक्षा. ही अपेक्षा पूर्ण करणा-यास किंवा या अपेक्षेप्रमाणे वागणा-यास वेगळयाने आनंद शोधावा लागत नाही.

**जय जय रामकृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १८ डिसेंबर २०२४ | संकष्ट चतुर्थी, यल्लमा देवी |
| विक्रम संवत् २०८०-८१ | यात्रा, ता. मिरज |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. तृतीया - (१०.०५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पुष्य (२४.५७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ऐंद्र (२४.५७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (२१.५८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आपले प्रत्येक प्रश्न सध्या महत्त्वाचे आहेत. नोकरी-व्यवसायात सध्या चांगली गती असल्याने कोणताही प्रश्न रेंगाळत राहणे आजतरी परवडणार नाही.

**वृषभ :** आपली नेमकी कोणा-कोणाची गाठ पडते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. घरातील एखादी व्यक्ती बाहेर जाऊन लवकर न आल्यामुळे जीवाला घोर लागणे शक्य.

**मिथुन :** कितीही कमावले तरी थोडे सबुरीनेच खाणारे आपण आयुष्यही उपभोगण्यासाठी असते हे बऱ्याचदा विसरल्यासारखे असते.

**कर्क :** वैवाहिक जोडीदाराची आपणास मिळणारी साथ आज एखाद्या मोठ्या कामात यश देणारे ठरू शकते.

**सिंह :** आज नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी आपण अतिशय कार्यमग्न राहणार आहात नव्हे तसे राहणे फायद्याचे ठरणार आहे.

**कन्या :** आपणास आपल्या अभ्यासाचा, विचाराचा, चिंतनाचा आणि बौद्धिक कौशल्याचा उपयोग करून घेता येणार आहे.

**तूळ :** आजचा दिवस आपणासाठी आरोग्याकडे लक्ष द्यायला लावणारा ठरू शकतो. खाण्यापिण्यावर थोडेसे निर्बंध ठेवा. नोकरी-व्यवसायात आगामी काळाचा विचार करण्यासाठी बरेच पर्याय समोर असणार आहेत.

**वृश्चिक :** आर्थिकदृष्ट्या आज आपण कितीही मोठे-लहान अवश्य घेऊ शकता. बऱ्याच महत्त्वाच्या निर्णयांमध्ये आजचा दिवस संस्मरणीय ठरणार आहे.

**धनू :** विचारातला भडकपणा मुळातूनच टाळायचा आहे. आरोग्याकडे लक्ष द्यायचे आहे. आज होणाऱ्या व्यवहारात उगाच कोणाचा खोटा आळ येणार नाही असे पाहा.

**मकर :** जे काही असेल ते अतिशय चांगले असणे हा आपला स्थायी भाव आहे.

**कुंभ :** आज खाण्यापिण्याकडे थोडेसे बारीक लक्ष असणे हिताचे असणार आहे. नवीन मित्रांसमवेत चुकून काही खाल आणि नसते उद्योग पाठीशी लागतील.

**मीन :** अपेक्षित आणि आवश्यक असे प्रवास काहीजणांच्या बाबतीत शक्य आहे. नोकरी-व्यवसायातील एखादा महत्त्वाचा निर्णय आरामात घेऊ शकाल.

# शहरातील तीन रस्त्यांवरील अतिक्रमण हटविले

**पालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई; हातगाडी, वजन काटे ,प्लॅस्टिक कॅरेटसह इतर साहित्य केले जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. १७ डिसेंबर-**

विशेष स्वच्छता मोहिमे अंतर्गत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते अरविंद धाम,दाराशा हॉस्पिटल परिसर तसेच सात रस्ता ते डीआरएम ऑफिस पर्यंत रस्त्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेच्या वतीने दि. २ ते १९ डिसेंबर दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रस्ते, फुटपाथ तसेच दुभाजकाची नेटक्या पद्धतीने स्वच्छता करण्यात येत आहे. रस्त्यावरील तसेच फुटपाथवरील अतिक्रमणही काढण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत आज सकाळच्या सत्रात छत्रपती संभाजी महाराज चौक ते अरविंद धाम पर्यंत रस्त्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले. यावेळी तीन लोखंडी हातगाडी , दीडशे नारळ व इतर साहित्य जप्त करण्यात आले. दुपारच्या सत्रात दाराशा हॉस्पिटल बाजूला असलेले लोखंडी फ्रेम काढण्यात आले. तसेच सात रस्ता परिसर ते डीआरएम ऑफिस पर्यंत रस्त्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले. येथील एक हातगाडी , फुलगुच्छ हार, वजन काटे ,प्लॅस्टिक कॅरेट, बॅटरी, व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण




प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

# पंपाची रक्कम लुटून नेल्याप्रकरणी ९ तरुण निर्दोष

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर -**

येथील पोलीस हेडक्वॉर्टर जवळील पोलीस पेट्रोल पंपावरील रक्कम हेडक्वॉर्टर येथे जमा करणेसाठी जात असतांना सहायक पोलीस फौजदार मारुती राजमाने यांना अडवून मारहाण करत त्यांच्याकडील ५ लाखांची रक्कम लुटून नेल्याप्रकरणी अमित जाधव, कुमार भोसले, विठ्ठल भोसले, कुमार सुरवसे, फिरोज शेख, आदिप दोरकर, गुलाब मुलाणी, अभिजित खबाले, रामेश्वर धनावडे यांची जिल्हा व सत्र न्यायाधिश सलमान आझमी यांचे समोर होऊन त्यांनी गुन्हा शाबीत न झाल्यामुळे सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

सोलापूर शहर पोलीस पेट्रोल पंपावरील विक्रीतून आलेली रक्कम रोजच्या रोज कर्तव्यावरील पोलीसांकडून बँकेत भरणा करण्यात येते. मात्र बँकेला सुट्टी असल्यास ती रक्कम पोलीस हेडक्वॉर्टरमधील लॉकरमध्ये जमा करावी लागायची. १८ मार्च २०१८ रोजी बँकेस रविवारची सुट्टी असल्याने सहायक पोलीस फौजदार मारुती राजमाने हे जमा झालेली रक्कम हेडक्वॉर्टर लॉकरमध्ये जमा करण्यास रात्री ११ च्या सुमारास निघाले होते. त्यावेळी ज्ञात लोकांनी त्यांना आडवून त्यांच्याकडील ५ लाख रुपयांची रोकड लुटून नेली होती. याबाबत मारुती राजमाने यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक ए.पी. कुंभार व बी. एस. शिंदे यांनी करत आरोपींना अटक करुन त्यांचेकडून रक्कम जप्त करुन न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले. या खटल्यामध्ये सरकारतर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. खटल्याची सुनावणीचेवेळी पोलीसांच्या रकमेची लुटमार झाल्याचे सरकार पक्षाने शाबीत केले नाही. मात्र यातील फिर्यादीने लुटमार झाल्याचे खोटा कांगावा केला व त्याचे घरातून बरीच मोठी रक्कम जप्त झाली. त्यामुळे फिर्यादीने दाखल केलेल्या फिर्यादीतील कथनावर संशय निर्माण होतो.मात्र आरोपींना त्यांच्या स्वतः च्या रकमा जमा करावयास लावून खोटी केस केल्याचा युक्तीवाद आरोपींच्या वकिलांनी केला. तो ग्राहय धरुन न्यायाधीशांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली. यात सरकारपक्षातर्फे ॲड. ए. जी. कुर्डुकर व ॲड. नरखेडकर यांनी तर आरोपी नं.१ ते ४ यांच्यातर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. सतिश शेटे, ॲड. प्रथम गायकवाड यांनी तर उर्वरित ५ आरोपीतर्फे ॲड. जयदिप माने यांनी काम पाहिले.

# थकबाकीदारांच्या दारात तृतीयपंथी वाजवणार टाळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. १७ डिसेंबर-**

थकीत मिळकतकर वसुलीसाठी आता महापालिका चक्क तृतीयपंथींची मदत घेणार आहे. डिसेंबरपासून कर वसुलीची कारवाई टप्प्याटप्प्याने तीव्र करण्यात येणार आहे. जानेवारीत थकबाकीदारांची यादी प्रसिद्ध करणार, फेब्रुवारीत हलगीनाद तर शेवटी मार्चमध्ये थकबाकीदारांच्या दाराततृतीयपंथी टाळी वाजवणार आहेत, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

**मिळकतकर वसुलीसाठी डिसेंबरपासून टप्प्याटप्प्याने होणार कारवाई**

महापालिकेचे मागील व चालू वर्षाचे मिळून सुमारे ७५० कोटी कर वसुलीचे उद्दिष्ट आहे. थकीत कराचे प्रमाण मोठे असल्याने महापालिकेने शनिवार दिनांक १४ डिसेंबर रोजी लोकअदालतीचे आयोजन केले होते. मालमत्ता कर विभागातील २४ हजार पैकी ५ हजार ४६ इतक्या व्यक्तींनी सहभाग नोंदवित १३ कोटी ९४ हजार ४६६ रुपयांचा थकीत मिळकतकर भरला. यानंतर आता महापालिकेकडून कर वसुलीची कारवाई टप्प्याटप्प्याने तीव्र करण्यात येणार आहे.डिसेंबरमध्ये मोठ्या प्रमाणात कर थकीत असलेल्या २५ मिळकतींवर टाच आणण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.जानेवारीत बड्या थकबाकदारांची नावे होम मैदान तसेच शहराच्या मुख्य चौकात डिजिटल बोर्डावर लावण्यात येणार आहे. या त्यानंतरदेखील मिळकतदारांनी कर न भरल्यास फेब्रुवारीमध्ये त्यांच्या घरासमोर हलगीनाद करण्यात येणार आहे. यालाही मिळकतदारांनी प्रतिसाद न झाल्यासमार्चमध्ये तृतीयपंथींची मदत घेण्यात येणार आहे. या तृतीयपंथांची टाळी थकीत मिळकतदांच्या घरासमोर वाजवण्यात येणार आहे, असे आशिष लोकरे यांनी सांगितले.

# नागनाथ अल्ली महाराज मठात दत्त जयंती निमित्त सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

सालाबाद प्रमाणे यंदाही श्री समर्थ सदगुरु औजेकर लक्ष्मणप्पा महाराज जयंती व श्री दत्त जयंती निमित्त, अक्कलकोट रोड, टॉवर जवळ येथील श्री समर्थ सदगुरु नागनाथ अल्ली महाराज मठात विविध धार्मिक कार्यक्रम पार पाडण्यात आले.

पहाटे ४.०० वाजता काकडा आरती, मूळमुर्ती अभिषेक, दुपारची आरती, श्रीमद दासबोध वाचन, श्री स. स. नागनाथ अल्ली महाराज यांचे द्वारे प्रवचन, पुष्पवृष्टी, महाआरती, पादुका दर्शन, महाप्रसाद, श्री समर्थ सदगुरु भाऊसाहेब महाराज भजनी मंडळ सदस्यांच्यावतीने भजनी कार्यक्रम करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी ५.०० वाजता मठामध्ये पालखी मिरवणूक काढून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. क्कार्यक्रमास संस्थेचे



विश्वस्त मंडळासह सेवेकरी, महिला मंडळ सेवेकरी, ज्येष्ठ साधक कृष्णाहरी कटकम, तिप्पण्णा मुदगुंडी, राजू पोतन व संस्थेचे विद्यमान सचिव परमेश्वर कोडम, खजीनदार जनार्दन गंजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# ज्येष्ठ कादंबरीकार प्रा.डॉ.शकील शेख यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

शाह छप्परबंद (विजा ) एज्युकेशन वेल्फेअर सोसायटी श्रीरामपूर व हाजी महमद इसहाक फराश फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा या वर्षीचा जीवन गौरव पुरस्कार जेष्ठ कादंबरीकार प्रा. डॉ. शकील शेख यांना देण्यात येणार असल्याचे फराश फाउंडेशनचे अध्यक्ष इंतेखाब महमद इसहाक फराश यांनी जाहीर केले. सदर पुरस्कार दि. २९ डिसेंबर रोजी श्रीरामपूर येथे होणाऱ्या मुस्लीम मराठी साहित्य संमेलनात देण्यात येणार आहे. प्रा.डॉ. शेख यांच्या



शैक्षणिक, साहित्यिक , सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेऊन त्यांना सदर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रा. डॉ . शेख यांच्या जुबा, जंग या कादंबऱ्या प्रसिद्ध असून मुस्लीम मराठी आत्मचरित्रे : एक चिकित्सक अभ्यास तसेच मांध्यमांतर मीमांसा हे संशोधन ग्रंथ राज्यात व राज्याबाहेरील विविध विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून समाविष्ट करण्यात आले आहेत . त्याचे अनेक शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मासिकातून प्रसिद्ध झाले आहेत . या पूर्वी प्रा . डॉ . शेख यांच्या कादंबऱ्यांना व संशोधन ग्रंथाना विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. ते सुवर्णलता गांधी महाविद्यालय वैराग येथे प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

# पुरस्कारामुळे काम करण्याची ऊर्जा : योगीराज वाघमारे

**राष्ट्रीय स्नेहबंध सन्मान सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष भावनेने केलेले काम खूप काही समाधान देऊन जाते. समाजात निरपेक्ष भावनेने काम करणाऱ्या करणाऱ्यांची संख्या कमीच आहे. परंतु जे आहेत त्यांचं काम अलौकिक आहे. अशांच्या पाठीवर पुरस्कारा रुपी थाप मारणे आवश्यक असून त्यातून ऊर्जा निर्माण होते. असे प्रतिपादन ज्येष्ठ कथालेखक योगीराज वाघमारे यांनी केले.

स्वर्गीय हरिश्चंद्र फाउंडेशन यांच्यावतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय स्नेहबंध पुरस्कारात वितरण प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सेवानिवृत्त डीवायएसपी रघुनाथ जाधव, पत्रकार भरत कुमार मोरे, फाउंडेशनचे संस्थापक कृष्णा गायकवाड, समाधान गाजरे, अभिनेता डॉ. कीर्तीपाल गायकवाड, डॉ. हरिदास फाळके, अड. भगवानराव मुळे ,बाबासाहेब शिंदे, योगेश कडाळे, दत्तात्रय सरडे, शहाजहान शेख, महादेव तळेकर, लेखक मारुती बेलभडारे, पंढरीनाथ कदम. अमृता रणदिवे आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रारंभी कृष्णात गायकवाड यांनी प्रास्ताविकेत फाउंडेशनच्या वतीने करण्यात येणाऱ्या विधायक उपक्रमाची माहिती दिली. यावेळी मारुती बनसोडे यांच्या घुसमट या कथासंग्रहाचे प्रकाशन योगीराज वाघमारे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात राज्यभरातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या जवळपास ७८ पुरस्कार विजेत्यांना गौरविण्यात आले. यावेळी पत्रकार भरतकुमार मोरे यांनी आपल्या मनोगतात समाजातील गुणवंताचा सन्मान करणे ही आपली संस्कृती असल्याचे नमूद केले. यावेळी आदिनाथ देशमुख बाबासाहेब शिंदे, बलभीम गावडे, जमीर शेख, वंदना सावंत, प्रतापसिंह शेजाळ , महादेव तळेकर, मोहन शिंदे, गीता कातकर, देवानंद गोंजारी, लक्ष्मण जाधव, प्रदीप पाटील, बबन तांबोळी, दिनेश रिकाम आदींनी परिश्रम घेतले.

# जिद्द, मेहनतीच्या बळावर विद्यार्थी माऊंट एव्हरेस्ट सर करु शकतात

**शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

वाचन संस्कृती रुजवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने अवांतर वाचन करणे महत्त्वाचे आहे. जिद्द,मेहनत व चिकाटीच्या बळावर विद्यार्थी यशाचे माऊंट एवरेस्ट सर करू शकतात, असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी सचिन जगताप यानी केले.

येथील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रसिद्ध सौंदर्यशास्त्र तज्ज्ञ, विद्यालयाच्या माजी



विद्यार्थीनी डॉ.कीर्ती गोळवलकर, वरिष्ठ मार्गदर्शिका दीप्ती शहा, प्राचार्य सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, हिरुबाई निंबर्गीकर, ग्रंथालय प्रमुख अरिहंत रत्नपारखे व पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व पी. एस. व्ही. ट्रस्टच्या संस्थापिका पंडिता पद्मश्री सुमतीबाई शहा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे सुमधुर अशा स्वागत गीताद्वारे इयत्ता दहावी अ तील विद्यार्थिनीच्या संचानी स्वागत केले. प्रास्ताविकेतून प्राचार्य सुकुमार मोहोळे यांनी शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या उपक्रमशीलता व कर्तव्यदक्षेतेची माहिती दिली. परिचय सहशिक्षक अभिजीत पाटील यांनी करून दिला. प्रशालेच्या वार्षिक अहवालाचे वाचन विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित व पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी केले. पाचवी ते दहावीतील प्रथम क्रमांक संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. असे विविध ४० बक्षिसे देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी विद्यालयातील आदर्श वर्ग म्हणून पाचवी ब, आठवी ड व दहावी अ या वर्गाचा, तसेच आदर्श वाचकवर्ग म्हणून इयत्ता सहावी क चा तर प्रशालेतील आदर्श वाचक म्हणून पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. अपार आयडी ९९% जनरेट केल्याबद्दल प्रशालेतील कनिष्ठ लिपिक तेजस्विनी कोरे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. गोळवलकर यांनी मनोगत व्यक्त केले. बक्षीसांचे वाचन प्रीती वऱ्हाडे, कविता उपाध्येम व सोनल आळंद यांनी केले. सूत्रसंचालन सोनाली उंडे यांनी तर अनंत बळ्ळे यांनी आभार मानले. फलक लेखन कलाशिक्षक प्रविण कंदले यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### अक्कलकोट येथे जि.प.शाळेच्या तालुकास्तरीय स्पर्धेचे उद्घाटन

**अक्कलकोट, दि. १७ डिसेंबर-**


फत्तेसिंह क्रीडांगण अक्कलकोट येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या तालुकास्तरीय स्पर्धेचे उद्घाटन पंचायत समितीचे शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांचे हस्ते करण्यात आले यांप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके, शिवाजी शिंदे, लक्कप्पा पुजारी, इंद्रसेन पवार, शरद कुंभार, गणेश अंबूरे, गोविंद राठोड, संतोष बारगुले, विशाल शेटे, सुजित पाटील, तुकाराम जाधव व तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष परमेश्वर व्हसुरे तुकाराम जाधव उपस्थित होते. या स्पर्धेसाठी पंच म्हणून अविनाश राठोड, नागराज कलबुर्गी, बाबू पवार, रवीकिरण इंगळे, दयानंद उटगे, एकनाथ मोसलगी, अमर पराड, सर्जेराव माशाळे, प्रकाश सोनटक्के, कल्याणी लकशेट्टी, अनिकेत माने, एस. जी. व्हसुरे, ज्ञानेश्वर कदम, बसवराज शावरी आदींनी काम पाहिले. या स्पर्धेत तालुक्यातील अक्कलकोट करजगी मैंदर्गी व चपळगाव अशा चार बीट स्तरावरील मधील खो-खो कबड्डी लंगडी बुद्धिबळ धावणे असे वैयक्तिक व सांघिक खेळातील खेळाडू व शिक्षक उपस्थित होते.



### श्री शंकरलिंग प्रशालेत क्रीडा सप्ताह

**वळसंग, दि. १७ डिसेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग प्रशालेत क्रीडा महोत्सवानिमित्त सोलापूर जिल्हा अथलेटिक असोसिएशनचे सचिव व महाराष्ट्र ॲथलेटिक असोसिएशनचे उपाध्यक्ष प्राध्यापक राजू प्याटी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी एक खेळाचे छंद जोपासावे शरीर माध्यम खलुधर्म साधनम आणि खेळात आपापले करिअर घडवावे, असे ते म्हणाले. प्रशालेचे प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी प्रमुख पाहुण्यांचे सत्कार केले. यावेळी प्रशालेतील क्रीडाशिक्षक संतोष कस्तुरे, बाळकृष्ण गुंड, तानाजी जमादार, संजय धनशेट्टी, नीलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले, सिद्धारूढ हिरेमठ, सिद्धाराम भैरामडगी, शैलाजा निंबाळ उपस्थित होते.



### स्वामीकृपेचा ध्यास घेवून अक्कलकोटी आलोय : गायकवाड

**अक्कलकोट, दि.१७ डिसेंबर-**

जेथे दिव्यत्वाची प्रचिती आणि हरि दर्शनाची अनुभूती प्राप्त होते, असे साक्षात्कारिक स्थान म्हणजे अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांचे पावन पुण्य स्थान म्हणजे वटवृक्ष मंदिर केवळ भाग्यवंतांनाच स्वामी दर्शनाचा लाभ मिळतो याची प्रचिती स्वामी दर्शनाचा लाभ मिळालेल्या भाग्यवान स्वामी भक्तांना येते. याची आपणाला माहिती मिळाली आहे. या अनुशंगाने स्वामीकृपेचा ध्यास घेवून अक्कलकोटी आलो असल्याचे प्रतिपादन मराठी वाहिनीवरील देव माणूस या गाजलेल्या टीव्ही मालिकेतील कलाकार अजित गायकवाड यांनी केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी अजित गायकवाड यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. यावेळी भाविकांच्या स्वामी दर्शन अनुभूती बद्दल बोलताना अजित गायकवाड यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, पत्रकार सैदप्पा इंगळे, संजय पवार, गिरीश पवार, विपुल जाधव, श्रीशैल गवंडी, संजय पाटील उपस्थित होते.


### विवाहितेचा विनयभंग केल्या प्रकरणी एका विरुद्ध गुन्हा

**मंगळवेढा, दि.१७ डिसेंबर-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात एक २० वर्षीय विवाहिता आपल्या बाळाला घेवून घरात दुपारी १२ वाजता झोपली असता एका तरुणाने घरात घुसून तु मला फोन का करत नाही? तुझा मोबाईल बंद का लागत आहे? असे म्हणून तिचा विनयभंग करुन जातीवाचक बोलल्या प्रकरणी तानाजी दादासो गायकवाड याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील पिडीता तथा विवाहिता ही दि. १३ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता तिच्या बाळाला घेवून घरात झोपली असता वरील आरोपीने डोक्याला हेल्मेट घालून पिडीतेच्या घरात प्रवेश केल्यावर डोक्यावरचे हेल्मेट काढले व पिडीतेस आरोपी म्हणाला तू मला फोन का करत नाही? तुझा मोबाईल बंद का लागत आहे? त्यावेळी पिडीता म्हणाली, तू मला सारखा फोन करुन त्रास का देतो? असे म्हणत तिने आरोपीच्या जवळचे हेल्मेट ओढून घेत असताना पिडीतेला बेडवर पाडून तिच्या अंगला स्पर्श करुन तिच्या मनाला लज्जा वाटेल, असे कृत्य केल्याचे सदर पिडीतेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास मंगळवेढ्याचे डी.वाय.एस.पी.विक्रांत गायकवाड हे करीत आहेत.

## करमाळा तालुक्यासाठी आजपासून कुकडीचे रब्बी आवर्तन

**आमदार नारायण पाटील यांची माहिती**



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १७ डिसेंबर-**

रब्बी पिकांसाठी डावा कालवा व चिलवडी शाखा यामधून आवर्तन सुरु झाले आसुन करमाळा तालुक्यात पाणी पोहचले आहे.

दि. १८ ते २० डिसेंबर वीट व झरे (सा. क्र. २४०-२३५ तसेच वीट सा. क्र. २३५ ते २२६ २० ते २१ रोजी दोन दिवस पाणी दिले जाणार आहे. तर दि. २१ व २२ रोजी वंजारवाडी,रावगाव,पिंपळवाडी (सा. क्र. २२६ ते २२३) पाणी दिले जाणार आहे. दि. २२ ते २४ डिसेंबर दरम्यान सा. क्र. २२३ मधून मोरवड, कोर्टी, विहाळ व पोंधवडी या भागात पाणी दिले जाईल. तर चिलवडी शाखा कालव्याद्वारे चारी क्र. २६/५०० ते ३४/५०० मधून कुंभारगाव येथे पाणी दिले जाईल. दि. २२ व २३ डिसेंबर रोजी सावडी मधील २१/६२० ते २६/५०० यातील उपचाऱ्यांना पाणी दिले जाईल. तर दिनांक २३ व २४ डिसेंबर रोजी चिलवडी शाखा कोर्टी वितरकेमधून सावडी, कोर्टी व राजुरी या ठिकाणी पाणी दिले जाईल आशा नियोजनातून करमाळा तालुक्यातील कुकडी डावा कालवा प्रकल्पामध्ये लाभ क्षेत्रात पाणी पोहचवले जाईल अशी माहिती आमदार नारायण आबा पाटील यांनी दिली. आमदार नारायण आबा पाटील यांनी या आवर्तनासाठी निवडणूक निकालापासूनच आपला पाठपुरावा चालू ठेवला होता. यासाठी त्यांनी उपविभागीय आभियंता यांनाही आवर्तन योग्य रीतीने देण्याच्या सूचना केल्या आहेत. तर उपविभागीय अधिकारी स.र. जाधव यांनाही सदरचे आवर्तन हे महत्वाचे असण्याने कुकडी डावा कालवा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी बारकाईने लक्ष देऊन व समक्ष कार्यस्थळी भेटी देऊन शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात व लाभ क्षेत्रातील तलावात पाणी पोहचवावे असेही आमदार नारायण पाटील यांनी सूचित केले आहे.

पाणी वहन कालावधी, पाण्याची उपलब्धता यानुसार नियोजनात नाम मात्र बदल होण्याची शक्यता असल्याचे समजते परंतु आमदार नारायण आबा पाटील यांच्या प्रयत्नातून रब्बी कालावधीतील उभ्या पिकांना पाणी देण्यात येणार असल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.



## शेतकऱ्यांनी लघु उद्योजकांच्या माध्यमातून वाटचाल करावी : एकतपुरे

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. १७ डिसेंबर-**

शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतातील पिकाच्या बाजारभावाची वाट न पाहता लघु उद्योगजकांच्या माध्यमातून वाटचाल केल्यास शेतकऱ्याला आर्थिक हानीला सामोरे जावे लागणार नाही शिवाय तरुणांच्या हाताला काम मिळाल्यामुळे बेरोजगारांचं प्रमाणही कमी होईल असे मतं लक्ष्मी ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड माळीनगरचे मॅनेजर विष्णू एकतपुरे यांनी बोलताना व्यक्त केले.

माळीनगर, (ता.माळशिरस) येथे रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूज यांच्या कृषीकन्यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माळीनगर येथील केळीचे वेफर्स बनवणाऱ्या लक्ष्मी ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेडला महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संचलित, रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूज येथील कृषीकन्यांनी भेट दिली. त्यावेळी लक्ष्मी ॲग्रोचे मॅनेजर विष्णू एकतपुरे यांनी उत्पादन संदर्भात माहिती दिली. तसेच वेगवेगळ्या विषयांवरती चर्चा करून व शेत उत्पादनातील केळी या पिकावरती माहिती सांगून उत्पादन कशा पद्धतीने वाढेल व शेतीला पूरक व्यवसाय म्हणून आपण लघु उद्योग करून आपले उत्पन्न वाढवू शकतो याबद्दल चर्चा केली.

रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. जी.नलवडे, कार्यक्रम व समन्वय प्राध्यापक. एस.एम. एकतपुरे, कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.एम.चंदनकर आणि प्रा.एच.व्ही.कल्याणी यांचे सहकार्य लाभले. त्यावेळी कृषी कन्या सोनाली गायकवाड, ईशा घोगरे, स्नेहल तांबोळकर, प्राची जाधव, प्रतीक्षा बनसोडे, जिजाऊ बर्डे, कोमल लाड, प्रतीक्षा हेगडे व प्रणाली यादव उपस्थित होते.

## शेटफळ येथील गटशेतीचा प्रयोग शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी

**तहसीलदार शिल्पा ठोकडे; नागराज शेती मॉलचे उद्घाटन**



तभा वृत्तसेवा,
करमाळा दि.१७ डिसेंबर

शेटफळ येथील गटशेतीचा प्रयोग हा इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे त्यांनी कृषी विभागाच्या व शासनाच्या योजना सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करावा, असे मत तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी व्यक्त केले.

शेटफळ तालुका करमाळा येथील लोकविकास फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या वतीने आयोजित शेतकरी मेळावा मध्ये तालुक्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान, तहसिलदार शिल्पा ठोकडे व मान्यवरांच्या हस्ते नागराज शेती मॉलचे उद्घाटन व नागराज दिनदर्शिका प्रकाशन कार्यक्रम पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. येथील लोकविकास फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यामध्ये करमाळा तालुक्यातील केळी ऊस भाजीपाला व विविध पिकांमध्ये भरघोस उत्पादन घेणाऱ्या व उत्कृष्ट शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार शिल्पा ठोकडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज राऊत युनियन बँकेचे विभागीय प्रबंधक अतुल शेंडे, ग्रामसुधार समीतीचे अध्यक्ष ॲड. बाबूराव हिरडे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे गणेश करे-पाटील, जैन इरिगेशनचे विभागीय व्यवस्थापक संतोष डांगे, मंडल कृषी अधिकारी मधुकर मारकड प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष वैभव पवार यांनी केले. या कार्यक्रमाला लोकविकास डेअरीचे दीपक देशमुख, विठ्ठल पाटील महाराज, युनियन बँकेचे शाखाधिकारी मोहन कोरडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्रकुमार बारकुंड, आदिनाथचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत सरडे,धुळाभाऊ कोकरे, रामभाऊ पवार, दादासाहेब लबडे, सरपंच पांडुरंग लबडे, अनिल पोळ, विलास लबडे, किरणं पोळ, नानासाहेब साळूंके, गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे, विजय लबडे, विष्णू पोळ, राजेंद्र साबळे यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**या शेतकऱ्यांचा झाला सन्मान**

सचिन गव्हाणे, सचिन सरडे, आदिनाथ राऊत (चिखलठाण नंबर एक), वैभव बोराडे (केडगाव), संतोष नाईक नवरे (शेटफळ), भाऊसाहेब राखुंडे(सोगाव पूर्व), किशोर रिटे(रिटेवाडी), महादेव काळोखे (उमरड), शिवाजी साखरे (राजुरी), सुदाम रणदिवे, (सरफडोह).



## शिवाजी महाविद्यालयाचे महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ डिसेंबर-**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा के. एन. भिसे महाविद्यालय, कुर्डूवाडी येथे दि. १२ व १३ डिसेंबर रोजी संपन्न झाल्या. स्पर्धेमध्ये श्री शिवाजी महाविद्यालयच्या सुरज ढाणे यांनी ९२ किलो (फ्री स्टाईल ) वजन गटात प्रथम क्रमांक मिळविला, करण ढाणे ८२ किलो (ग्रिको रोमन) वजन गटात प्रथम क्रमांक, सौमित्र आनंतकवळस ९७ किलो ( फ्री स्टाईल ) वजन गटात तृतीय क्रमांक, नागेश पाडुळे ८७ किलो( ग्रिको रोमन) वजन गटात तृतीय क्रमांक तसेच निलेश जमदाडे ७७ किलो (ग्रिको रोमन) वजन गटात तृतीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी.वाय यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी.पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, कार्यकारणी सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, प्रमोद जाधव, संतोष कवडे, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. विजय संघास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. हरिदास बारसकर, डॉ.विजयानंद निंबाळकर, डॉ. रामहरी नागटिळक, प्रा.संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले

## कलासाधना मंडळातर्फे किल्ला स्पर्धांचे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ डिसेंबर-**

कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने दिवाळीमध्ये किल्ला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शालेय व खुल्या अशा दोन गटात स्पर्धा घेतल्या होत्या. रोख रक्कम, संस्थेचे मानचिन्ह, सहभाग प्रमाण पत्र असे पारितोषिकाचे स्वरुप आहे. सदर स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पांडुरंग भवन येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कालच निधन झालेले जागतीक कीर्तीचे कलाकार उस्ताद झाकीर हुसेन यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बाळकृष्ण बडवे यांच्या अध्यक्षतेखाली सिंहगड इंजि. कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास करांडे व पांडुरंग अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष अनिरुद्ध बडवे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या स्पर्धेचे परिक्षण इतिहास अभ्यासक तुकाराम चिंचणीकर, ॲड. आशुतोष बडवे-पाटील, जाणता राजा महानाट्य फेम वैभव जोशी, कलाशिक्षक अमित वाडेकर यांनी समर्थपणे केले त्याबद्दल स्पर्धेचे कार्याध्यक्ष अमरसिंह चव्हाण यांच्या हस्ते परिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तर यावेळी कलासाधनाचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत बडवे महाजन यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्याचा शिवरायांची सिंहासनारूढ प्रतिमा देउन सत्कार करण्यात आला. संस्थेचे नूतन सचिव ज्ञानेश्वर मोरे यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांचे स्वागत सहसचिव अक्षय बडवे पाटील यांनी केले, सूत्रसंचालन मंदाकिनी देशपांडे यांनी केले तर



आभार राजकुमार आटकळे यांनी मानले. या स्पर्धेत शालेय गटात प्रथम क्रमांक श्रेया डांगे, द्वितीय क्रमांक दुर्वांकुर बेणारे, तर तृतीय क्रमांक अथर्व हुंगे यांनी प्राप्त केला तर महाविद्यालयीन गटात प्रथम क्रमांक उत्कर्ष खरात, द्वितीय क्रमांक श्वेता घाडगे तर तृतीय क्रमांक ओम जाधव यांनी प्राप्त केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कलासाधनाचे अध्यक्ष श्रीकांत बडवे महाजन यांच्यासह मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. विनायक परिचारक, ज्ञानेश्वर मोरे, अमर चव्हाण, अभियंता राजेंद्र माळी, रणजीत पवार, अरिहंत कोठाडिया, डॉ. किरण बहिरवाडे, अभिराज बडवे, प्रा. राजेंद्र मोरे, राजकुमार शहा, जगदीश खडके, बसवराज बिराजदार, महेश अंबिके, विष्णुकांत बोंबलेकर, अमृतभाई शहा, अनंता नाईकनवरे, महेश देशपांडे, नारायण बडवे आदी सदस्यांनी परिश्रम घेतले.

### महिलेवरील अत्याचाराच्या गुन्ह्यात संशयित आरोपीस जामीन मंजूर

**बार्शी, दि. १७ डिसेंबर-**

बार्शी येथील सत्र न्यायाधीश चव्हाण साहेब यांनी दि. १६ डिसेंबर रोजी संशयित आरोपी शुभम माने यास जामीन मंजूर केला आहे.

यातील पिडीतेने आरोपी शुभम माने याचे विरुद्ध लग्नाचे अमिष दाखवून, प्रेमाचे नाटक करुन वारंवार अत्याचार केल्या संदर्भात बार्शी शहर पोलीस ठाणे येथे फिर्याद नोंदवली. फिर्यादीवरुन आरोपी शुभम माने यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला. आरोपी शुभम माने यास दि. १७ नोव्हेंबर २०२४ रोजी अटक करण्यात येऊन कोर्टात हजर केले असता आरोपीस न्यायालयीन कोठडी देण्यात आली. या संदर्भात संशयित आरोपी शुभम माने याने गुन्ह्याच्या अनुषंगाने ॲड.अमोल अलाट व ॲड. विशाल गोणेकर यांच्यामार्फत बार्शी यथील सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. सदर जामीन अर्जावर सुनावणी होऊन सत्र न्यायाधीश मे चव्हाण साहेब यांनी दि.१६ डिसेंबर रोजी आरोपीची जामीनावर मुक्तता केली. सदर जामीन अर्जकामी आरोपीतर्फे ॲड. अमोल अलाट व ॲड. विशाल गोणेकर यांनी काम पाहिले.

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूची चौकशी करून दोषींवर कारवाई करा

**माढ्यात रस्ता रोको करून परभणीच्या घटनेचा केला निषेध**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १७ डिसेंबर-**

परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृतीचे समाजकंटकाकडून विटंबना करण्यात आली त्या घटनेच्या विरोधात परभणी सह राज्यभरात आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आले. परभणी येथील एका आंदोलकाचा पोलीस कोठडी मृत्यू झाला त्यासंदर्भात माढा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मंगळवारी रस्ता रोको करून या घटनेचा निषेध व्यक्त केला आहे. त्या संदर्भात आंदोलकांनी प्रशासनाला निवेदन दिले आहे.

या निवेदनात असे म्हटले आहे की परभणी येथे भारतीय राज्यघटनेच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर परभणी बंद ठेवून आंदोलन करण्यात आले त्या आंदोलनाला काहीसे हिंसक वळण लागले, पोलीसांनी लाठी चार्ज करून शांतता प्रस्थापित केली होती. जातीयवादी मानसिकतेतून पोलिस विभागाने आंबेडकर वस्त्यांमध्ये कोबींग ऑपरेशन राबवून अनवीत अत्याचार केले आहेत. अनेकांना घरातून नेऊन गुन्हे दाखल केले आहेत. यामध्येच सोमनाथ सुर्यवंशी या वडार समाजाच्या भिमसैनिकाचा प्राण पोलीस कोठडीत गेला असून अनेकांना जबर मारहाण केली आहे. परभणी मधील



भिमसैनिकांवर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घ्यावे. सोमनाथ सूर्यवंशी या भिम सैनिकाच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, असे म्हटले आहे. आंदोलन स्थळी येऊन प्रशासनाच्या वतीने निवासी नायब तहसीलदार विजय कवडे यांनी हे निवेदन स्वीकारले असून आंदोलकांच्या भावना शासन दरबारी कळवणार असल्याचे सांगितले आहे. यावेळी राजाभाऊ चवरे, आनंदराव कानडे, अशोक माने, रवींद्र सरवदे, अमर लंकेश्वर, किरण पवार, दिनेश जगदाळे, माजी नगराध्यक्ष राहुल लंकेश्वर, गंगाराम पवार, सभापती अरुण कदम, नगरसेवक आजिनाथ माळी, वंदना लंकेश्वर, अशोक जानराव, जहीर मणेर, कुंदन पवार, किरण लंकेश्वर, शितल कानगे, विकास पवार, बाबा पवार, आण्णा पवार, भारत पवार, रोहित पवार, रोहित रावडे, सिद्धार्थ लंकेश्वर, रोहित लंकेश्वर, विजय सातपुते रमेश थोरात आदी समाज बांधव उपस्थित होते.

CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पॉश मशीन चालत नसल्यामुळे ग्राहक वैतागले

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.१७ डिसेंबर-**

स्वस्त धान्य दुकानात पारदर्शकता आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पॉश मशीन आणले असून यावर सर्व ग्राहकांच्या रितसर नोंदी करण्यात आल्या यावरुन खरेतर ग्राहकांना त्याच्या रेशनकार्डात असणाऱ्या नावाप्रमाणे रितसर मालाचे वाटप व्हावे यासाठी ही मशीन अत्यंत उपयोगी आहे परंतु ही मशीनच चालत नसल्यामुळे ग्राहकांना गेल्या पंधरा ते विस दिवसापासून दुकानात माल येऊन सुद्धा ग्राहकांना माल मिळत नाही.

यामुळे ग्राहक दुकानाकडे हेलपाटे मारुन अक्षरशः थकले पण मशीनच सुरु नसल्यामुळे त्यांना मालच मिळत नाही. दुकानदार दुकानात मोकळे बसुन अक्षरशः वैतागले पण काही केल्या मशीनच सुरु होईना, जरी मशीन



सुरुच झाली तर थोडावेळ चालते व लगेच बंद पडत आहे. खरेतर यामध्ये शासनाचा पारदर्शकता आणण्यासाठी या मशीन आणल्या आहेत पण नेटवर्क म्हणा की इतर कारणामुळे मशीन चालत नाही. याबाबत शासनस्तरावर दखल घेऊन पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. यामुळे दुकानदार व ग्राहक अक्षरशः वैतागले आहेत. गेले महीना झाले माल मशीन चालत नसल्यामुळे तसाच दुकानात पडुन आहे यावर तात्काळ उपाययोजना होण्याची आवश्यकता आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### सदाशिवराव माने विद्यालयाच्यावतीने श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**अकलूज, दि. १७ डिसेंबर-**

अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आनंदनगर या गावात श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटन आनंदनगर गावाचे माजी सरपंच वसंत जाधव यांनी केले. एकत्र काम केल्याने मैत्री भावना, सहकार्य यातून समाजसेवेचा वसा मिळतो, तसेच स्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही, मूल्यशिक्षण हे सर्व स्वयंसेवकांमध्ये रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे, असे प्रतिपादन विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल फुले यांनी केले. प्रास्ताविकमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तानाजी महाडिक यांनी गावांमध्ये पाणी आडवा पाणी जिरवा संदेश देऊन ५० स्वयंसेवकांकडून सात दिवसांत स्वच्छता करणार असल्याचे सांगितले. यावेळी आनंदनगर गावाचे सरपंच राजेंद्र लोंढे, उपसरपंच बाळासाहेब काटकर, माजी सरपंच विठ्ठल शेळमकर, सदस्य गंगाधर चव्हाण, राजेंद्र जाधव, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक कोल्हे, शाळेचे शिक्षक, गावातील ग्रामस्थ तसेच विद्यालयाचे उपप्राचार्य झाकीर सय्यद, शिक्षक प्रतिनिधी संजय जाधव उपस्थित होते.



### 'स्व. नामदेव सपकाळ, नायकुडे गुरुजींचे कार्य आधुनिक पिढीसाठी प्रेरणादायी'

**करमाळा, दि. १७ डिसेंबर-**

स्व.नामदेव बापू व आदिनाथ नायकुडे गुरुजी यांचे कार्य आधुनिक पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांचे कार्य हे दीपस्तंभा सारखे असल्याचे प्रतिपादन हभप ज्ञानदेव महाराज फुले यांनी केले. सालसे (ता. करमाळा) येथील न्यू यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या प्रांगणात संस्थापक स्व.नामदेव बापू सपकाळ आणि तत्कालीन सचिव आदिनाथ नायकुडे गुरुजी यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित व्याख्यानानिमित्त बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उद्योजक नितीन सपकाळ, अध्यक्ष प्रकाश सपकाळ, उपाध्यक्ष व मुख्याध्यापिका मनीषा तनपुरे, सचिव रवींद्र सपकाळ, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष तानाजी लोकरे तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष वैभव घाडगे, संस्था संचालक अनील घाडगे, सविता लोकरे, निशा सपकाळ, माया गोमे, लिला जाधव, सुरेखा ढेरे, सुजाता जगदाळे तसेच गौरव क्लॉथचे मालक शरद पवार, जालिंदर शिंदे, मेजर गोमे भारत सपकाळ, संदीप सपकाळ, शुभम सपकाळ, सेवानिवृत्त शिक्षक मच्छिंद्र घाडगे, पोलिस पाटील पवार, जाधव, बाळासाहेब घाडगे उपस्थित होते. यावेळी पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व मेडल देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन सातपुते यांनी केले तर आभार घाडगे यांनी मानले.



### करमाळयात पोलिस पाटलांचा सत्कार

**करमाळा दि. १७ डिसेंबर-**

करमाळयात १७ डिसेंबर हा दिवस पोलीस पाटील दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक दरम्यान करमाळा पोलीस ठाणे हद्दीतील गावांमधील पोलीस पाटील यांनी उत्कृष्टपणे कामकाज केले होते. त्यामुळे पोलीस पाटील दिनानिमित्त त्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन पोलीस अधीक्षक, अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आले.

### तालिका सभाध्यक्षपदी दिलीप सोपल यांची नियुक्ती

**बार्शी, दि.१७ डिसेंबर-**



महाराष्ट्र विधानसभा कामकाजासाठी तालिका सभाध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज सभागृहात ही घोषणा केली. तालिका सभाध्यक्षपदी आमदार दिलीप सोपल, विजय रहांगडाले, रमेश बोरनारे आणि शेखर निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा तालिका सभाध्यक्ष म्हणून दिलीप सोपल यांची नियुक्ती झाल्याने त्यांच्या कार्यक्षमतेला पुन्हा एकदा मान्यता मिळाली आहे. अनुभवी राजकारणी म्हणून परिचित असलेले दिलीप सोपल हे आपल्या स्पष्टवक्तेपणा आणि कुशल नेतृत्वासाठी ओळखले जातात. त्यांच्या या नियुक्तीने विधानसभेतील कामकाज अधिक प्रभावी आणि सुसज्ज होण्यास निश्चितच मदत होईल. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यावेळी ही घोषणा करत नियुक्त सदस्यांच्या अनुभवाचा विधानसभेच्या कामकाजात चांगला उपयोग होईल, असा विश्वास व्यक्त केला.

## ग्रामीण भागात प्रवासातच लालपरी पडू लागल्या बंद

**बार्शी अगाराची कथा; अपुऱ्या एसटी बसमुळे वेळेवर एसटी जाईना**

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि.१७ डिसेंबर-**

सुरक्षीत प्रवास सुलभ प्रवास, प्रत्येक प्रवाशी प्रवासाची हमी अशी आपल्या लाडक्या लालपरीच ब्रीद. पण सद्यस्थितीत सुरक्षित प्रवासाची हमी आहे का? प्रत्येक प्रवाशाला सुरक्षित असणारी लालपरी सुरक्षित आहे का असा ज्वलंत प्रश्न )सम ोर आला आहे. बार्शी आगारच्या एसटी बसेस पूर्णपणे खिळखिळ्या झालेल्या आहेत. प्रचंड धूर ओकत एसटी बसेस रस्त्यावरून धावताना दिसत आहेत. कधी कुठे गाड्या बंद पडतील याचाही भरवसा नाही. पावसळ्यामध्ये अनेक एसटी बसेस चक्क गळत होत्या.

बार्शी आगारातून लांबपल्ल्यासाठी एसटी बसेस धावत आहेत. आज घडीला आगराच्या एसटी बसने हजारो प्रवाशी प्रवास करतात. शाळेला, कॉलेजला ग्रामीण भागातील मुले मुली एसटीने ये जा करीत असतात. यामुळे सर्वांना याचा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. बार्शी आगारात सद्यस्थितीत ११० एसटी बसेस आहेत यापैकी १० बसेस स्क्रॅप केलेल्या असून ७ ते ८ बसेस पासिंगसाठी जातात ९० गाड्या दररोज राज्यभर ३४००० किलो मीटरचा प्रवास करीत असतात. लालपरीचे चालक-वाहक ना इलाजने आपले कर्तव्य पार पाडत आहेत. त्यांची अवस्था ही तोंड दाबून बुक्क्याचा मार अशी आहे. यापूर्वी वेतनासाठी त्यांना आंदोलन करावे लागले होते, यातच डबड्या गाडीची व्यथा कोणाला सांगावी अशी अवस्था त्यांची आहे. जीव मुठीत घेऊन चालक-वाहक लालपरी चालवीत आहेत, मात्र प्रवाशांची जोखीम कोण घेणार हे विशेषच..!

ग्रामीण जीवनाची रक्तवाहिनी म्हणून एसटी वाहतूकीची सेवा सर्व दूर ओळखली जाते , मात्र हीच एसटी जर वारंवार बंद पडत असेल तर जनजीवन विस्कळीत होत आहे. प्रवाशांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणारी लाल परी म त्र प्रवाशांच्यासाठीच अडचणीची ठरत आहे. मंगळवारी सकाळी साडे दहाची असणारी बार्शी-सोलापूर नॉन स्टॉप बस बार्शी डेपोतून प्रवासासाठी निघाली खरी मात्र ती अवघ्या २५ मिनिटातच २३ किलोमीटर अंतरावर वैराग येथे बंद पडली. आम्ही आमच्या लहान मुलाला दवाखान्यात घेऊन जाण्यासाठी एसटीने प्रवास करत होतो. दवाखान्यांमध्ये अकरा वाजताची नाव नोंदणी केली होती, मात्र एसटीरस्त्यामध्येच बंद पडल्यामुळे दवाखान्यांमध्ये पोचू शकलो नाही त्यामुळे उपचार तर दूरच राहिले उलट परत गावी पोहोचणार का नाही, याची शाश्वती राहिली नाही, असे प्रवास करणाऱ्या एका महिलेने सांगितले आहे.

अंबाजोगाईहून मी बार्शी मार्गे सोलापूर येथे एम्पॉलमेंट ऑफीसला शासकीय कामासाठी निघालो होतो . बार्शी बस स्थानकातच नॉन स्टॉप गाडीचे तिकीट काढताना प्रवाशात वादंग झाल्याने अगोदरच अर्धा तास गाडी उशिरा निघाली . पुढे वैराग मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ती बंद पडली. त्यामुळे सोलापूरचे शासकीय काम करून परतीच्या प्रवासाची काळजी लागली आहे, असेही प्रवाशी म्हणाला. ग्रामीण भागामध्ये जाणाऱ्या बसेस वेळेवर जात नसल्याने शाळकरी मुलांची तारांबळ होत असून घरी जाण्यास उशीर होतो. तसेच काही ड्रायव्हर विद्यार्थ्यांनी हात केला तरी एसटी थांबवत नाहीत, अशी तक्रार शाळकरी मुले व पालकातून केली जात आहे तरी याची वरीष्ठ पातळी वरून दखल घेणे गरजेचे आहे.



सध्या बार्शी आगाराकडील स्क्रॅपच्या बसेस काढून टाकण्यात आलेले आहेत त्यामुळे प्रवासादरम्यान बंद पडण्याचे प्रमाण कमी झाले आहे शासनाकडे १० बसेसची मागणी केली असून नवीन बसेस आल्यानंतर आणखी सुधारणा होईल

**- मधूरा जाधवर,**
डेपो मॅनेजर, बार्शी

## रब्बी पिकांना कॅनॉलद्वारे पाणी देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १७ डिसेंबर-**

बोरी धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याने पाठबंधारे विभागाने ताबडतोब कॅनॉलद्वारे रब्बी पिकांना पाणी द्यावे अशी मागणी अणदूर येथील शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली आहे.

बाभळगाव फाट्यावरील शेतकऱ्यांनी ही मागणी केली असून सध्या रब्बी हंगामातील पिके उदाहरणार्थ ज्वारी, गहू, हरभरा ही पिके जोमात आहेत सध्या दिवसभर



कडक ऊन व रात्री जोरदार थंडी या मुळे पाण्याअभावी ही पिके धोक्यात आली आहेत बोरी धरण पूर्ण क्षमतेने भरले असून पाणी असताना पण पाणी सोडण्यासाठी प्रशासन कोणाची वाट बघत आहे हे कळत नाही,सर्व शेतकरी जी पाणीपट्टी आहे ती भरण्यास तयार आहेत तरी पाटबंधारे विभागाने त्वरित पाणी सोडावे अशा आशयाचे निवेदन ,सहाय्यक अभियंता पाटबंधारे विभाग नळदुर्ग यांच्या कडे केले आहे या वेळी शेतकरी संघटनेचे नेते अरविंद घोडके, बालाजी राजपूत, निलेश आलूरे, शिवकुमार स्वामी, बाबुराव मुळे, दत्ता नाटेकर, सुभाष कोळी, राम जवळगे, व्ही के घोडके गुरुजी, रतन घोडके आदी मान्यवर उपस्थित होते. निवेदनावर बाभळगाव फाट्यावरील ४५ शेतकऱ्यांच्या सह्या आहेत,



## बार्शी तालुक्यातील बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी

**शेतीसाठी दिवसा विजपुरवठा देण्याची छावा संघटनेची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ डिसेंबर-**

गेल्या काही दिवसांपासून बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये बिबट्याने अक्षरशः थैमान घातले आहे. उपळाई (ठों.), पानगाव, रुई, चारे आदी भागातील जनावरांवर हल्ला करुन गाई, वासरे व शेळ्या फस्त केल्या आहेत. बिबट्या आणि त्याच्या पिल्लांचा वावर बार्शी तालुक्यात असल्याचे बार्शी वन विभागाने देखील जाहीर केले आहे. बिबट्याने जनावरांवर केलेल्या हल्ल्यामुळे अनेक जनावरे मृत्यूमुखी पडून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. बिबट्याच्या हल्ल्यामुळे बार्शी तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करण्याची तालुक्यातील शेतकऱ्यांची व नागरिकांची मागणी आहे. तसेच ग्रामीण भागामध्ये शेतीसाठी रात्रीचा वीजपुरवठा असल्यामुळे रात्री अपरात्री अनेक संकटांना तोंड देत शेतकऱ्यांना शेतामध्ये ज्वारी, हरभरा, गहू तसेच कांदा या पिकाला पाणी देण्यासाठी शेतकरी जीव मुठीत घेऊन शेतामध्ये जात आहेत. शेतकऱ्यांना संकटातून वाचवण्यासाठी शासनाने शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा द्यावा, असे देखील शेतकऱ्यांमधून मोठी मागणी होत आहे. तरी आपण वरील गोष्टींचा गांभीर्याने विचार करुन, नागरिकांसाठी धोकादायक असणाऱ्या बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करावा व शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करुन द्यावा, अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय व हक्कासाठी तसेच शेतकऱ्यांच्या रक्षणासाठी छावा संघटना रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन छेडेल अशा प्रकारचा इशारा छावा संघटनेचे बार्शी तालुकाध्यक्ष धीरज शेळके यांनी बार्शी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

## केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आ. आवताडेंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१७ डिसेंबर -**

केंद्रीय रस्ते वाहतूक व विकास मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांची मंगळवारी नागपूर येथील त्यांच्या निवासस्थानी पंढरपूर विधानसभा मतदार संघाचे आ. समाधान आवताडे यांनी सदिच्छा भेट घेतली.

यावेळी नितीन गडकरी यांचा आमदार आवताडे यांनी स्नेह सत्कार करून आभार मानले. या बरोबरच आमदार आवताडे यांनी सलग दुसऱ्यांदा पंढरपूर विधानसभा मतदार संघात कमळ पुरविल्याने मंत्री गडकरी यांनी त्यांचा सत्कार केला.

आजच्या भेटी दरम्यान आमदार आवताडे यांनी नितीन गडकरी यांच्या बरोबर मतदारसंघातील अनेक विषयावर चर्चा केली. मतदारसंघातील प्रलंबित रस्ते विकासासाठी गडकरी यांनी यावेळी



सकारात्मक प्रतिसाद दिल्याचेही आमदार आवताडे यांनी सांगितले. दरम्यान या प्रसंगी निवडणुक प्रचार दरम्यान आपला अमूल्य वेळ दिल्या बद्दल नितीन गडकरी यांचे आ.आवताडे यांनी आभार देखील व्यक्त केले. यावेळी भाजपच्या नेत्या तथा विद्यमान मंत्री पंकजा मुंढे ,मंत्री माधुरी मिसाळ, आ.विद्या ठाकूर, आ.मोनिका राजळे, आ.सीमाताई हिरे, आ.श्वेता महाले आदी या प्रसंगी उपस्थित होत्या.

## पिलीव परीसरात कडाक्याची थंडी

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.१७ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात गेल्या काही दिवसांपासून कधी नव्हे एवढे तापमान कमी झाल्यामुळे थंडीचा प्रचंड कडाका वाढला आहे. संध्याकाळी पाच वाजलेपासून थंडी सुरु होत आहे. सकाळी शाळा असणाऱ्या विद्यार्थ्यांना या कडक थंडीचा प्रचंड त्रास होत आहे. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांची शाळा सकाळी साडेसात वाजता केली आहे. यामुळे पालक वर्गात मोठी नाराजी पसरली आहे. तर ही वेळ बदलून सकाळी अकरा वाजताची नेहमीची वेळ करावी, अशी पालक वर्गातून मागणी होत आहे. या कडक थंडीचा शेतकरी वर्ग यांनाही प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. कारण पिकांना पाणी देण्यापासून शेतीची अनेक कामे थंडीतच करावी लागत आहेत. रात्री लवकरच तसेच सकाळी १० वाजेपर्यंत या बोचऱ्या थंडीमुळे रस्ते अक्षरशः ओस पडत आहेत. गहू , हरभरा यासारख्या पिकांना ही थंडी उपयुक्त आहे. तर काही पिकांना ही थंडी हानीकारक आहे. ग्रामीण भागात रात्री तसेच सकाळी शेकोटया पेटलेल्या दिसत आहेत.

## जिल्ह्यातील ३९४ शाळेतील विद्यार्थ्यांवर राहणार 'सीसीटीव्ही'ची नजर

**जिल्हा नियोजनकडून ३ कोटी १० लाख निधी प्राप्त; शाळेतील विविध घटनाक्रम होणार कॅमेरात कैद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर-**

राज्यातील विविध शाळांमध्ये अप्रिय घटना घडत या घटनेला चाप बसावा तसेच सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सोलापूर जिल्ह्यातील विविध शाळा या आता 'सीसीटीव्ही' कॅमेराच्या कक्षेत येणार आहेत. त्याच अनुषंगाने सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी जिल्हा नियोजनकडून पहिल्या टप्प्यात ३ कोटी १० लाख रुपये निधी प्राप्त झाला. यासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यातून पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील मुलींच्या ३७ तर शंभरपेक्षा अधिक पटसंख्या असणाऱ्या ३५७ अशा एकूण ३९४ प्राथमिक शाळेत सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत.

दरम्यान, जिल्हा परिषदेच्या २



हजार ७७७ प्राथमिक शाळा आहेत. प्रत्येक शाळेत आठ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी अंदाजे ५५ कोटीची गरज आहे. मात्र जिल्हा नियोजन समितीकडून केवळ ३ कोटी १० लाखाचा निधी शिक्षण विभागाला देण्यात आला आहे. बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या वतीने विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत जिल्हा नियोजन मधून निधी उपलब्ध करून शाळात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र जिल्हा नियोजनकडून पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने पहिल्या टप्प्यात ३७ मुलींच्या व १०० पेक्षा अधिक पटसंख्या असणाऱ्या ३५७ शाळात सीसीटीव्ही बसविण्याबाबत प्राधान्यक्रम देण्यात येणार आहे.

**शाळांची तालुकानिहाय संख्या**

अक्कलकोट - ४४, बार्शी - २७, करमाळा - २३, माढा - २९, माळशिरस -४८, मंगळवेढा - २४, मोहोळ-५६, पंढरपूर - ३३, सांगोला - २२, सोलापूर उत्तर- २७, सोलापूर दक्षिण - ६१ . एकूण - ३९४.

**सीएसआरमधून २०० सीसीटीव्ही**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या विनंतीवरून राज्यातील एका नामवंत कंपनीने सीएसआर फंडातून जिल्हा परिषदेच्या २०० प्राथमिक शाळांत सीसीटीव्ही बसविण्याचे मान्य केले आहे. या संदर्भात प्रशासकीय कार्यवाही सुरू आहे. जिल्हा नियोजन कडून ३९४ तर सीएसआर मधून २०० असे एकूण ५९४ जिल्हा परिषदेच्या शाळा चालू शैक्षणिक वर्षात सीसीटीव्हीच्या कक्षेत येणार आहेत.

**ठेकेदाराला पुरवठा करण्याचे आदेश**



जिल्ह्यातील प्राथमिक शाळांना सीसीटीव्ही बसविण्यासाठी जिल्हा नियोजनमधून ३ कोटी १० लाखांचा निधी प्राप्त झाला. यासंदर्भात निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, संबंधित ठेकेदाराला पुरवठा आदेश देण्यात आला आहे. प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही बसविण्यासाठी ७८ हजार ३६९ रुपये लागणार आहेत. अशाप्रकारे ३९४ शाळात सीसीटीव्ही बसविण्याचा एकूण खर्च ३ कोटी ८ लाख ७७ हजार ३८६ रुपये इतका येणार आहे. सीसीटीव्ही बसविण्यासंदर्भात संबंधित ठेकेदाराकडून शाळांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे.

- कादर शेख,
प्राथमिक शिक्षणाधिकारी जि.प.सोलापूर.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तालुका विज्ञान प्रदर्शनात आर्य चाणक्य विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**
धाराशिव तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात आर्य चाणक्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दुसरा आणि तिसरा क्रमांक पटकावून नैपुण्य प्राप्त केले आहे.

दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक शारुख तांबोळी, अजिंक्य लोंढे यांनी तयार केलेल्या आधुनिक होम या उपकरणाला मिळाले यासाठी त्यांना प्रशालेच्या शिक्षिका नूतन



नागपुरे, मोनालिका पवार यांचे मार्गदर्शन लाभले. तर तिसरा क्रमांक प्रणव साळुंके, अथर्व वाघोलीकर यांनी तयार केलेल्या रोबोटिक फवारणी यंत्र या उपकरणाला मिळाला. विद्यार्थ्यांच्या या कौशल्याबद्दल लोकसेवा समितीचे अध्यक्ष ॲड.मिलिंद पाटील,शेषाद्री डांगे, डॉ.अभय शहापूरकर, कमलाकर पाटील मुख्याध्यापक डॉ.मनीष देशपांडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना प्रशालेचे बाबासाहेब जगताप, सौ.शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

## संक्षिप्त वृत्त...

### कर्जमाफी करुन सरकारने शब्द पाळावा : संतोष घोडके

**जळकोट, दि.१७ डिसेंबर -**
सरकारने निवडणुकीत जाहीर केल्यानुसार आता शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करावी. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी सिंदगाव (ता.तुळजापूर) येथील युवासेना विभागप्रमुख संतोष घोडके यांनी केली आहे. घोडके यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात नुकतेच नवे सरकार स्थापन झाले आहे. महायुतीचे सरकार आले आहे. येणाऱ्या काळात सरकारने महाराष्ट्राच्या विचारांची परंपरा ठेवत शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, वंचितांना केंद्रबिंदू मानून सर्वसामान्य जनतेला न्याय द्यावा. तसेच निवडणुकीत शेतमालाला योग्य हमीभाव तसेच सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याचा दिलेला शब्द पाळावा. महायुतीने जाहीरनाम्यात तसेच जाहीर सभेत हा शब्द दिला होता. तो शब्द पाळावा.सोयाबीनचे दर दिवसेंदिवस उतरत चालल्याने शेतकरी हताश झाला आहे. सरकारने शेतकऱ्यांची दखल घेण्याची गरज आहे, अशी मागणी घोडके यांनी केली आहे.


### २० डिसेंबर रोजी : सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**
सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेत व पोलीस अधिक्षक,अप्पर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत २० डिसेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये तसेच माजी सैनिक व देशभक्त नागरिकांच्या माहितीसाठी दरवर्षी ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वजदिन म्हणून साजरा केला जातो. या कार्यक्रमामध्ये उत्कृष्ट ध्वजदिन निधी संकलनाबाबत मान्यवरांचा सत्कार,वीर पत्नी,वीर माता,वीरपिता यांचा सत्कार तसेच माजी सैनिकांना आर्थिक मदतीचे धनादेश वाटप, विशेष गौरव पुरस्कार प्राप्त पाल्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# आपसिंग्याच्या वस्तीगृहात बोगस पटसंख्या ?

## अनुदान लाटण्यासाठी शिक्षण संस्थेकडून दाखविले खोटे विद्यार्थी...समाजकल्याण विभागही सहभागी

## विद्यार्थीकडून पाणी तापवण्यासाठी करवून घेत आहेत जळण गोळा करण्याची काम...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील नरेंद्र आर्य विद्यालय संलग्न असलेले मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृहात गेल्या कित्येक वर्षापासून बोगस विद्यार्थी दाखवून शासकडून अनुदान लाटण्याचा गंभीर प्रकार घडत असून विद्यार्थ्याकडून पाणी तापवण्यासाठी जळण गोळा करण्याचे काम करुन घेत आहेत. तसेच या वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पटसंख्याही बोगस असल्याचे तरुण भारतच्या स्टिंग ऑपरेशनमधून दिसून आले आहे.

येत्या काही नरेंद्र आर्य विद्यालय हे आपले अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे. विद्यालय स्थापनेपासून येथे विद्यार्थी वस्तीगृह आहे. हे वस्तीगृह विद्यालय सुरळीत चलावे यासाठी स्थापनेच्या सुरुवातीला आपसिंगा गावातील काही दानशुर व्यक्तींनी वस्तीगृहास धान्य देवून वस्तीगृह चालविले होते. यानंतर ते काही काळ गावातील नागरिक आणि पालकांच्या मदतीवर चालत होते.

शासनाकडून वस्तीगृहासाठी आर्थिक मदत सुरु झाल्यानंतर यात अनेक गैरप्रकार सुरु झाले. तसेच बोगस नावे जोडून खोटे विद्यार्थी





दाखविण्यात आले. मात्र, गेल्या कित्येक दिवसापासून वसतीगृहात राहत नसलेल्या विद्यार्थ्यांची नोंदही वस्तीगृहाच्या हजेरी पटावर आहे. एकही दिवस वस्तीगृहात न राहिलेल्या पालकांशी तरुण भारतकडून संपर्क साधण्यात आला. यात नरेंद्र आर्य विद्यालय येथे सध्या कार्यरत असणारे शिपाई यांच्याही मुलाची नोंद वसतीगृहाच्या हजेरी पत्रकांवर दिसून आली. हा शिपाई अपसिंगा गावातीलच स्थानिक रहिवाशी आहे. यामुळे गावातीलच रहिवाशी असणाऱ्या आणि नरेंद्र आर्य विद्यालय येथे कार्यरत असलेल्या शिपाई यांच्या मुलाला वस्तीगृहात प्रवेश दिलाच कसा हा प्रश्न यामुळे उपस्थित होत आहे.

तसेच याच गावातील अनेक विद्यार्थी हे हजेरी पटाला दिसून आले. ते स्थानिकचे असताना त्यांना कसे वस्तीगृह प्रवेश दिला गेला याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.

### जळण गोळा केल्याने विद्यार्थी आजारी

अपसिंगा येथील मागासवर्गीय वस्तीगृहात विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गरम पाण्याची ॲटोमेटीक व्यवस्था नाही. तसेच गेल्या काही दिवसात येथे पाणी गरम करण्यासाठी बंबची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, बंबमध्ये पाणी गरम करण्यासाठी लाकडाची गरज असते. हे लाकडे जळण गोळा करण्यासाठी विद्यार्थ्यांना कामाला लावले जात आहे. यामुळे ते अंगदुखी होवून आजारी पडत आहेत.

### अध्यक्ष म्हणतात ४२, अधिक्षक म्हणतात ७६ आणि विद्यार्थी म्हणतात आम्ही २५ जणच

दै.तरुण भारतचे जिल्हा प्रतिनिधी जेव्हा अपसिंगा येथील विद्यार्थी वस्तीगृहात पोहचले. तेव्हा वस्तीगृहात चार-पाच विद्यार्थी जळण भरुन अंग दुखत असल्याने शाळेत गेले नव्हते. त्यांच्याकडे विचारपूस केल्यानंतर त्यांनी आम्ही संपूर्ण वस्तीगृहात २५ जणच असल्याचे सांगितले.त्यानंतर काही वेळानंतर तेथे वस्तीगृह अधिक्षक आले त्यांना वस्तीगृहातील पटसंख्या विचारली असता त्यांनी ७६ आहे असे सांगितले. त्यानंतर संस्थेच्या अध्यक्षांना विचारले असता त्यांनी ४२ विद्यार्थी असल्याचे सांगितले.

### ग्रंथालयात पुस्ताकऐवजी जळण

अपसिंगा येथील मागासवर्गीय वस्तीगृहात विद्यार्थ्यांनी जळण गोळा करुन आणले होते. ते वस्तीगृहाच्या मैदानात टाकले होते. यातील काही जळण हे ग्रंथालय असलेल्या खोलीत टाकले होते.

### चौकशी करुन कारवाई करू

अपसिंगा येथील मागासवर्गीय वस्तीगृहात बोगस पटसंख्या आढळून आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल. तसेच त्या संस्थेने मागणी केलेले अनुदानही गोठविण्यात येईल.
**-श्री.खामितकर, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद**

## एमएसएमई क्षेत्र निर्यात प्रचालन जागरुकतेसाठी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**
राज्यासाठी महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या एमएसएमई क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापककरन रोजगार, स्वयंरोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे,निर्यातवृध्दीस चालना देण्यासाठी तसेच उद्योगाच्या विकासाकरीता राज्य तसेच केंद्र शासनाचे विविध विभाग त्यांचे उपक्रम व योजना उद्योग संचालनालयाकडून राज्यात राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यातील एकदिवसीय कार्यशाळा १९ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,धाराशिव येथे सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजता दरम्यान आयोजित करण्यात येत आहे.या चर्चासत्राचे नियोजन विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मार्गदर्शनात तसेच जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेत व छत्रपती संभाजीनगर विभागाचे उद्योग सहसंचालक बी.टी.यशवंते यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येत आहे. या कार्यशाळेचा सर्व भागधारकांनी लाभ घ्यावा,असे आवाहन महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र अमोल बळे यांनी केले आहे



**धाराशिव - धाराशिव शहरातील जगप्रसिद्ध सुफी संत हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी रहे यांचा उर्स १५ जानेवारीपासून सुरू होत आहे. या कालावधीमध्ये मिरवणुकीमध्ये डीजेला परवानगी देऊ नये यासाठी धाराशिव शहरातील मुस्लिम धर्मगुरूंच्या वतीने पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. शहरातील तरुणांनी डीजे न लावून सहकार्य करण्याचे आवाहन देखील मुस्लिम धर्मगुरूंच्या वतीने करण्यात आले आहे.**

## मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर शुगर) : गाळपास आलेल्या ऊसाची २ हजार ७०० रुपयांचा हप्ता खात्यावर जमा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**
सहकार महर्षी व महाराष्ट्राचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज कारखान्याचा गाळप हंगाम सन २०२४-२५ यशस्वीपणे चालु आहे. दि. १६ डिसेंबर अखेर कारखान्याचे गाळप ८२ हजार ४०० मेट्रीक टन झाले असुन साखर उत्पादन ८१ हजार ८०० क्विंटल इतके झाले आहे. सरासरी साखर उतारा १०.१८ टक्के इतका आहे. कारखान्याने दि. १ डिसेंबर ते १५ डिसेंबरपर्यंत या कालावधीत गाळपास आलेल्या ऊस बिलाचे पेमेंट एफआरपी पोटी प्रती मेट्रीक टन रु. २ हजार ७०० रुपयेप्रमाणे (दि.१८) रोजी ऊस पुरवठादार शेतकरी यांचे बँक खात्यात जमा होणार आहे याची सर्व ऊस पुरवठादार शेतकरी यांनी नोंद घ्यावी.

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शनानुसार शेतकऱ्यांच्या जिवनात आर्थीक उन्नती व्हावी व त्यांचा जिवनस्तर उंचावण्याचा सार्थ हेतु विचारात घेवुन कारखान्यामार्फत विविध ऊस विकास योजना राबविण्यात येत आहेत. शेतकरी हा केंद्र बिंदु समोर ठेवुन या कारखान्याची वाटचाल सुरु आहे. त्यामुळे जास्तीत जास्त या भागातील शेतकरी यांचा ऊस मांजरा कारखान्यास देण्याचा कल आहे. मांजरा कारखान्याची शेतकऱ्यांना वेळेवर ऊस दर अदा करण्याची परंपरा कायम ठेवत या कारखान्याने दि. १ डिसेंबर ते १५ डिसेंबरपर्यंत ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना प्रति मेट्रीक टन रु.२ हजार ७०० प्रमाणे ऊस बिलाची रक्कम आजरोजी बँकेत वर्ग करीत आहेत. त्यामुळे या भागातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्यास जास्तीत जास्त ऊस पुरवठा करुन सहकार्य करण्याचे आवाहन कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी केले.

## तेरणा अभियांत्रिकीच्या दोन विद्यार्थिनींची जलसंपदा विभागात निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**
येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचा दिवसेंदिवस नोकरीतील संधींचा आलेख वाढत असून नुकत्याच येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी या विभागातील दोन विद्यार्थिनींची सरळ सेवा भरती अंतर्गत जलसंपदा विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून निवड झाली आहे. स्थापत्य अभियांत्रिकीच्या प्रगती बिभीशन सिरसट आणि श्रद्धा सोमवंशी या दोन विद्यार्थिनींची जलसंपदा विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून निवड झाल्याचे पत्र त्यांना प्राप्त झालेले आहे.

मागील दोन वर्षांमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापत्य विभागाचे २० पेक्षा अधिक विद्यार्थी जलसंपदा, पंचायत समिती बांधकाम विभाग, नगरपरिषद अशा विविध शासकीय सेवेत मोठ्या हुद्द्यावर निवडून आज चांगल्या प्रकारे कार्य करत आहेत.

विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून चांगल्या हुद्द्यावर शासकीय सेवेत निवड व्हावी म्हणून महाविद्यालयाकडून व तसेच ट्रस्ट अंतर्गत तेरणा स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्राच्या वतीने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत त्यांच्या यशाबद्दल नुकताच महाविद्यालयाच्या वतीने दोघींचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विक्रमसिंह माने, स्थापत्य अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख प्रा.शितल पवार, प्रा.व्ही व्ही कोकाटे, प्रा.अमृता पिंपळे, सहाय्यक ग्रंथपाल बिबीशन सिरसट, प्रा.ए.ए.कदम, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, स्थापत्य अभियांत्रिकी सारख्या क्षेत्रात नोकरीच्या संधी अनेक असून विद्यार्थ्यांनी डिग्रीबरोबरच, कौशल्यावर आधारित असलेले विविध कोर्सेस महाविद्यालयांमध्ये सुरू असून तेही पूर्ण करावेत. स्थापत्य अभियांत्रिकी मधून सलग तीन-चार वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या शासकीय नौकरी मध्ये निवडीचे प्रमाणही वाढलेले आहे.

त्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले. या दोन विद्यार्थिनींच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, विश्वस्त आ.राणाजगजीतसिंह पाटील, विश्वस्त मल्हार पाटील, व्यवस्थापकीय समन्वयक प्रा.गणेश भातलवंडे यांनी दोघींचे विशेष अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.



## जयप्रकाश विद्यालयाच्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**
रुईभर येथील जयप्रकाश माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय येथील डॉजबॉल स्पर्धेत राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाल्यामुळे विद्यालयाच्या प्रांगणात प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

तालुका क्रीडा संकुल उदगीर विभागीय स्तरावरील डॉजबॉल स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये जयप्रकाश माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या तीन संघानी सहभाग नोंदवला होता. त्यात १९ वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूत अंकिता खंडाळकर, ऐश्वर्या जगताप, सायली घोडके, समीक्षा घोडके, स्वराली घोडके, अर्पिता घोडके, प्रज्ञा कोळगे, ऐश्वर्या गायकवाड, अंतरा कांबळे, आरती डावकरे, दीक्षा माने या सर्व खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. फेडरेशन तर्फे राष्ट्रीय स्तरावर निवड चाचणीसाठी आदर्श भांगे या खेळाडूंची निवड झाली आहे. तर राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी हुसेन तांबोळी, ओम पवार, वेदिका शिंदे, अमृता सूर्यवंशी या चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विभागीय स्तरावर विद्यालयाच्या आनखी दोन संघाची निवड झाली होती. त्यात १९ वर्षीय मुलांचा द्वितीय क्रमांक, १७ वर्षीय मुलींचा द्वितीय क्रमांक आला आहे. याही खेळाडूंचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या सर्व यशस्वी खेळाडूंना मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रा.प्रशांत कोळगे, अश्विनकुमार पवार, प्रा.सुधीर नाईकवाडी यांचाही सत्कार करण्यात आला.

# जिल्ह्यात एकही मंत्रीपद नाही; जिल्ह्याचा विकास खुंटणार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ डिसेंबर -**
मंत्रीमंडळ विस्तारात धाराशिव जिल्ह्याला भोपळा मिळाला असुन भाजपचे आ.राणाजगजितसिंह पाटील आणि शिवसेनेचे आमदार व माजी मंत्री डॉ.तानाजी सावंत या दोघांनाही यावेळी मंत्रीपदाची संधी मिळाली नाही. त्यामुळे जिल्ह्याला आता बाहेरचा पालकमंत्री मिळणार असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासकामावर याचा परिणाम होवून विकास खुंटण्याची शक्यता आहे.

राज्य मंत्रीमंडळाच्या विस्तारात यावेळी धाराशिव जिल्ह्यातुन महायुतीच्या दोन आमदारांपैकी एकाचीही वर्णी लागली नाही. वास्तविक पाहता यावेळी सलग दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन विजयी झालेले भाजपचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची मंत्रीमंडळात वर्णी लागणार असे सर्वांनाच खात्री वाटत होती. कारण येणाऱ्या नगरपालिका, जिल्हा परीषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये भाजपचे प्रामुख्याने महायुतीचा परफॉर्मन्स चांगला राहावा यासाठी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची मंत्रीमंडळात वर्णी लागण्याची दाट शक्यता होती.

त्याचबरोबर आमदार राणा जगजितसिंह पाटील हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असल्याने आमदार पाटील यांची मंत्री म्हणुन निवड निश्चित असल्याचे मानले जात होते. मात्र यामध्ये सर्वांचीच घोर निराशा झाली आहे. महायुतीच्या वरीष्ठ नेत्यांनी धाराशिव जिल्ह्याला मंत्रीपद न देऊन जिल्ह्यावर मोठा अन्याय केला आहे. कांही जिल्ह्यात चार, चार मंत्रीपद देण्यात आले आहे.





बीड जिल्ह्यात तर राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे व भाजपच्या पंकजाताई मुंडे या दोघांचीही राज्य मंत्रीमंडळात वर्णी लागली आहे.

धाराशिव जिल्ह्याला एखादे तरी मंत्रीपद मिळणे आवश्यक होते कारण जिल्ह्यातील आज अनेक विकासाचे प्रश्न मार्गी लागणे बाकी आहेत. त्याचबरोबर तुळजापुर तालुक्यात नळदुर्ग तालुका निर्मितीचा प्रश्न, औद्योगिक वसाहत उभारणीचा प्रश्न, कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पर्यटन आणि रोजगार निर्मितीसाठी २ हजार कोटी रुपयांचा सुधारीत तुळजापुर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, नळदुर्ग आणि तुळजापुर शहरात उभारण्यात येणारे महापुरुषांची भव्य स्मारके, नळदुर्ग येथे सकरण्यात येणारी राज्यातील पहिली भव्य बसवश्रुष्टी यासह अनेक कामे आज मार्गी लागण्याच्या मार्गांवर आहेत ही कामे पुर्ण होण्यासाठी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची मंत्रीपदावर वर्णी लागणे गरजेचे होते. मात्र आता ही संधी हुकली आहे.

तसे पाहता विकास कामांसाठी निधी आनण्यामध्ये आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा कुणी हात धरू शकणार नाही असे असले तरी मंत्री असल्यानंतर जी कामे लवकर होतात ती आता होऊ शकणार नाहीत. याची खंत जिल्हावासियांना आहे.

जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व राज्याचे आरोग्य मंत्री शिवसेनेचे आमदार डॉ. तानाजी सावंत यांचाही ऐनवेळी मंत्री पदातुन पत्ता कट झाला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अगदी जवळचे म्हणुन डॉ. तानाजी सावंत यांना ओळखले जात होते त्यामुळे शिवसेनेच्या कोट्यातुन डॉ. तानाजी सावंत हे नक्की मंत्री होणार याची शाश्वती होती मात्र तीही आशा आता मावळली आहे.

त्यामुळे धाराशिव जिल्हा आता मंत्र्याविना राहणार आहे. याचा फटका महायुतीला येणाऱ्या नगरपालिका, जिल्हा परीषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत मोठया प्रमाणात बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मंत्रीपद न मिळाल्यामुळे शिवसेनेचे डॉ. तानाजी सावंत सध्या प्रचंड नाराज आहेत त्यांची ही नाराजी शिवसेनेला महागात पडु शकते.

भाजपचे आमदार राणा जगजितसिंह पाटील व शिवसेनेचे आमदार डॉ. तानाजी सावंत या दोघांनाही मंत्रीपद न मिळाल्यामुळे जिल्ह्याचा विकास खुंटण्याची शक्यता आहे. या दोन नेत्यांना मंत्रीपद मिळाले नसल्यामुळे आता धाराशिव जिल्ह्याचा पालकमंत्री हा बाहेरचा असणार आहे. याचाही जिल्ह्याच्या विकास कामावर मोठा परीणाम होण्याची शक्यता आहे.

कारण ज्या पोटतीडकीने जिल्ह्यातला आमदार जिल्ह्याचा पालकमंत्री झाल्यानंतर जो जिल्ह्याचा विकास करण्याचा प्रयत्न करतो तसा प्रयत्न बाहेरचा पालकमंत्री करणार नाही. कारण त्यांना या जिल्ह्याशी कांही देणेघेणे नसते हे अनेकदा जिल्ह्याने अनुभवले आहे. त्याचीच आता पुनरावृत्ती होणार असल्याचे दिसुन येत आहे.

# दहा पटीने वाढणार पैठण शहराची हद्द

## सूचना हरकती घेण्यास सुरुवात

तभा वृत्तसेवा

पैठण दि १७ :- आतापर्यंत मृगजळ म्हणून वाटणाऱ्या पैठण शहर हद्दवाढी बाबत आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या प्रयत्नाने तसेच नगर परिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे यांच्या पाठपुराव्याने शासन दरबारी पैठण शहर हद्दवाढीचे प्रकरण पुढे सरकले असून नगर परिषदेने नवीन हद्दवाढीचा नकाशा प्रसिद्ध करून याबाबत नागरिकांच्या सूचना व हरकती ६० दिवसांच्याआत लेखी स्वरूपात मागितल्या आहेत.

नवीन प्रसिध्द झालेल्या नकाशानुसार पैठण शहराची सध्याची हद्द ही दहा पटीने वाढणार असून यात जवळपास १३ गावांच्या जागेचा पैठण शहरात समावेश होणार आहे.

पैठण शहराची हद्दवाढ होण्यासाठी आमदार विलास भुमरे यांच्या माध्यमातून मुख्यधिकारी संतोष आगळे यांनी नगरविकास विभागाकडे प्रस्ताव दिला होता. आता हद्दवाढ होणार असुन शहराचा विस्तार होणार आहे,पैठण शहरांतर्गत महसूल गावाचा समावेश या हद्दवाढीच्या मुळे होणार आहे. शहराची लोकसंख्या ५४ हजारच्या पुढे आहे. नगर परिषदेच्या स्थापनेनंतर एकदा ही शहराची हद्दवाढ झालेली नाही. तसेच नगर परिषद पैठणच्या बाहेर झपाट्याने विस्तार होत असून निवासी व वाणिज्य क्षेत्र निर्माण होत आहे. पैठण शहराच्या उत्पन्नाच्या दृष्टीने व वाढीव क्षेत्रातील नागरीकांना मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी होत असलेल्या अडचणी सोडवण्याकरीता नगर परिषदेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत हद्दवाढीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव अनेक वेळा सादर करण्यात आलेला होता. त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने खासदार संदिपान भुमरे यांच्याकडे मुख्यधिकारी संतोष आगळे यांनी नगरविकास विभागाकडे हद्दवाढीस मान्यता देणेबाबत पत्र दिले होते,त्यावर आता शहराचा विकास आराखडा तयार झाला आहे. पैठण शहराची हद्दवाढ होत आहे त्यामुळे शहर झपाट्याने वाढत असलेल्या वाढीव भागात आता नागरी सुविधा देण्यासाठी सोईचे होणार आहे. हद्दवाढी अभावी नवीन वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती, रस्ते अशा मूलभूत सुविधांअभावी नागरीकांची गैरसोय होत होती. मात्र, आता हद्दवाढ होवून शहर विकासाला गती मिळणार असून नगर परिषद कार्यालयातर्फे प्रसिद्ध करण्यात पैठण शहराच्या नवीन हद्दवाढी बाबत नागरिकांनी आपल्या सूचना व हरकती ६० दिवसांच्या आत नगर परिषदेकडे लेखी स्वरूपात द्याव्या असे आवाहन मुख्यधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे यांनी केले आहे.

**पैठण शहराची सध्याची हद्दवाढ ही दहा पटीने वाढणार असून ती मौजे वाघाडी शिव, पंथेवाडी शिव, आखातवाडा शिव, राहटगांव शिव, करंजखेड शिव, नारायणगांव शिव,कातत‍पूर शिव, वाहेगांव शिव, पावन गणपती नारळे शिव, जुने कावसन शिव, तेलवाडी शिव, चणकवाडी शिव, मौजे पाटेगांव शिव अशी गोलाकार पध्दतीने वाढवली जाणार आहे. यामुळे वरील अनेक गांव आणि गावांचा मोठा भाग पैठण शहराच्या हद्दवाढीत येऊन त्याठिकाणी विकास गंगा वाहणार आहे.**

# परतापूरवाडी येथील शेतकऱ्याच्या ११ शेळया दगावल्या



वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : गंगापूर तालुक्यातील परतापूर वाडी येथील शेतकरी वजीर शेख यांच्या ११ शेळया आज विषारी पदार्थ खाण्यात आल्याने दगावल्या आहेत. त्यांचे तब्बल ५५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, गंगापूर तालुक्यातील परतापूरवाडी येथील शेतकरी वजीर शेख हे त्यांच्याजवळील ११ शेळ्या चारण्यासाठी रानात गेले होते. यावेळी बकर्या रानात चरत असताना अचानक एकामागे एक ११ बकर्या जागेवर मरण पावल्या. त्यात ७ बोकूड व ४ शेळ्यांचा समावेश आहे. त्यांच्या बकर्या मेल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

यावेळी परतापूरवाडी येथील सरपंच अब्दुल पटेल यांना ही माहिती कळताच त्यांनी तात्काळ गाजगाव येथील पशूधन पर्यवेक्षक भालेराव यांना बोलावून घेतले भालेराव घटनास्थळी पोहचले तेव्हा सर्व शेळ्या मृत झाल्या होत्या. शेख वजीर यांचे जे पशूधन दगावले, त्यामुळे त्यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्यांना आम्ही शासकीय स्तरावर मदत मिळवून देण्यासाठी सहकार्य करणार असल्याचे सरपंच अब्दुल पटेल यांनी सांगितले.

**ज्वारीच्या कोवळ्या पिकातून अर्गट नावाचा पदार्थ तयार होतो, तो या शेळ्यांच्या खाण्यात आला असल्याचा संशय आहे, ज्वारीचे कोवळे रोप खाण्यात आल्याने किरळ लागल्याचे बोली भाषेत सांगितले जाते. मी घटनास्थळी ताबडतोब जाऊनही काही करता आले नाही, या मृत पावलेल्या शेळ्यांमध्ये ७ बोकूड व ४ शेळ्या आहेत.**

**डॉ. पी.एल. भालेराव**
**पशूधन पर्यवेक्षक, गाजगाव**

# ४५ वे वार्षिक पुष्पप्रदर्शन ८ व ९ फेब्रुवारी रोजी; सहभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर,दि.१७ (जिमाका):- सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग उपवने व उद्याने यांच्या वतीने शनिवार दि.९ व रविवार दि.९ फेब्रुवारी २०२५ रोजी ४५ व्या विभागीय वार्षिक पुष्पप्रदर्शन व उद्यान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत व प्रदर्शनात अधिकाधिक स्पर्धकांनी सहभाग घ्यावा,असे आवाहन सहायक संचालक जे. व्ही. चौगुले यांनी केले आहे.

या विभागीय वार्षिक पुष्पप्रदर्शनात गुलाबपुष्पे फुलदानातून, मोसमी फुले, बहुवार्षिय फुले, कॅक्टस व सकुलंट, कुंड्यातील शोभीवंत झाडे, लॅण्डस्केप ऑन द स्पॉट, कलात्मक पुष्परचना, उद्यान स्पर्धा इ. विभाग आहेत. प्रत्येक विभागातील विजेत्यास एक चषक, पुष्पप्रदर्शनात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या स्पर्धकास उपवने व उद्याने विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी पुरस्कृत केलेला फिरता चषक प्रदान करण्यात येईल. या स्पर्धेतील व सर्व गटांकरता वेगवेगळी परितोषिके ठेवण्यात आली आहेत. तसेच पुष्परचना, पुष्प रांगोळी या विभागासाठीही पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.अधिक माहितीसाठी सहायक संचालक जे. व्ही. चौगुले ८६९८०७०८८२, उद्यान अधीक्षक एस.टी. जाधव ९१७२५५९७९८ यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## रेश्मा चिमंद्रे यांची आज आकाशवाणीवर मुलाखत

छत्रपती सभाजीनगर, दि.१७(जिमाका):- जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीमती रेश्मा चिमंद्र यांची बुधवार दि.१८ रोजी एफ एम १०१.७ मेगा हर्ट्जवर आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन मुलाखत प्रसारित होणार आहे. सकाळी पावणे ११ वा. प्रासंगिक या सदरात ही मुलाखत प्रसारीत होणार असून माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास यांनी त्यांच्याशी बातचीत केली आहे. महिला व बालविकास विभागाच्या योजना पिंक ई-रिक्षा तसेच महिला सुरक्षा इ. विषयी या मुलाखतीत त्यांनी माहिती दिली आहे.

## सोळा वर्षीय तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

वाळूज महानगर (प्रतिनिधी): बजाजनगरातील एका सोळा वर्षीय शाळकरी मुलीने स्वतः च्या खोलीत गळफास लावत आत्महत्या केल्याची घटना रविवारी रात्री उघडकीस आली.



प्राची शिवराम झिंझुर्डे (वय १६, रा. न्यू गीतामाई हाउसिंग सोसायटी, बजाजनगर) असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे. ती दहावीत शिकत होती. प्राचीच्या आत्महत्येचे कारण अद्याप समोर आलेले नाही. रविवारी सुटीमुळे ती घरीच होती. तिच्या मोठ्या भावाचे लग्न जुळले असल्याने खरेदीसाठी आई, वडील, भाऊ शहरात आले होते. त्यांनी प्राचीला सोबत नेण्यासाठी आग्रह केला. मात्र ती घरी एकटीच थांबली होती. नंतर प्राचीने दुकानातून खाद्यपदार्थ आणले. त्यानंतर तिने गळफास घेतला, अशी माहिती नातेवाइकांनी दिली. या घटनेची नोंद वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात घेण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## सुमित देशपांडे यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर : सिडको महानगर १ येथील रहिवासी व ए एस आर कंपनी इंजिनियर या पदावर कार्यरत असलेले कै. सुमित दुर्गादासराव देशपांडे वय वर्ष ३४ यांचे कर्तव्यावर असताना हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी दोन वाजता अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी प्रेरणा सुमित देशपांडे एक मुलगी एक बंधू श्री सोहन दुर्गादासराव देशपांडे व वडील असा शोकाकुल परिवार आहे.

# श्री स्वामी समर्थ केंद्रात दत्त जयंती निमित्ताने अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाची सांगता





तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१७ डिसेंबर : येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे श्री दत्त जयंती निमित्ताने आयोजित अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सोहळा हजारो सेवेकर्यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला.

सप्ताहात श्री गणेश याग, स्वामी याग ,चंडी याग, रुद्र याग,असे विशेष याग सह, सर्व यज्ञाविधीची सेवा पूर्ण करून सप्ताहाच्या समाप्तीच्या वेळी, श्री सत्यदत्त व सर्व नाम जप करिता उपयोगात आलेल्या पूजेच्या साहित्यांची सांगता पूजा करून सप्ताहाची सेवा पूर्ण करण्यात आली. या सप्ताह मध्ये एकूण ११२ सेवेकरी श्री गुरुचरित्र पारायण करिता बसलेले होते. यात महिलांची संख्या अधिक प्रमाणत दिसून आली. केंद्राचे यंदाचे हे ४० वे वर्ष होते. सोमवार असल्याने श्री स्वामी समर्थ महाराजांना महादेवाच्या रुपात सजवण्यात आले होते.

यावेळी जालना जिल्हा प्रमुख झुंजारराव पाटील काकडे, गंगापूर तालुका प्रतिनिधी गोपीनाथ प्रधान, कर सल्लागार शांतीलाल जाधव , याज्ञिकी संदीप काटकर, अमोल चौसाळकर, सुभाष कहाटे, सुनीता शर्मा, सुनीता सोळके, सायली धुमाळ, सिंधुताई पाटील, योगेश पाटील, वाल्मीक टेमकर, कमलाकर वखारे, सतीश वाघचौरे, अरविंद लाळे, रमेश आसने, रवि पाटील,मंगेश शिंदे,बाप्पा वाडकर, अविनाश पाटील, आदी सेवेकर्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

झुंजारराव काकडे पाटील, जालना जिल्हा प्रमुख.-श्री स्वामी समर्थ केंद्रात सलग चाळीस वर्षापासून दत्त जयंती उत्सव साजरा करण्यात येतो यावेळी महिला सेवेकरींची लक्षणीय उपस्थिती होती. या कार्यक्रमात गुरुचरित्र पारायण नित्यसेवा अखंड नामजप, प्रहर सेवा आदी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# सोयगाव शहर 100% टक्के कडकडीत बंद



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ डिसेंबर

परभणी येथे घडलेल्या संविधान प्रतिकृतीच्या विटंबना प्रकरणी सोयगाव शहरात दि.१६ सोमवार रोजी विविध भिम सैनिकांच्या संघटना आणि राजकिय संघटनांच्या वतीने बंद पुकारण्यात आला होता.

संविधान प्रतिकृतीच्या विटंबना प्रकरणी सोयगाव तहसीलदार,सोयगाव पोलीस स्टेशनचे सपोनि यांना आंबेडकरी संघटनांच्या वतीने रविवारी (दि. १५ ) रोजी संतप्त होत निवेदन देत पुन्हा अशा घटना नये म्हणून त्या समाज कंठकावर कठोर कारवाई करण्यात यावी,निषेध व्यक्त करण्यासाठी सोमवारी सोयगाव शहर बंद ची हाक देण्यात आली होती.शासकीय कार्यालये,राज्य परिवहन महामंडळ, शाळा, महाविद्यालये,बॅंका,दवाखाने, औषध दुकाने वगळता व्यापारी वर्गाने उत्स्फूर्तपणे सर्व छोटे मोठे प्रतिष्ठान शंभर टक्के बंद ठेवून सहभाग घेतला होता. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भिम अनुयायांनी भारतीय संविधान,महात्मा ज्योतिबा फुले,छत्रपती शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाच्या प्रचंड घोषणाबाजी करुन परिसर दुमदुमून टाकला.यावेळी भरत पगारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (राजरत्न आंबेडकर ) सोयगाव तालुका अध्यक्ष,अंकुश पगारे रिपब्लिकन सेना( आनंद आंबेडकर) तालुका अध्यक्ष गणेश पगारे आर.पी.आय.(आठवले गट),रवींद्र काळे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सोयगाव शहर अध्यक्ष(शरद पवार गट) शिवसेनेचे संदिप चौधरी,राष्ट्रवादी काँग्रेसचे कृष्णा जुनघुरे पाटील,सुभाष सातदिवे,रूपचंद सोनवणे,मुकुंद वाहूळ,निवृत्त शिक्षक सुभाष जाधव,संजीवन सोनवणे, नगरसेवक दिपक पगारे,अजय नेरपगारे,राजू वानखेडे आदींनी चेयनसिंग बहुरे नायब तहसीलदार,पंकज बारवाल सपोनि यांना जनतेच्या भावना ह्या शासनास कळवण्याची विनंती करिता निवेदन दिले.

# दगडोजी महाविद्यालयात प्रकृती परीक्षण शिबिर संपन्न



वाळूज महानगर (प्रतिनिधी): भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या आदेशानुसार देश का प्रकृती परीक्षण हा राष्ट्रीय अभियान २६ नोव्हेंबर ते २६ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येत आहे. त्या अनुषगाने दगडोजीराव देशमुख महाविद्यालयांमध्ये १७ डिसेंबर रोजी प्रकृती परीक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचा लाभ जवळपास १४० विद्यार्थ्यांनी घेतला व परीक्षण करून घेतले. शिबिर प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राहुल हजारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी उपप्राचार्य डॉ संजय सांभाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनेश्वरी आयुर्वेदिक कॉलेज गेवराई तांडा पैठण येथील टीमने परिश्रम घेतले यामध्ये डॉ अभिजीत आहेर, वैष्णवी वटाणे, प्रसाद दहातोंडे, खुषी सौदेकर, विशाल उगले, समीक्षा चौकरे, वैष्णवी बेकारी, नेहा भोंडे आदींनी परीक्षण घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ भरतसिंग सलामपुरे यांनी मानले.

# मालपाणीज् बेकलाईट ने आत्तापर्यंत २५ कोटी क्रीमरोल्स बनवून गाठला ऐतिहासिक टप्पा




छत्रपती संभाजीनगर, १७ डिसेंबर २०२४ : खाद्यप्रक्रिया आणि बेकरी क्षेत्रातील अग्रगण्य व विश्वासपूर्ण ब्रॅंड असलेल्या मालपाणीज् बेकलाईट ने एक ऐतिहासिक टप्पा गाठला असून कंपनीच्या १९९९ स्थापना झाल्यापासुन २५ कोटी क्रिमरोल चे उत्पादन करून वेगाने वाटचाल करत आहे. बेकरी उद्योगक्षेत्रातील अग्रगण्य नाव असलेल्या पुण्यातील बेकलाईट फूड प्रोसेसिंग प्रा. लिमिटेड कंपनी ने बाजारपेठेत दोन दशकांपासून अधिक काळ कार्यरत आहे. ती ग्राहकांना पूर्णपणे शुद्ध शाकाहारी बेकरी उत्पादने पुरवते.

बेकरी क्षेत्रात १०० टक्के शुद्ध शाकाहारी उत्पादने उपलब्ध करून देण्याचे ध्येय घेऊन श्री. सचिन मालपाणी यांनी बेकरी व्यवसायात प्रवेश केला. अगदी आजही बेकरी उद्योग असंघटीत असून क्रिम रोल्स, खारी, टोस्ट, जीरा बटर अशी अनेक उत्पादने स्थानिक उत्पादक विकत आहेत. मात्र, या परिसराच्या अस्ताव्यस्त स्वरूपासोबतच स्वच्छतेचा अभाव, गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव अशी समस्याही निर्माण झाली आहे. हे क्षेत्र प्रामुख्याने अंडी आणि मांसाहारी उत्पादने तसेच इतर बेकरी उत्पादनांची विक्री करणाऱ्या बेकरीद्वारे नियंत्रित केले जाते. यामुळे, शाकाहारी लोकांसाठी बेकरी उत्पादने खरेदी करण्याचे पर्याय खूपच मर्यादित झाले आहेत.

या यशाबद्दल मत व्यक्त करत मालपाणीज् बेकलाईटचे व्यवस्थापकीय संचालक श्री.सचिन मालपाणी म्हणाले, क्रीम रोल फक्त डेझर्ट नसून आधुनिक विश्वातील समाधानाचे प्रतीक देखील आहे. शुध्द शाकाहारी उत्पादने लक्षात घेऊन आधुनिकता आणि परंपरेचा अनोखा मिलाफ असलेली उत्पादने भविष्यात बाजारात आणण्याची बेकेलाइटची योजना आहे. क्रीम रोल अद्वितीय स्वाद देण्यासोबत प्रसन्नतेचा अनुभव देतो आणि आपले मूळ व प्रियजनांशी असलेल्या संबंधाची आठवण करून देतो. अलिकडील काळात, क्रीम रोल्सकरिता आरोग्यदायी पर्यायांची मागणी वाढत आहे.

# "EmBossed Imprints' पुस्तकाला मोठा प्रतिसाद, लेखन करणारे सुंदरारमण गणपतिरामन, विप्रोचे सह-सीईओ




छत्रपती संभाजीनगर - सुंदरारमण गणपतिरामन, विप्रोचे अत्यंत आदरणीय सह-सीईओ, यांनी लिहिलेल्या EmBossed Imprints या पुस्तकाने त्याच्या प्रकाशनानंतर जगभरातील नेतृत्व, निर्णय घेणे, आणि संघटनात्मक वाढ यावर असलेल्या अद्वितीय दृष्टिकोनांसह नेत्यांना प्रेरित करत आहे. गेल्या आठवड्यात या पुस्तकाचे प्रकाशन झाल्यानंतर ते विविध उद्योगधंद्यांच्या नेत्यांकडून, कार्यकारी अधिकाऱ्यांकडून आणि वाचकांकडून अत्यंत प्रशंसा मिळवित आहे. त्यातले उपयोगी व अनुभवात्मक मार्गदर्शन आणि कृतीक्षम रणनीतींसाठी पुस्तकाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. ॲमेझॉनने याला हॉट न्यू रिलीजेस मध्ये व्यवसाय आणि आर्थिक श्रेणीत १४ व्या क्रमांकावर स्थान दिले आहे.

हे पुस्तक नेतृत्वावर एक मास्टरक्लास आहे, ज्यात लेखकाच्या ३० वर्षांहून अधिक काळातील औद्योगिक स्वयंचलन, उत्पादन, आणि जागतिक व्यवसाय नेतृत्वातील अनुभवाचा उपयोग केला आहे. सुंदरारमण गणपतिरामन यांनी विविध खंडांमध्ये बहु-कार्यात्मक संघांचे यशस्वी नेतृत्व केले आहे. त्यांचे रणनीतिक दृषटिकोन अनेक यशस्वी विलीनीकरणे, अधिग्रहणे आणि जागतिक पातळीवर उत्पादन उद्योगांचा जैविक विकास साधण्यास कारणीभूत ठरले आहेत. या पुस्तकाचे कौतुक केले आहे की ते नेतृत्व कसे प्रामाणिकपणे करावे, नवोन्मेष कसा वाढवावा आणि उच्च कार्यक्षम संघ कसे निर्माण करावे यावर खोलवर प्रकाश टाकते.

EmBossed Imprints हे नेतृत्वाच्या जगात एक परिवर्तनात्मक प्रवास आहे, जे आपल्याला आपल्या स्वतः च्या अनुभवांवर विचार करण्यास आणि आपल्या करिअरला आकार देणाऱ्या अपूर्व गुणांची ओळख करून देण्यास आमंत्रित करते. औद्योगिक क्षेत्रात ३५ वर्षांच्या अनुभवावर आधारित हे पुस्तक व्यक्तिगत गोष्टींची आणि उपयोगी दृष्टिकोनांची एक अनोखी मिसळ आहे, जी आपल्याला आपल्या नेतृत्वाच्या क्षमतेला ओळखण्यास आणि विकसित करण्यास सक्षम करते.

२६ समर्पित वर्कशीट्सच्या माध्यमातून, आपण नेतृत्वाच्या विविध गुणांची तपासणी करू शकता, उदाहरणार्थ प्रामाणिकपणा आणि उत्कंठा, आणि ते कसे आपल्या सभोवतालच्या लोकांद्वारे उलगडले जातात हे समजू शकता. आपले स्वतःचे अनुभव आणि इतरांच्या प्रेरणादायी गोष्टींवर विचार करून, आपल्याला नेतृत्वाचे एक गहन ज्ञान मिळेल आणि आपली क्षमता अनलॉक करणे, ज्यामुळे आपल्याला दीर्घकालिक परिणाम साधता येईल.

स्वत:ची ओळख आणि वैयक्तिक विकासावर लक्ष केंद्रित करत, EmBossed Imprints हे प्रत्येकासाठी अनिवार्य वाचन आहे, ज्यांना त्यांचे नेतृत्व कौशल्य सुधारायचे आहे आणि स्वतःचे सर्वोत्तम रूप बनवायचे आहे.

# निरोगी आरोग्यासाठी अध्ययनासोबत क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घ्या

## जि.प.चे सीईओ मीना यांचा विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला



तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.१७ डिसेंबर - तालुक्यातील भिलदरी, पिशोर ता. कन्नड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित शालेयस्तर विद्यार्थी व पालक क्रीडा स्पर्धा २०२४ चे उद्घाटन सोमवारी दि.१६ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांच्या हस्ते करण्यात आले. सुदृढ आरोग्यासाठी क्रीडा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी व्हा, असे आवाहन मीना यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

भिलदरी, पिशोर येथील प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात लेझीम पथकासह बैलगाडीतून मिरवणूक काढून सीईओ मीना यांचे स्वागत करण्यात आले.

क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनानंतर लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या अभ्यासिकेची मीना यांनी पाहणी केली. राबविलेल्या उपक्रमाबद्दल शाळेतील शिक्षक, ग्रामस्थ व स्पर्धेत सहभाग घेतलेल्या पालकांचे त्यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांनी निरोगी आरोग्यासाठी अध्ययनासोबत क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेण्याचे आवाहन मीना यांनी याप्रसंगी केले.

या वेळी गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने,नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे, गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे, शिक्षणाधिकारी (प्रा) जयश्री चव्हाण, गटशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ, विस्तार अधिकारी संगीता सावळे, टी डी शिंदे, सरपंच शोभा कोटवाळ, केंद्रप्रमुख कोटावळे, मुख्याध्यापक डी. डी. चिंतामणी, शिक्षक कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वातावरणाचा 'पारा' घसरला; बीडकर गारठले!





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

बीडच्या तापमानाचा पारा १० अंशांच्या खाली आला आहे. रविवार (ता.१५) रोजी शहरात ९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.जिल्ह्यात गारवा वाढला असून बीडकर गारठले आहेत. पुढील तीन दिवस जिल्ह्यात थंडीचा जोर कायम राहणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

मागील चार-पाच दिवसांपासून थंडीचा जोर पुन्हा वाढला असून ६६ अंगातील हुडकुडी स्वेटर-मफलर वापरूनही जात नाही. अंगातील हुडहुडी घालवण्यासाठी शेक घेतल्याशिवाय पर्याय नाही. शेकोटीच्या गर्मीन अंगातील हुडहुडी जाते. शेकोटी पेटवल्यावर गल्लीतील आबालवृद्ध तापण्यासाठी गर्दी करतात.

हिवाळा सुरू होऊन अनेक दिवस लोटले, एक-दोन दिवस सोडले, तर विशेष हु म्हणावी अशी थंडी जाणवत नव्हती. त्यात मध्येच ढगाळ वातावरणामुळे उन्हाळ्यासारखी गों जाणवू लागली. मध्यंतरी एक दिवस बीड शहरांमध्ये हलक्या स्वरूपाचा पाऊसही पडला होता. डिसेंबर महिना अर्ध्यावर आला तरी जणू थंडी नाही,

सेल्सिअसखाली गेला आहे. त्यामुळे सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे आढळून येते. सकाळच्या टप्प्यात शाळेत जाणाऱ्या विद्यार्थी तसेच ग्रामीण भागातून भाजीपाला तसेच वस्तू घेऊन येणाऱ्या नागरिकांनाही या थंडीचा सामना करावा लागत आहे.

# आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या क्रीडा स्पर्धा

## विद्यार्थी व पालकांचा स्पर्धेत उत्साहपूर्वक सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**



दि.१४ आणि १५ डिसेंबर रोजी आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूल, माजलगाव येथे क्रीडा स्पर्धांचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांसह पालकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

डक वॉक, लेमन स्पून रेस, रनिंग रेस, चेन ब्रेक, ऑक्टोपस रेस अशा विविध प्रकारच्या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचे कौशल्य आणि ऊर्जा दिसून आली. विद्यार्थ्यांप्रमाणेच पालकांसाठीही खास क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये पालकांनीही तितक्याच जोमाने भाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता लाटे मॅडम आणि पूनम ललवाणी मॅडम यांनी कौशल्याने केले. शाळेच्या संस्थापक भाग्यश्री करवा मॅडम आणि संचालक सागर करवा यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व आणि जीवनात खेळांचे स्थान याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शिक्षक वृंदांनी अत्यंत चोखपणे आणि उत्कृष्ट पद्धतीने केले. ही क्रीडा स्पर्धा शाळेच्या एकत्रित कार्यक्षमतेचे आणि विद्यार्थी-पालकांच्या सक्रिय सहभागाचे उत्तम उदाहरण ठरली.



परभणी येथील दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी या भिमसैनिकाला पोलिसांनी अमानूष मारहाण केल्यामुळे त्याचा मृत्यू झाला आहे. मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर ३०२ चा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपीना तात्काळ अटक करण्यात यावी. या दोन्ही प्रकरणाची एसआयटी मार्फत सखोल चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी. या मागणीकरिता मंगळवार (ता.१७) रोजी रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हाअधिकारी कार्यालयावर तिव्र आंदोलन करण्यात आले.

# दत्त संस्थान बालाघाटावर गोमाता पूजन व धार्मिक कार्यक्रमाने दत्त जन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथील संस्थांवर परमपूज्य सद्गुरु प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने श्री दत्त जयंती उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला .

दत्त संस्थांवर संपूर्ण दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये दुपारी बारा वाजता दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला यानंतर महा अभिषेक दत्त व महादेवाला दुग्धाभिषेक करण्यात आला. यानंतर दत्त जन्मानिमित्त महिलांनी पाळणा गायन केले. याबरोबरच गोमातेला गोग्रास देऊन गोमातेची पूजा करण्यात आली. या दत्त जन्मोत्सवानिमित्त सती अनुसयाची उत्कृष्ट झाकी तयार करण्यात आली होती.या झाकी मध्ये सती अनुसयाच्या वेशभूषा कु. प्रार्थना अमोल ढास ने सहभाग नोंदविला. या कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमाला बालाघाटावरील कपिलधारवाडी, मांजरसुंबा, कोळवाडी ,उदंड वडगाव (शिवाजीनगर), ससेवाडी आदी परिसरातील व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय भक्ती भावाने व आनंदी वातावरणामध्ये श्रीदत्त जन्मोत्सव उत्सव मोठ्या थाटात



साजरा करण्यात आला यावेळी दत्त उपासक श्रीहरी वैजनाथ महाराज यांनी मान्यवरांचे स्वागत केले या कार्यक्रमाला संपूर्ण शिंदे परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

# ड्रोन खरेदी अर्थसहाय्य योजनेसाठी आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

कृषी क्षेत्रात ड्रोन (मानव विरहीत वायू यान) च्या वापरास पुरेश्या संधी असून सद्य स्थितीत त्याचा विविध पिकांच्या वाढीच्या अवस्थेत कीटक नाशके, सूक्ष्म मुलद्रव्ये, विद्राव्य खते फवारणी या बाबी व्यतिरिक्त कृषी क्षेत्राशी निगडीत इतर कामासाठी देखील वापर करता येऊ शकतो. ड्रोन वापरामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात, वेळेत व श्रमात बचत होऊन रोजगार निर्मिती होऊ शकते.त्यामुळे केंद्र शासन पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान या योजने अंतर्गत ड्रोन या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

सन २०२४-२५ साठी कृषी यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत ड्रोन खरेदीसाठी अर्थसहाय्य या घटकासाठी १०० ड्रोनचा महाराष्ट्र राज्य साठी वार्षिक कृती आराखडा मंजूर करण्यात आलेला असून त्यासाठी शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था तसेच कृषी व तत्सम पदवीधर लाभार्थी यांना अर्ज करता येतो.

शेतकरी/संस्था/कंपनी/पदवीधर अनुदान मर्यादा शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था इ. ४० टक्के अनुदान रक्कम ४.०० लाख मार्गदर्शक सूचनेनुसार किसान ड्रोन व त्याचे संलग्न जोडणी साहित्य याची जी मूळ/वास्तविक किंमत असेल त्यापैकी जे कमी असेल ते अनुदान रक्कम देय राहील.कृषी व तत्सम पदवीधर ५०टक्के अनुदान रक्कम ५.०० लाख अ.जा./अ.ज/ लहान व सिमांतिक/महिला शेतकरी ५० टक्के अनुदान रक्कम ५.०० लाख सर्वसाधारण शेतकरी ४० टक्के अनुदान रक्कम ४.०० लाख आयुक्त, कृषी यांचे निर्देशान्वये ड्रोन या घटकासाठी ऑफलाईन अर्ज न करता इतर औजारांप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर लॉगइन करून अर्ज करावेत.

कृषि यांत्रिकीकराण - मुख्य घटक - भाडे तत्वावरील सेवा सुविधा केंद्र या घटकामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.त्यामुळे सन २०२४-२४ मध्ये ड्रोन हा घटक ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्यामुळे शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था व कृषी व तत्सम पदवीधर यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.ov.in/Farmer या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत.तसेच अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त अर्ज सादर करून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, , बीड यांनी केले आहे.

# वाहनांची नवी मालिका येणार पसंती क्रमांकासाठी अर्ज करावे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

परिवहनेत्र दूचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका MH23BL ही सद्यस्थितीत सुरू असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहे. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी चक्र२३इच् ०००१ ते ९९९९ ही मालिका दिनांक ३० डिसेंबर २०२४ पासून सुरु करण्यात येणार आहे.


ज्या वाहनधारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावायचा असेल त्यांनी आपला विहित नमुन्यातील अर्ज आकर्षक क्रमांकला लागू असलेली फीच्या रकमेचा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बीड यांच्या नावाचा धनादेश डी.डी व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतिसह दिनांक १७ डिसेंबर २०२४ ते २४ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी २.०० पर्यंत कॅश काउंटर खिडकी क्रमांक २ वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांचे परिपत्रिकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी ४.०० वाजता प्रसिद्ध करण्यात येईल. दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी एकपेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी १.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मूळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता लिलावाची विहित कार्यपद्धती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी,नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, स्वप्निल माने यांनी केले आहे.

# मस्साजोग प्रकरणात खा.बजरंग सोनवणेंनी उठविला संसदेत आवाज

## कायदा तुडविणाऱ्या गुंडगिरीला फाशी द्या

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी अपहरण करुन त्यांना टॉर्चर करत क्रूरपणे हत्या केली आहे. सदरील हत्या प्रकरण देशातील कायदा व सुव्यवस्थेवर झालेला मोठा आघात आहे. त्यामुळे या घटनेतील दोषींना फाशी देण्यात यावी.असा आवाज खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत सोमवार (ता.१६) रोजी उठविला आहे. दरम्यान मस्साजोग प्रकरणाचा संसदेत आवाज उठविल्याने या घटनेचा तपास पारदर्शक आणि कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता होणार आहे.खा.बजरंग सोनवणेंनी संसदेत प्रश्न उपस्थित केल्याने मस्साजोग प्रकरणातील मास्टर माईंडचे धाबे दणाणले आहेत.



मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्येनंतर बीड जिल्ह्याचे सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे.या घटनेतील सर्व आरोपींना फाशी देण्यात यावी, यासाठी जिल्ह्यात मोर्चे, निवेदने, गावबंद आंदोलने सुरु आहेत.बीड जिल्ह्यात काही राजकीय लोकांनी गुंडगिरीचा उच्चांक गाठला आहे. सत्तेच्या जोरावर गुंडगिरी पोसून सामाजिक सलोखा बाधित केला जात आहे.एवढेच नाही तर खंडणीसारखे गुन्हे दाखल होवूनही पोलिसांकडून आरोपींना अटक केली जात नाही.संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्यानंतर केज पोलिसांना त्याची तातडीने माहिती देण्यात आली होती. परंतु केज पोलिसांकडून हलगर्जीपणा करण्यात आला. या घटनेचे गंभीर्य घेतले असते तर संतोष देशमुख यांची हत्या झाली नसती.बीडचे पोलीस नेमके कोणाच्या इशाऱ्यावर चालत आहेत.या सर्व बाबींचा कसून तपास होणे गरजेचे आहे. कारण त्याशिवाय हत्येचा मास्टर माईंड कोण आहे? उघड होणार नाही. बीडमध्ये नुकत्याच पार पडलेल्या निवडणूकांमध्ये गुंडगिरी प्रवृत्तीच्या लोकांनी अक्षरशः कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे उडविले होते. संतोष देशमुख यांची हत्या देखील याचं गुंड मानसिकतेतून झाली आहे. त्यामुळे या घटनेतील एकही आरोपी फाशीच्या शिक्षेतून वगळला जाऊ नये. त्यासाठी तपास अतिशय पारदर्शकपणे करण्यात यावा. असा प्रश्न खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत उपस्थित केला आहे.

# घाटनांदूर येथे रेल्वे गाड्या थांबवा

## खा.बजरंग सोनवणेंनी दिले रेल्वे बोर्ड अध्यक्षांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**



जिल्ह्यातील घाटनांदूर रेल्वे स्थानक, सामान्य प्रवाशी आणि मालवाहतूक करण्यासाठी महत्वाचे स्थानक आहे. परंतू या रेल्वे स्थानकावर गेल्या काही दिवसांपासून रेल्वे गाड्या थांबविणे बंद झाले आहे.परिणामी घाटनांदूर भागातील नागरिकांना रेल्वे स्थानक असताना देखील फायदा होत नाही.त्यामुळे घाटनांदूर मार्गावरुन धावणाऱ्या रेल्वे थांबविण्यात याव्यात, आशा मागणीचे निवेदन खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे बोर्डाचे केंद्रीय अध्यक्ष सतीश कुमार, रेल्वेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्ली येथे भेट घेवून सोमवार (ता.१६) रोजी दिले आहे. त्यामुळे घाटनांदूर परिसरातील जनतेची अडचण दूर होणार आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील रेल्वे स्थानक सार्वजनिक वाहतूकीसाठी परळी ते लातूर दरम्यान महत्वाचे स्थानक आहे. कोविड-१९ महामारीपूर्वी औरंगाबाद-गुंटूर आणि नांदेड-बंगलोर गाड्या नियमितपणे घाटनंदूर येथे थांबत होत्या. परंतु नंतर थांबणे थांबवले गेले. घाटनंदूर आणि त्या परिसरातील नागरिकांसाठी असुविधाजनक आहे.त्यामुळे या ठिकाणी रेल्वे गाड्या थांबविण्याच्या सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे केली.

घाटनंदूर येथे रेल्वे स्थानकावर या गाड्या थांबविण्याची मागणी

घाटनांदूर रेल्वे स्थानक येथे औरंगाबाद-गुंटूर: ट्रेन क्र. १७२५४, गुंटूर - औरंगाबाद: ट्रेन क्र. १७२५३,बंगलोर - नांदेड: ट्रेन क्र. १६५९३, नांदेड - बंगलोर: ट्रेन क्र. १६५९४, नांदेड - पनवेल: ट्रेन क्र. १७६१४, पनवेल - नांदेड: ट्रेन क्र. १७६१३ या रेल्वे थांबविण्यात याव्यात अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मांजरा प्रकल्पातील पाच टक्के पाणी संपले

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-** लातूरसह तीन जिल्ह्यांतील अनेक शहरे, शेकडो खेडी यांना पिण्यासह शेतीला सिंचनासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा प्रकल्पातील ५ टक्के पाणी आतापर्यंत संपले आहे. अवघ्या एका महिन्यात प्रकल्पातील तब्बल ९ दलघमी पाणी कमी झाले आहे. या प्रकल्पात सध्या ९५ टक्के पाणीसाठा आहे. तो २१५ दलघमी एवढा आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरले तेव्हा २२४ दलघमी पाणीसाठा होता.

केज तालुक्यातील धनेगाव येथे मांजरा नदीवर लातूर, बीड व धाराशिव जिल्ह्यांत सर्वात मोठा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पातून लातूर शहरासह, एमआयडीसी, अंबाजोगाई, कळंब या मोठ्या शहरांना पिण्यासाठी पाणीपुरवठा होतो. त्याचबरोबर तीन जिल्ह्यांतील शेकडो खेड्यांनाही पाणीपुरवठा होतो. हजारो हेक्टर शेती सिंचनाखाली आली आहे. यामुळे हा प्रकल्प अवर्षणप्रवण क्षेत्रात येत असल्याने दर दोन वर्षांआड येथे दुष्काळी स्थिती निर्माण होते. यामुळे प्रकल्प दरवर्षी भरत नाही. यावर्षी प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे. २२ नोव्हेंबरपर्यंत प्रकल्पात १०० टक्के पाणीसाठा होता. त्यानंतर पाणी कमी होण्यास सुरुवात झाली. त्यानंतर झपाट्याने पाणी कमी होत आहे. आतापर्यंतच्या एका महिन्याच्या कालावधीत तब्बल ९ दलघमी पाणीसाठा कमी झाला आहे. म्हणजेच पाच टक्के पाणी घटले आहे. या प्रकल्पात सध्या २१५ दलघमी पाणीसाठा आहे. याची टक्केवारी ९५ एवढी आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### क्रीडा दिन उत्साहात; विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
परिसरातील लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी धनंजय कुलकर्णी, आशा कुलकर्णी, कैलास पंडित, रजनी पंडित, नितीन पुजारी, शरद गोरे, गजानन कापसे, शेवंता कापसे, ओमराजे राठोड, पूजा राठोड, अमृता खरोसे, नीलेश वडेकर, आरती वडेकर, सविता पसारे, सुनीता इकिले, श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, प्राचार्या रूपाली कुलकर्णी, समन्वयक रौफ शेख, संगीता शेटे यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. यशराज राठोड, अन्वी कापसे, आयुष वडेकर, सात्विक पंडित, सानवी पसारे, आयुष इकिले, आराध्या लाड, मयूर जटाळ, प्रांजल आकुसकर, सुदर्शन कुरे, सार्थक इघारे, मानसी सुकणे, वैष्णवी वाकुरे या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. सूत्रसंचालन रूपाली कोकाटे यांनी केले. आभार कविता लाटे यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेबरोबर विविध कलागुणांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी झालेल्या कलागुणांचे कौतुक झाले.

### महादेवनगरात दत्त जन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-** शहरातील महादेव भागातील दत्त मंदिरात दत्त जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त दत्त मूर्तीचा अभिषेक, दत्त चारित्र्य ग्रंथाचे सामूहिक वाचन, तसेच दत्त पादुका पालखीची मिरवणूक काढण्यात आली. दुपारी पाळणा म्हणत भक्तिमय वातावरणात गुलालाची उधळण करण्यात आली. यावेळी घुगऱ्या व सुंठवडा वाटप करण्यात आला. दत्तकृपा महिला भजनी मंडळाच्या वतीने भजन सादर करण्यात आले. त्यानंतर, भाविकांसाठी महाप्रसाद वाटप करण्यात आले. जयंतीच्या यशस्वितेसाठी मंदिर देवस्थान समितीचे गंगाधर गंगणे, तेजस राठोड, गणेश फिस्के, गंगाधर बाबर, बब्रुवान तुडमे, गोवर्धन गंगणे, बाबूराव कुंभार, हभप पुंडलिक महाराज, उमेश फिस्के, चंद्रकांत घोडके, रामेश्वर घोलप, सूरज गंगणे, नागेश पवार, व्यंकट टोगंळे, राम पांढरे, केवळबाई घोलप, अनिताताई तुडमे, रूपाबाई घोलप, केशरबाई कांबळे, कविता जगताप, नंदाबाई मुळे आदींची उपस्थिती होती.

### विष्णू बनसोडे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
शहरातील राजीव गांधी चौक परिसरातील संत ज्ञानेश्वरनगर भागातील प्लंबर विष्णू कृष्णाजी बनसोडे (वय ७५) यांचे सायंकाळी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी खाडगाव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मागील तीन तपांपासून ते नळ कारागीर म्हणून या परिसरात सुपरिचित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून, जावई आणि नातवंडे असा मोठा आहे.

### हुसेन यांना 'दयानंद'मध्ये श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
भारतीय संगीतात ज्यांनी मोलाचे योगदान दिले, भारतीय संगीताची पताका साऱ्या विश्वात फडकवत ठेवली असे जगविख्यात तबला वादक उस्ताद झाकीर हुसेन यांचे सॅन फ्रान्सिस्को येथे निधन झाले. त्यानिमित्ताने दयानंद कला महाविद्यालयाच्या संगीत विभागात भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, संगीत विभाग प्रमुख डॉ देवेंद्र कुलकर्णी, डॉ. संदीपान जगदाळे आणि संगीत विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. डॉ संदीपान जगदाळे यांनी उस्ताद झाकीर हुसेन यांच्या बद्दलची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

### औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र मॉडेल करिअर सेंटर व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार १९ डिसेंबर,२०२४ रोजी सकाळी १० वाजता लातूर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या रोजगार मेळाव्यात रोजगार देणारे १४ पेक्षा जास्त आस्थापना, उद्योजक यांनी ४१० रिक्त पदे अधिसूचित केली आहेत.सर्व नामांकीत कंपनीतील उद्योजकांची रिक्तपदे निहाय इच्छूक उमेदवारांनी १९ डिसेंबर, रोजी सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, येथे उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## लातूरसह राज्यातील कोलमडलेली स्वस्त धान्य यंत्रणा सुरळीत करा

### माजी आमदार धीरज देशमुख यांची राज्य सरकारकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
लातूर ग्रामीण सह लातूर जिल्ह्यातील आणि राज्यातील अनेक भागात स्वस्त धान्य दुकानातील ई- पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने धान्य वितरण व्यवस्था पूर्णतः कोलमडली आहे. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने या प्रश्नात लक्ष घालून धान्य वितरण यंत्रणा सुरळीत करावी, अशी मागणी माजी आमदार धिरज देशमुख यांनी केली.

गेल्या महिनाभरापासून स्वस्त धान्य दुकानातील ई- पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झालेला आहे. त्यामुळे धान्य असूनही त्याचे वितरण करता येत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. याचा प्रचंड मनस्ताप लातूर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. याबाबत लातूर ग्रामीण मधून सर्वसामान्यांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. या पार्श्वभूमीवर माजी आमदार धिरज देशमुख यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे या विषयाकडे लक्ष वेधले.



लातूर ग्रामीण मधील रेणापूर, लातूर, औसा तालुक्यातील गावातून स्वस्त धान्य दुकानातील ई- पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याच्या तक्रारी येत आहेत. लातूर जिल्ह्यात आणि राज्यात गेल्या दोन - तीन आठवड्यापासून स्वस्त धान्य दुकानातील ई पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाला असल्याने धान्य वितरण ठप्प असल्याचे स्पष्टीकरण येथील शासकीय अधिकारी देत आहेत असे त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

## लातूर जिल्ह्याला भरली हुडहुडी !

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-** लातूर जिल्ह्याला हुडहुडी भरली असून सर्वत्र शेकोट्या पेटताना दिसत आहेत. कर्नाटक सिमेवर असलेल्या औराद शहाजानी परिसरात दि. १६ डिसेंबर रोजी किमान तापमान ६ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले. दरम्यान हे तापमान हिमाचल प्रदेशातील शिमला सारखेच असल्याचे नोंदवले गेले.

औरादसह परिसर थंडीने गारठला आहे. गारठा वाढल्याने थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार वस्त्र परिधान करीत शेकोट्या पेटविल्या जात आहेत. यावर्षी पहिल्यांदाच पारा ६ अंश सेल्सिअस इतका कमी झाल्याची नोंद येथील हवामान केंद्रात झाली आहे, अशी माहिती हवामान मापक मुक्रम नाईकवाडे यांनी दिली. आजुबाजूच्या परिसरामध्ये सरासरीपेक्षा जास्त अधिकचा पाऊस झाला. या जास्त झालेल्या पावसामुळे या भागातील नदी, नाले, साठवण तलाव भरून वाहत आहेत. त्यामुळे या भागातील शेतकरी आज रोजी शेतीला पाणी देण्याची कामे जोमात सुरु आहेत त्यामुळे संपूर्ण परीसरात सध्या थंडगार बातावरण निर्माण झालेले आहे आणि अशातच वातावरण बदल झाल्यामुळे रात्रीच्या वेळी सुटलेले वारे थंडगार गारट्याप्रमाणे लागत आहे आणि सकाळी पाण्याचे धुई पडत असल्याने थंडगार वातावरण निर्माण होत आहे. त्यामुळे दिवस मावळला की थंडगार गारठा सुटत आहे आणि सकाळी दहा वाजेपर्यंत थंडीची हुडहुडी राहत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना या थंडीमुळे भरपूर त्रास होत असल्याचे दिसून येत आहे.

### औराद शहाजानीचा पारा @ ६

दरम्यान मागच्या आठ दिवसांपासून दररोज थंडीचे प्रमाण वाढत असल्यामुळे जिल्ह्यात सर्वत्र शेकोट्या पेठताना दिसत आहेत.

या थंडीचे वातावरण पिकांसाठी पोषक असले तरी अती थंडी सुध्दा रब्बी पिकांचे नुकसान करण्यासाठी सुध्दा कारणीभूत ठरु शकेल याचीही दाट शक्यता नाकारता येणार नाही असा इशारा हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. सध्या नोव्हेंबर महिना सुरू असून, पुढील २ महिन्यांत थंडी राहणार आहे. परिणामी, पिकांनाही याचा फटका बसणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान थंडीमुळे रात्री लवकर बाजारपेठ ठप्प होत असताना दिसत आहे.

## पुढल्या वर्षी जिल्ह्याला इलेक्ट्रिक बसेस मिळणार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
पुढच्या वर्षी लातूर जिल्ह्याला इलेक्ट्रिक बसेस मिळण्याची शक्यता असल्याचे येथील एस. टी. महामंडळाच्या सूत्रांनी सांगितले.

प्रदूषण टाळण्यासाठी तसेच विंधन उपयोग थांबविण्यासाठी इलेक्ट्रिक बसेसची गरज आहे. एस. टी. महामंडळाचा विंधनावर फारच खर्च होतो. हे टाळण्यासाठी आणि प्रदूषण रोखण्यासाठी इलेक्ट्रिक बसेसची गरज आहे. सध्या असलेल्या बसेस विंधनावर धावतात. या बसेसची संख्या कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक बसेसची गरज आहे. आता इलेक्ट्रिक वाहनांचा जमाना सुरू झाला असून, लातूर जिल्ह्यातील सहा आगारात सुमारे पाचशे बसेस आहेत. या सर्व बसेस डिझेलवर धावतात. या इलेक्ट्रिकवर केल्या नंतर विंधनाचा मोठा खर्च वाचणार आहे. मोठ्या शहरांमध्ये इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्या आहेत. आता छोट्या शहरांना इलेक्ट्रिक बसेस एस. टी. महामंडळ पुरवणार आहे. येत्या एप्रिल महिन्यापर्यंत या बसेस मिळतील, असा अंदाज आहे.

लातूर एस. टी. महामंडळाचा व्यवसाय देखील चांगला आहे. परंतु, येथील एस. टी. सेवा महामंडळाच्या दुय्यम श्रेणीत मोडणारी असल्याने जे जे नवे ते अगोदर मोठ्या शहरांना. नंतर छोट्या शहरांना असा महामंडळाचा सिरस्ता असल्याने त्यास आपण काहीच करू शकत नाही. मात्र, लातूर एस. टी. महामंडळास लवकरात लवकर इलेक्ट्रिक बसेस पुरवाव्यात, अशी प्रवाशांची देखील मागणी आहे.

## ग्रामीणच्या तुलनेत शहरी भागात टीबी रुग्ण अधिक

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात टीबी (क्षयरोग) रूग्ण अधिक सापडतात. लातूर जिल्ह्यात दरवर्षी ३ हजार टीबी रूग्ण आढळून येतात. हे प्रमाण रोखण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत शंभर दिवसीय क्षयरोग रूग्ण शोध मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर, सोमवारी जिल्हा परिषदेच्या स्थायी सभागृहात जिल्हा क्षयरोग कार्यालय, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, कार्यक्रम समन्वयक यांना प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी



अधिकारी अस्लम तडवी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) बाळासाहेब वाघ, शिक्षणाधिकारी (प्रा.) वंदना फुटाणे, पाणी पुरवठ्याचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, नरेगाचे बीडीओ संतोष माने, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरूरे, आरएमओ डॉ. सारडा, मनपाचे निवासी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. रमेश बगडे. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे, वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अलका बांगर, डॉ. सम्यक खैरे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी तालुका अधिकारी व अन्य विभागांचे डॉक्टर, तज्ज्ञ उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना सामूहिक निक्षय शपथ देण्यात आत्नी मख्य कार्यकारी अधिकारी सागर यांनी उपस्थित सर्व वैद्यकीय अधीक्षक, तालुका अधिकारी, वैद्यकीय अधिकाऱ्यांना शंभर दिवस क्षयरोग मोहिमेच्या संदर्भात, जनजागती शेतकरी त्यांना धान्य द्यायचे. त्याकाळात पैशाला फारसे महत्व नव्हते. परंतु, यांत्रिकीकरणाच्या युगात पैशालाच खुप महत्व आले असून, आता ग्रामीण भागातील बलतेदारी पध्दत बंद पडल्यागत झाली आहे. सर्वच शेतकरी लोखंडी अवजारे वापरू लागली आहे. त्यात शेतीकामे यंत्रावर करीत आहेत. त्यामुळे या कलावंतांना काही काम शिल्लक राहिले नाही. परंतु, उमरगा यल्लादेवी येथील भागवत पांचाळ या हरहुन्नरी कलाकाराने हार न मानता लाकडापासून आकर्षक अशा बैलगाडीसह अन्य खेळण्या बनविण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी गावातच काही जणांनी खेळणी बनवून दिली. त्यानंतर अशा खेळण्या बनवून अहमदपूर, चाकूर, किनगाव, शिरुरताजबंदसह परिसरातील विविध आठवडी बाजारात विक्रीसाठी घेऊन जाऊ लागले. तेथेही त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला असून, त्यातून त्यांचा उदरनिर्वाह भागू लागला. आता त्यांच्या आकर्षक खेळणीला शहरातून मोठी मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

## शारदा इंटरनॅशनल स्कूलचे बाल वैज्ञानिक परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
येथील शारदा इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मुंबई विज्ञान संघटनेमार्फत आयोजित डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत यश संपादन केले आहे. सहावी व नववीतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. सहावीतील ४० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. तब्बल ३१ विद्यार्थी प्रमाणपत्र फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

५ विद्यार्थ्यांनी प्रयोग फेरीत प्रवेश मिळविला आहे. त्यात विश्वजित भोसले, अरिंदम तिवारी, अभिराज व्यवहारे, देवर्ष जैन व देवांश राहुल बावा यांचा समावेश आहे. नववीतील ७९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी ३२ विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र फेरी गाठली आहे. ३ विद्यार्थ्यांनी प्रयोग फेरीत यश मिळविले आहे. त्यात रणवीर साळुंके, श्रेया केंद्रेव आरुषी मोरे यांचा समावेश आहे. शाळेचे प्राचार्य दत्ता घारगे, उपप्राचार्य विलास गायकवाड, उपप्राचार्या शीला शेळके, मुख्य समन्वयिका वैशाली गिरवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही कामगिरी केली.

## ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गासाठी प्रवेश सुरू

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
ग्रंथालय संचालनालय मुंबई संचलित ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या सन २०२५ च्या लातूर येथील केंद्रात प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून सदरील प्रवेशासाठी बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सदरील अभ्यासक्रम सहा महिन्याचा असून आठवड्यातून शनिवार व रविवार असे दोन दिवस तासिका होणार आहेत. सदरील वर्ग एक जानेवारी २०२५ पासून नियमितपणे सुरू होतील. वर्गाचा कालावधी १ जानेवारी २०२५ ते ३० जून २०२५ असा आहे. सदरील वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांचा गणवेशचा झाला बट्याबोळ

### अंदाजे माप घेतल्याने विद्यार्थ्यांना नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना महिला आर्थिक विकास मंडळाकडून गणवेश शिऊन दिले गेले; पण दिलेले गणवेश अगळपगळ असल्याने विद्यार्थी अस्वस्थ आहेत. अंदाजे माप पकडून केलेल्या शिलाईने गणवेशाचा झाला बट्याबोळ म्हणण्याची वेळ आली आहे.

शालेय विद्यार्थ्यांना अगळपगळ गणवेश दिल्याने शिक्षक परेशान आहेत. पालक, विद्यार्थी शिक्षकांकडे तक्रारी करीत आहेत. काही विद्यार्थ्यांना तर गणवेशच येत नाहीत. वयाचा अंदाज लावून शिवलेले गणवेश विद्यार्थ्यांना दिले गेले आहेत. वयाची बाब ठीक आहे; शरीरयष्टी प्रत्येक विद्यार्थ्यांची एकसारखी नसते. हे बाब लक्षात घेण्याची आवश्यकता होती. हल्ली शिक्षकांतून शालेय गणवेशाबद्दल ओरड सुरू आहे. गणवेश शासन देणार, शिऊन देणार मंडळ, शिक्षक फक्त वाटणार, ही चईन राबल्याने शिक्षकांना सर्वाधिक त्रास होत आहे. पालक, विद्यार्थ्यांचा समज गणवेशास शिक्षकच जबाबदार आहेत. यात शिक्षकांचा कसलाही रोल नाही. शिक्षकांचा पालक, विद्यार्थ्यांची समजूत काढण्यात मोठा वेळ वाया जात आहे. शासनाने असे अगळपगळ गणवेशच द्यायला नको होते.

पूर्वीसारखे शालेय व्यवस्थापन समितीवर जबाबदारी सोपवली असती तर हा प्रकार झालाच नसता. मात्र, शासन धोरणा पुढे कोणाचे चालणार आहे. शिलाईतही बऱ्याच त्रुटी ठेवल्या आहेत. त्यामुळे गणवेश देऊन न दिल्यासारखा प्रकार झाल्याची प्रतिक्रिया शिक्षकांत उमटत आहेत. आता शैक्षणिक वर्षच थोडे राहिले आहे. त्यामुळे शिक्षकांना गणवेशाचा तिढा सोडविल्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

## मालमत्ता कराच्या वसुलीसाठी महानगरपालिका ॲक्शन मोडवर

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
मालमत्ता धारकांकडे असणारा थकीत कर वसूल करण्यासाठी मनपाने हाती घेतलेली धडक वसुली मोहीम ६ जप्ती पथकांमार्फत सुरू आहे. या अंतर्गत शहरातील चारही झोनमध्ये गाळ्यांना सील ठोकणे, नळजोडण्या खंडित करणे अशी कारवाई महानगरपालिकेकडून केली जात आहे.



मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या निर्देशानुसार वसुली मोहीम सुरू आहे. झोन ए अंतर्गत मालमत्ता क्र.ए २-५२१९ यांच्याकडे १,३५,४५७ रुपये कर थकलेला असल्याने २ दुकानांना सील ठोकण्यात आले. बी झोनमध्ये एका मालमत्तेवर कार्यवाही करताच संबंधिताने ४,२२,६३० रुपयांचा धनादेश अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला. सी झोनमध्येही असाच अनुभव आला. कार्यवाही करताच मालमत्ताधारकाने ६८,७२९ रुपयांचा धनादेश अधिकाऱ्यांना दिला. आणखी एका प्रकारात थकीत करापोटी २ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या तसेच थकीत मालमत्ता करापोटी सी ५-३६८४ या एका खाजगी शाळेच्या कार्यालयाला सील ठोकण्यात आले. नागरिकांनी आपल्याकडे थकीत असणारा मालमत्ता कर पालिकेकडे जमा करून सहकार्य करावे, अन्यथा वसुलीची मोहीम अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा मनपा उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी दिला आहे. लातूर शहरातील मालमत्ता धारकांकडे मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर थकलेला आहे. त्या मालमत्ता धारकांनी तत्काळ कर भरून महापालिकेला सहकार्य करावे. अन्यथा कारवाईची मोहीम राबविली जात आहे.

## अल्पसंख्यांक मोर्चाचे आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
शहरातील प्रभाग क्रमांक नऊ मधील मनपा उर्दू शाळा क्रमांक ६ येथे अल्पसंख्यांक मुलांचे वसतीगृह उभारण्यात यावे, याठिकाणी इतर कोणतेही काम करू नये, अशी मागणी मनपा आयुक्तांसह, जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने करण्यात आली. आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, शाळेची जागा ही अल्पसंख्यांक मुलांच्या वसतिगृहासाठी मनपाकडून देण्यात आली आहे. या जागेवर इतर कुठल्याही योजनेचे काम करू नये.

यावेळी प्रदेश सरचिटणीस मुन्ना हाशी, शहर जिल्हा अध्यक्ष मोहसिन शेख, शहर जिल्हा सरचिटणिस अमजदखाँ पठाण, उपाध्यक्ष रियाज पठाण, जावेद शेख, तायप्पा कांबळे आदीजण उपस्थित होते.

## टीबीमुक्त भारत करण्यासाठी कर्मचाऱ्यांना शपथ



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १७ डिसेंबर-**
टीबीमुक्त भारत करण्यासाठी जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागातल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना शपथ देण्यात आली. सध्या टीबी रूग्ण शोध मोहीम जिल्ह्यात सुरू आहे. या मोहिमे अंतर्गत प्रत्येक नागरिकाच्या घरी जाऊन रूग्ण शोधले जात आहेत.

माध्यमिक शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी हाश्मी यांनी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना शपथ दिली. लातूर जिल्हा टीबीमुक्त करण्यासाठी आरोग्य विभाग प्रयत्न करीत आहे. त्यासाठी टीबी झालेल्या रूग्णांचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

यासाठी माध्यमिक शिक्षण विभागही या मोहिमेत सहभागी असून, एखाद्या टीबी रूग्णाबद्दल माहिती झाल्यास संबंधीत यंत्रणेला कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याप्रसंगी माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ, जिल्हा उपाध्यक्ष म्हाळाप्पा टिळे, प्रशासन अधिकारी बी. एस. कुसबागे, अधीक्षक अंकुश इंगळे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.